<u>(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )</u>

**पृ.शी.**: जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा राज्यातील कामगार व उद्योग धंद्यावर झालेला परिणाम

**मु.शी.**: जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा राज्यातील कामगार व उद्योग धंद्यावर झालेला परिणाम या विषयावर सर्वश्री जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, संजय दत्त, एस.क्यू. जमा, जैनुद्दीन जव्हेरी, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रतापसिंह मोहिते-पाटील, चंद्रकांत रघुवंशी, मुझफ्फर हुसेन, यशवंतराव गडाख, रमेश शेंडगे, श्रीमती मधु जैन, प्रा. फौजीया खान, श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला. )

श्री. नवाब मलिक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा राज्यातील कामगार व उद्योग धंद्यावर झालेला परिणाम याबाबतीत कालपासून सभागृहात चर्चा सुरु झालेली आहे. या आर्थिक मंदीचे संकट निर्माण झालेले आहे, त्यातून राज्याला बाहेर काढण्यासाठी, कामगारांना दिलासा देण्यासाठी आणि कामगारांना नवीन रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी मी काल काही गोष्टी सदनासमोर मांडल्या आहेत. या संकटावर मात करण्यासाठी आपण माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची निर्मिती करु. त्या समितीमध्ये शासनाचे संबंधित मंत्री, जबाबदार अधिकारी, कामगारांचे प्रतिनिधी, सी.आय.ए.चे प्रतिनिधी, काही उद्योजक यांचा समावेश करु. सर्व समावेशक अशी समिती गठीत करुन काही वेल आऊट पॅकेज देता येईल काय यासंबंधीचा विचार निश्चितपणे करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या विषयाच्या अनुषंगाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांनी मुख्य एक वादाचा मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु त्या मुद्दयाच्या खोलात मी जाणार नाही. परंतु त्यांनी आपल्या भाषणात असा उल्लेख केला की, या देशातील काही लोकांचे पैसे स्वीस बँकेत आहेत. पूर्वीच्या काळात पैसे ठेवण्यासाठी 2 टक्के व्याज मिळत होते. परंतु आता त्या बँकेत पैसे ठेवण्यासाठी सर्व्हीस चार्ज द्यावा लागतो आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, 1991 साली या देशाची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट होती.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

24-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

ABG/ KGS/ MMP/ 09:45

श्री.नवाब मलिक.....

स्व. व्ही.पी.सिंग हे पंतप्रधान पदावरुन दूर झाल्यानंतर स्व.चंद्रशेखर हे देशाचे पंतप्रधान झाले. त्यावेळी देखील या देशावर फार मोठे आर्थिक संकट होते. त्या आर्थिक संकटाला दूर करण्यासाठी त्यांनी देशाचे सोने गहाण ठेवले होते. नंतरच्या काळात निवडणुका लागल्या व सत्तांतर झाले. त्यानंतर स्व. नरसिंह राव हे भारताचे पंतप्रधान झाले. त्या काळातही देशावर अशाच प्रकारचे आर्थिक संकट होते. त्या संकटातून देशाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी काही उपाययोजना केल्या. आपल्याला आठवत असेल की, पंतप्रधान स्व.नरसिंह राव त्यांच्या मंत्रिमंडळात श्री. मनमोहन सिंग यांच्याकडे वित्त खात्याची जबाबदारी देऊन त्यांना संकटमोचन म्हणून आणले. देशासमोर आव्हान होते की, आपल्या देशात फॉरेन एक्सेंज नाही. शासन चालविले जाईल एवढे पैसे देखील नव्हते. अशा कठीण समस्येतून देशाला बाहेर काढण्याची जबाबदारी आताचे पंतप्रधान व त्यावेळचे वित्तमंत्री श्री. मनमोहन सिंग यांचेवर सोपविण्यात आली होती. सुदैवाने आज देखील वित्तमंत्र्यांची जबाबदारी माननीय पंतप्रधान यांच्याकडेच आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मागणी केली की, या देशातील अनेक लोकांचे पैसे परदेशी बँकेत ठेवलेले आहेत. ते पैसे भारतात आणले गेले पाहिजे. ज्या भारतीय लोकांनी परदेशी बँकेत पैसे गुंतविले आहेत, माननीय श्री. गडकरी साहेबांशी संबंधीत जे लोक असतील त्यांचे पैसे भारतात आणावेत यादृष्टीने त्यांनी शासनाला मदत केली पाहिजे अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : आपल्या बोलण्यातून असे दिसून येते की, श्री. गडकरी यांच्याकडे दोन नंबरचे पैसे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे आरोप केलेले नाहीत. आपण अतिशय चांगले उत्तर देत आहात.

श्री. नवाब मलिक : मी त्यांच्यावर आरोप करीत नाही. सन्माननीय सदस्यांचा काही माझ्या बोलण्यातून गैरसमज झाला असेल तर ते शब्द मी मागे घेतो. ज्या भारतीयांनी आपले पैसे परदेशी बँकेत ठेवलेले आहेत, त्यांना माननीय गडकरी साहेबांनी विनंती केली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. जागतिक मंदीस तोंड देण्यासाठी काही तरी स्कीम तयार केली पाहिजे. मला आठवते की, त्या काळात आताचे पंतप्रधान व त्यावेळचे वित्तमंत्री श्री.मनमोहन सिंग यांनी रेमिटन्सी स्कीम आणली होती. भारतीयांनी परदेशी बँकेत पैसे गुंतविले असतील, त्यांनी आपले पैसे भारतात आणावेत. त्याबाबतीत कोणालाही विचारले जाणार नाही. माननीय श्री.गडकरी साहेबांनी मागणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक...

केली आहे की, महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये चर्चा झाल्याप्रमाणे राज्य शासनाने केंद्र शासनास शिफारस केली पाहिजे की, रेमिटन्सी स्कीम सारखी एखादी स्कीम भारतात पुन्हा आणावी. माननीय श्री.गडकरी यांच्या मागणीप्रमाणे तशी शिफारस केंद्र शासनाकडे करण्याची शासनाची तयारी आहे. या मंदीमुळे सिमेंट आणि स्टील दोन इंडस्ट्रीज आहेत त्यांना मोठी झळ बसते आहे. या दोन इंडस्ट्रीजसाठी एखादे वेगळे पॅकेज तयार करुन त्या उद्योगांना वाचविले पाहिजे अशीही मागणी माननीय श्री. गडकरी साहेबांनी केली आहे. आज सिमेंटचे आणि स्टीलचे दर मोठया प्रमाणात कोसळले आहेत ही वस्तुस्थिती आहे. कोळशापासून जी राख तयार होते, त्या राखेचे मिक्सींग करुन कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीजला त्याचा वापर करता येईल अशीही त्यांनी मागणी केली आहे. माननीय श्री. गडकरी साहेबांनी उदाहरण दिले की, मुंबईत वरळी सी-लिंकचे काम सुरु आहे त्या कामाच्या फाऊंडेशनला राखेचा वापर करीत आहेत...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 09:50

श्री.नवाब मलिक..........

तशा उपाययोजना त्यांनी सुचविल्या आहेत. त्यांनी असेही सांगितले की, सिमेंट इंडस्ट्रीला आपण लाईम देतो, खनन करण्याची परवानगी देतो, ही महाराष्ट्र शासनाची संपत्ती आहे, त्याबाबत उपाययोजना करण्यासाठी ज्या सूचना केल्या आहेत त्याबाबत शासन निश्चितपणे विचार करणार आहे. स्टील क्षेत्रात फॉरवर्ड पर्चेस असेल, वॅट किंवा सेल्सटॅक्समध्ये ॲडजस्ट करा असे सांगण्यात आले. याबाबत निश्चितपणे शासन विचार करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी वरळी-वांद्रे सेतू प्रकल्प सुरु झाला त्यावेळी जी कॉस्ट होती त्यामध्ये 1 हजार कोटी रुपयांनी वाढ झाल्याचा मुद्दा मांडला होता. याबाबत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सुरुवातीला जे डिझाईन तयार करण्यात आले त्या डिझाईनप्रमाणे पुलाचा मार्ग वेगळा होता. त्या मार्गाला विरोध करण्यात आला. श्री.भाई बंदरकर यांच्या नेतृत्वाखाली मच्छिमार बांधवांनी मुंबईत आंदोलने केली. या सागरी पुलामुळे आमच्या बोटी समुद्रात जाऊ शकणार नाहीत, त्यामुळे या पुलाचा मार्ग बदलण्यात यावा, पूल वरळी गावापासून दूर न्यावा अशी त्यांनी मागणी केली. त्यामुळे नवीन डिझाईन तयार करण्यात आले आणि एस्केलेशनमुळे देखील पुलाच्या किंमतीमध्ये वाढ झाली. त्यामुळे खर्च 1 हजार कोटी रुपयांनी वाढला. त्यांनी कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीबद्दल देखील सूचना केली आहे. त्यावर उपाययोजना झाली पाहिजे असे सांगितले आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, जेव्हा आपण पायाभूत सुविधांना चालना देतो, बांधकामांना चालना देतो तेव्हा मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. कन्स्ट्रक्शन इंडस्ट्री जेव्हा वाढते तेव्हा बांधकाम क्षेत्रात बूम येते. त्यावेळी मोठया प्रमाणात या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होतात. या क्षेत्रात बूस्ट देण्यासाठी केंद्र शासनाने बेलआऊट पॅकेज जाहीर केले. ज्यावेळी हाऊसिंगचे दर वाढत होते तेव्हा लोकांना घर विकत घेणे परवडत नव्हते. त्यासाठी केंद्र शासनाने सर्व बँकांना निर्देश दिले आणि हाऊसिंगचे दर कमी केले पाहिजेत, होमलोनसाठी आकारले जाणारे व्याजाचे दर कमी केले पाहिजेत अशी सूचना केली. त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. आर्थिक मंदीपेक्षा मानसिक मंदी अधिक तयार झाली आहे. घर घेण्याची जी मंडळी विचार करीत आहेत त्यांच्या मनात अशी संकल्पना आहे की, आता दर आणखी खाली जातील. 4 हजार रुपये प्रती चौ.फुटाचा दर 1500, 2000 पर्यंत होईल. त्यामुळे घर विकत घेण्यासाठी कोणी पुढे येत नाही. या मानसिक मंदीतून जनतेला बाहेर काढण्यासाठी उपाययोजना केली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 09:50

श्री.नवाब मलिक..........

पाहिजे. मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, मुंबईला गेल्यानंतर मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक या क्षेत्रातील कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीशी संबंधित जे लोक आहेत, महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीचे अध्यक्ष असतील, त्यांचे सदस्य असतील त्यांच्याबरोबर बसून या इंडस्ट्रीला बूस्ट देण्यासाठी शासनातर्फे जे जे करणे शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न केला जाईल. याठिकाणी मुद्दा मांडला की, सेस लावण्यात येतो, वॅटची आकारणी केली जाते. सिमेंट, स्टील खरेदी केल्यानंतर, हार्डवेअर वस्तू खरेदी केल्यानंतर ज्या फ्लॅटची विक्री केली जाते त्यावर वॅट लावण्याची तरतूद वित्त विभागाने केलेली आहे. त्याबाबत शासन विचार करणार आहे. सोर्स ॲट एंड ते विकतात म्हणजे कन्व्हेट करुन ती वस्तू होऊ शकत नाही हे आम्हाला मान्य आहे. वॅट लावण्याची जी संकल्पना आहे त्याबाबत काय करता येईल याचा शासन विचार करणार आहे. आपण जेव्हा कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीबाबत बोलतो तेव्हा या क्षेत्रात अफाट नफा कमावणारी मंडळी देखील आहेत. या क्षेत्रात बिल्डर मंडळींचे नुकसान झालेले नाही. त्यांच्या नफ्यामध्ये घट झाली आहे. 100 कोटी रुपयांऐवजी 50 कोटी, 25 कोटी रुपये घट झाली आहे. या संदर्भात संबंधित मंडळींना बोलावून बेंचमार्क तयार करुन निश्चित काय तो रेट जाहीर करावा. आज मुलुंडसारख्या भागात 7 हजार रुपये प्रती चौ.फूट दर असेल तर तो 3500 किंवा 4000 रुपये जाहीर करावा. जेणेकरुन आणखी भाव कमी होतील मग आपण घर खरेदी करु अशी जी जनतेची मानसिकता तयार झाली आहे त्यावर मार्ग काढता येईल. लोकांची घर घेण्याची मानसिकता आहे. त्यांना मानसिक मंदीतून बाहेर काढण्यासाठी आणि कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीला चालना देण्यासाठी शासन निश्चितपणे उपाययोजना करणार आहे. याठिकाणी अशीही सूचना करण्यात आली की, मंदीचे रुपांतर संधीमध्ये केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की, देशाची लोकसंख्या ही समस्या आहे......(अडथळा)...मी क्लेरिफाय करतो...

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, भारतातील लोकसंख्या ही समस्या आहे असे मी माझ्या भाषणातून म्हणालो नाही.

श्री. नवाब मलिक : महोदय, मी त्यासंदर्भात स्पष्टीकरण देतच आहे की, सन्माननीय सदस्यांचा मुद्दा होता की, भारतातील 110 कोटी लोकसंख्येच्या 220 हातांचा वापर आपल्याला करुन घेता येत नाही, ही समस्या आहे. आज जगाच्या पातळीवर आपण पाहिले तरी जवळजवळ सर्वच देशांमध्ये भारतातील वर्क फोर्स अस्तित्वात आहे, एवढेच नव्हे तर भारतातल्या वर्क फोर्सचीच त्या देशांना गरज आहे. मी पॅरिसला गेलो त्यावेळेस आयफेल टॉवरजवळ उभा राहिलो असता मला तेथे आपले भारतीय लोक रस्त्यावर की-चेन विकतांना आढळून आले. त्यावेळेस फ्रान्सचा एक पोलीस कॉन्स्टेबल आला तेव्हा हे सर्व रस्त्यावर विक्री करणारे लोक पळून गेले आणि थोड्या वेळाने पुन्हा ते आले. मी त्यांना विचारले की, मुंबईसारखी हप्ता पध्दत फ्रान्समध्ये नाही काय ? त्यावर त्याने सांगितले की, येथे हप्ता पध्दत नाही तसेच हे लोक फक्त आम्हाला भीती घालतात. मी त्यांना म्हणालो की ते तुम्हाला त्यांच्या देशात इल्लिगली राहतात म्हणून भारतात परत का पाठवित नाहीत त्यावर तो म्हणाला की, आम्हाला जर भारतात पाठविले तर फ्रान्समध्ये अशा प्रकारचे काम करणारे लोक राहणार नाहीत, म्हणून ते केवळ कमी वेळात आम्ही काम करतो आणि व रस्त्यावर विक्री करतो म्हणून फक्त भीतीच निर्माण करतात. म्हणून या देशांना भारतातील वर्क फोर्स हवेच आहेत. अमेरिकेत काम करणारा माणूस सुध्दा जास्तीत जास्त भारतातलाच आहे. अशा प्रकारे ट्रेन्ड वर्क फोर्स निर्माण करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्री महोदयांनी आताच फ्रान्समधील उदाहरण सांगितले. परंतु हे भारताच्या संस्कृतिला शोभा देणारे नाही. कारण यातून असा संकेत होतो. त्यांनी सांगितले की, भारतातील लोक इलिगली फ्रान्समध्ये राहतात व त्यांचा वापर अशा प्रकारे केला जातो हे भारताला शोभादायक नाही. आपणा सर्वांनाच आपल्या देशाविषयी अभिमान पाहिजे. म्हणून अशा प्रकारे इलिगली इतर देशात राहतात असा जो उल्लेख मंत्री महोदयांनी केला तो रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मुंबईत जशी हप्ता वसुली होत असते तसे तेथे चालू नाही काय असा शब्दप्रयोग देखील रेकॉर्डवरुन काढण्यात यावा.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक : महोदय, रेकॉर्डवरुन अशा प्रकारचे शब्द काढण्यास माझी कोणतीही हरकत नाही. मी मुंबई जरी म्हणालो तरी महानगरपालिकेच्या पथकाबाबत मला म्हणावयाचे आहे. माझा सांगण्याचा हेतू आ होता की, या देशाची जेवढी लोकसंख्या आहे त्यांना ट्रेन्ड करणे आवश्यक आहे. त्यासाठी तंत्रशिक्षणावर भर द्यावा लागणार आहे. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सूचविले की, इंजिनिअरिंग कॉलेजेस जास्तीत जास्त निर्माण करावेत व त्या कॉलेजेसना शासनाने परवानगी द्यावी. या अनुषंगाने मी असे स्पष्टीकरण करु इच्छितो की, शासनाला अशा कॉलेजेसचे जेवढे प्रस्ताव प्राप्त होतील त्यांची शिफारस ऐआयसीटीईकडे करण्यात येईल आणि जास्तीत जास्त इंजिनिअरिंग कॉलेजेसना परवानगी देण्याचा विचार करता येईल. त्याचबरोबर सध्या राज्यात जेवढे आय.टी.आय. कॉलेजेस आहेत त्यांचे स्ट्रेन्थनिंग करण्यासाठी 200 ते 300 कोटी रुपये खर्च करण्यात आले आणि नवीन टेक्निकल स्कूल्स निर्माण करण्याचेही शासनाने धोरण आखलेले आहे. या सर्व माध्यमातून आपल्याला संपूर्ण राज्यात वर्क फोर्स ट्रेन्ड करता येईल, व हीच शासनाची देखील भूमिका राहील.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी अशीही भीती व्यक्त केली की, या मंदीचा परिणाम म्हणून तंत्रशिक्षण घेऊन बाहेर पडणारी मुले एक प्रकारे डिप्रेशनमध्ये जाणार आहेत की काय अशीही भीती वाटत आहे. खरोखरच या आर्थिक मंदीमुळे लोकांना मानसिक त्रास होणार आहे परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण इ. च्या माध्यमातून एखादी यंत्रणा तयार करुन अशा नवीन पध्दतीने आपल्याला काही ॲसेट्स निर्माण करता येतील काय आणि त्या माध्यमातून डिप्रेशनमधून बाहेर काढण्यासाठी अशा प्रकारे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. या जगात मेडिकल क्षेत्रात सुध्दा नवीन टेक्निशियन्स निर्माण करण्याच्या दृष्टीने विचार करावा लागणार आहे. कारण सी.टी. स्कॅन मशिन्स, एम.आर.आय. सारख्या मशिन्सचे जास्तीत जास्त टेक्निशियन्स आपल्याला निर्माण करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वैद्यकीय क्षेत्रातर्फे एखादा अभ्यासक्रम तयार करुन त्या अनुषंगाने रोजगार उपलब्ध करुन देण्याची देखील शासनाची तयारी आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक ....

आज जगामध्ये जवळपास 1.5 लक्ष नर्सेसची गरज आहे. जास्तीत जास्त नर्सिंग कॉलेजेस उघडून त्यामध्ये मुलींना नर्सिंगचे ट्रेनिंग देऊन त्यांना जगामध्ये पाठविले तर राज्यामध्ये आणि देशामध्ये आपण एक नवीन रोजगार निर्माण करुन देऊ शकतो. जगामध्ये वर्क फोर्सची कमतरता आहे त्यामुळे आपण आपला वर्क फोर्स तयार केल्यानंतर हा तयार झालेला वर्क फोर्स जगामध्ये पाठविण्यासाठी काही एजन्सीज उघडाव्या लागतील. तरुणांना परदेशामध्ये पाठविण्याचे काम करणारे जे एजन्टस् आहेत त्या एजन्टस्च्या माध्यमातून आपण आपला वर्क फोर्स जगामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात पाठवू शकतो. परंतु ही गोष्ट देखील सत्य आहे की, तरुणांना परदेशामध्ये पाठविण्यासाठी जे एजन्टस् काम करतात त्या एजन्टस्कडून देखील काही वेळेस फसवणूक होत असते. परदेशात तरुणांना पाठविण्यासाठी व्हीसा आणि इतर या काही गोष्टी लागतात त्या सर्व गोळा करुन मोपेक नावाची संस्था तरुणांना, शिक्षीत वर्गाला परदेशात पाठविण्याचे काम करीत होती. परंतु ही मोपेक कंपनी बंद करण्याचा निर्णय 1990 मध्ये घेण्यात आलेला आहे. मी आपल्याला आश्वासन देऊ इच्छितो की, या मोपेक कंपनीला पुन्हा जीवंत करुन या राज्यातील जे तरुण परदेशात जाऊ इच्छितात, जे ट्रेन्ड लोक आहेत त्यांना मोपेक मार्फत किंवा शासनामार्फत पाठविले तर त्याचा सुध्दा आपल्याला फायदा होईल. त्यामुळे या मोपेक कंपनीला पुन्हा एकदा जीवंत करण्याची शासनाची तयारी आहे.

आपल्या देशात आर्थिक मंदी आलेली आहे. बेलआऊटच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी केंद्रशासनाने काही निर्णय घेतलेले आहेत. या आर्थिक संकटाला मदत करणारा घटक कोणता असेल तर तो पेट्रोलियम घटक आहे. पेट्रोल, डिझेल, फर्नेस ऑईल, एलडीओ असेल ज्यावेळेस क्रूड ऑईलचा दर बॅरलला 160 डॉलर होता त्यावेळेस जनतेला केंद्रशासनाने दरामध्ये सूट दिली होती. परंतु जोपर्यंत आपण पेट्रोल, डिझेल, फर्नेस ऑईलचे दर जनतेला परवडतील असे करीत नाही तोपर्यंत आपल्याकडील प्रॉडक्शन कॉस्ट कमी होणार नाही. पेट्रोल, डिझेल, फर्नेस ऑईलचे दर जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत दळणवळणाचे दर आपल्याकडे कमी होऊ शकणार नाहीत. त्यामुळे केंद्रशासनाला महाराष्ट्र शासनातर्फे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी करण्याची विनंती करणार आहे. ज्यावेळेस क्रूड ऑईलचा भाव 60 डॉलर होता त्यावेळेस आपल्याकडे पेट्रोल, डीझेल ज्या दरामध्ये उपलब्ध होत

...2..

श्री. नवाब मलिक ....

होते त्या दरामध्ये आता सुध्दा पेट्रोल, डीझेल उपलब्ध झाले पाहिजे. ज्यावेळेस बॅरलचा भाव 160 डॉलर होता त्यावेळेस पेट्रोलियम कंपनीला किती तोटा झाला व आता बॅरलचे भाव 40 डॉलरवर आलेले असतांना पेट्रोलिअम कंपन्यांना किती फायदा झाला हे पाहून आता दर ठरविण्याची गरज आहे. राज्याला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली असल्यामुळे शासनाने पेट्रोल आणि डिझेलचे भाव कमी करावे यासाठी महाराष्ट्र शासन केंद्रशासनाला शिफारस करणार आहे. आर्थिक मंदीचा मुकाबला करण्यासाठी अनेक मुद्दे या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मांडलेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी हाऊसिंग इंडस्ट्रीजच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले असून त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, हाऊसिंग इंडस्ट्रीजच्या संदर्भात एक बैठक घेऊन हाऊसिंग इंडस्ट्रीजचे प्रश्न दूर करण्याचे प्रयत्न करणार आहोत. तसेच नवीन रोजगार निर्माण करण्यासाठी राज्य शासन काही उपाययोजना करण्याच्या मनस्थितीत आहे.

सभापती महोदय, मुंबईवर ज्यावेळेस आतंकवाद्यानी हल्ला केला त्यावेळेपासून आपल्याकडे सुरक्षा हा फार मोठा विषय झालेला आहे. यासंदर्भात राज्य शासनाचे एक सुरक्षा रक्षक बोर्ड आहे. या सुरक्षा रक्षक बोर्डामध्ये जवळपास 13000 कर्मचारी काम करतात. या राज्यामध्ये जवळपास 4 लक्ष सुरक्षा रक्षकांची गरज आहे. ज्यावेळेस सुरक्षा रक्षकांची भरती केली जाते त्यावेळेस त्यांना कुठल्याही प्रकारची सुरक्षा रक्षक ट्रेनिंग देण्याची सुविधा दिली जात नाही. सुरक्षा रक्षक हे वॉचमन सारखे काम करतात. सुरक्षा रक्षक मंडळाला सुरक्षा रक्षक बलामध्ये परिवर्तीत करण्यासाठी शासन निर्णय घेणार आहे आणि त्याला ट्रेन्ड सुरक्षा रक्षक बनविण्याची आमची तयारी राहणार आहे. सुरक्षा रक्षक बोर्डामध्ये बंदूकधारी सुरक्षा रक्षक, रिव्हॉल्व्हरधारी सुरक्षा रक्षक, स्कॅनर मशीनवर सुरक्षेच्या संदर्भात तपास करण्यासाठी सुरक्षा रक्षक अशी वेगवेगळी कॅटेगरीज निर्माण करुन जवळपास 50 हजार सुरक्षकांची भरती शासनामार्फत केली जाणार आहे. काही दिवसापूर्वी पोलिसांची भरती आपल्याकडे झाली होती. या पोलीस भरतीसाठी अनेक तरुणांनी अर्ज केला होता , अनेक तरुण मैदानी परीक्षा पास देखील झाले होते परंतु मेरीटमध्ये बरेच तरुण फेल ठरले. त्यामुळे पोलीस भरतीमध्ये जे तरुण फेल झालेले आहेत अशा फेल झालेल्या 50 टक्के तरुणांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

श्री. नवाब मलिक ....

सुरक्षा रक्षकांमध्ये घेण्यासाठी प्राधान्य दिले जाईल अशी शासनाची भूमिका राहील. जसे होमगार्डमध्ये पोलीस भरतीसाठी 5 टक्क्याचे आरक्षण आहे तसेच पोलीस भरतीमध्ये जी मुले फेल झालेली आहेत अशा फेल झालेल्या 50 टक्के मुलांना सुरक्षा रक्षकांमध्ये घेण्याच्या संदर्भात गृहखात्याला शिफारस करण्यात येईल.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक..........

पोलीस विभागाकडे सुरक्षा रक्षक मंडळामध्ये काम करण्यासाठी अर्ज आलेले आहेत त्यांचा आपण विचार करणार आहोत.

डॉ.दीपक सावंत : आपण भूमीपुत्रांना प्राधान्य द्यावे........

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय, आपण भूमीपुत्रांना प्राधान्य देणार आहोत. पंचतारांकित हॉटेल ताजमध्ये त्यांचे खासगी गार्डस कार्यरत आहेत. त्याठिकाणी सुरक्षा रक्षक मंडळाचे गार्डस नाहीत ही शोकांतिका आहे. काही नामांकित हॉटेल्स किंवा संस्थांमध्ये खाजगी सुरक्षा रक्षक ठेवावेत परंतु महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाचे गार्डस देखील असले पाहिजेत अशाप्रकारचा कायदा आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. म्हाडामध्ये बी.आय.एस.चे गार्डस आहेत. एम.एस.ई.बी.मध्ये खाजगी सुरक्षारक्षक आहेत. इतर ठिकाणी सुध्दा खाजगी सुरक्षा रक्षक आहेत. तेव्हा यापुढे शासनाच्या उपक्रमातीलच सुरक्षा गार्डस घेण्याचे आदेश काढण्यात येतील.

सभापती महोदय, काही ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षकांची पिळवणूक होते. त्यांना वेळेवर पगार मिळत नाही. तेव्हा याबाबतीत शासन मॉनेटरींग करणार आहे. तसेच अगोदर सांगितल्याप्रमाणे सुरक्षा रक्षकांची पदे भरताना भूमीपुत्रांना प्राधान्य दिले जाईल. ज्या उमेदवाराने डोमिसाईल सर्टीफिकेट दिल्याशिवाय त्यांना नोकरीवर घेऊ नये अशा सूचना देखील देणार आहोत.

सभापती महोदय, इंडस्ट्रीमध्ये तसेच नवनवीन क्षेत्रामध्ये उपलब्ध होणाऱ्या नोकऱ्यांमध्ये भूमीपुत्रांना प्राधान्य मिळाले पाहिजे. तसा कायदा आहे. या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची सूचना सर्वांना दिल्या जातील.

सभापती महोदय, या संदर्भात सरकारची याबाबतीत सकारात्मक भूमिका आहे. केवळ विरोधी पक्षांनी काही सूचना केल्या म्हणून त्या नाकाराव्यात अशी सरकारची भूमिका नाही. या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. त्या समितीमध्ये दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्ष नेते तसेच गट नेत आणि विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी जसे कामगार सेना, इंटक यांचा समावेश त्या समितीमध्ये आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक..........

सभापती महोदय, मुंबईवर झालेल्या आतंकवादी हल्ल्याला आपण ज्या धैर्याने तोंड दिले. त्याप्रमाणे आता आपल्यावर येऊ घातलेल्या आर्थिक मंदीला देखील धैर्याने तोंड दिले पाहिजे. त्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन त्याचा मुकाबला करण्याची गरज आहे. भारत देश येत्या 25 वर्षात आर्थिक महासत्ता होऊ शकते असे सांगण्यात येते. तेव्हा आता आपल्यावर येऊ घातलेल्या आर्थिक मंदीचे रुपांतर आपण चांगल्या गोष्टीत केले पाहिजे.

सभापती महोदय, आज लोक शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविण्यास घाबरतात. तेव्हा लोकांना गुंतवणुकीसाठी पर्यायी व्यवस्था केली पाहिजे. त्यासाठी राज्यातील जे प्रकल्प आहेत त्यामध्ये शासन गुंतवणूक करते, परंतु सर्वच ठिकाणी शासन गुंतवणूक करु शकत नाही. तेव्हा राज्यातील जे सिंचन प्रकल्प आहेत, पूल,रस्ते, पॉवर सेक्टर यामध्ये ल्युक्रेटीव्ह मेजर्स घेऊन त्यामध्ये लोकांना गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित करु. तसेच जे प्रकल्प व्हायबल आहेत ते बी.ओ.टी.तत्वावर लवकरात लवकर तयार करुन लोकांसमोर येणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी चायना मधील बांबू इंडस्ट्रीचा उल्लेख केला. त्याठिकाणी बांबूपासून केन, फर्निचर आणि नवनवीन डिझाईन केल्या जातात. त्याठिकाणी बांबू इंडस्ट्रीमध्ये 50 टक्के लोक काम करीत आहेत.

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 10.10

श्री.नवाब मलिक ...

या उद्योगाला चांगले मार्केट उपलब्ध होत नाही. याचे कारण असे की, ते नवीन डिझाईनच्या वस्तू तयार न करता परंपरागत डिझाईनच्या वस्तू तयार करीत असतात. व त्यांच्या नेहमीच्या पध्दतीने मार्केटीग करीत असतात. खादी ग्रामोद्योग बोर्ड , केन्द्रीय खादी ग्रामाद्योग बोर्ड आणि तंत्र शिक्षण संस्था यांच्याकडून नवीन डिझाईन कशी करता येईल आणि या उद्योगातून तयार होणा-या वस्तूंना मार्केट कसे उपलब्ध या साठी प्रयत्न केले जातील . हॅण्डूलम वस्तुंची निरनिराळया ठिकाणी प्रदर्शने भरविण्यात येतात त्याठिकाणी या वस्तू कशा पोहोचवता येतील तसेच खादी ग्रामोद्योग बोर्ड आणि केन्द्रीय खादी ग्रामोद्योग बोर्ड याच्याकडून या उद्योगासाठी मार्केट कसे उपलब्ध करुन देता येईल या दृष्टीने त्यांची जी काही गरज आहे ती पूर्ण करण्यासाठी शासनाची तयारी राहील. हॅण्डीक्राफट क्षेत्रात काम करणा-या कामगारांचा उद्योग पुढे चालू राहिला पाहिजे असाच शासनाचा प्रयत्न राहील. एखादा श्रीमंत माणूस असेल तर त्याला हॅण्डीक्राफटच्या वस्तू खरेदी करण्याची आवड असते त्याचा ड्राईग रुम दहा कोटी रुपयांचा असला तरी हस्तशिल्पाच्या वस्तू त्यामध्ये तो ठेवत असतो काही श्रीमंत माणसे आपल्या ड्राईग रुममध्ये चटई ठेवतात तर काही जण केन फर्निचर ठेवतात. या वस्तुंना मार्केट आहे परंतु या वस्तुना अधिक मार्केट कसे उपलब्ध करुन देता येईल व या उद्योगाला जीवंत कसे ठेवता येईल या दृष्टीने शासनाचे प्रयत्नराहतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जामा यांनी स्मॉल स्केल इन्डस्ट्रीज आणि कॉटेज इन्डस्ट्रीज सबंधी येथे उल्लेख केला होता त्याचबरोबर सन्माननीय सदय्य श्री नितीन गडकरी यांनी सांगितले की ग्रामीण भागातील उद्योग जीवंत राहिले पाहिजेत . ग्रामीण भागातील लोकांना जर रोजगार मिळाला नाही तर तेथील लोक शहराकडे येतात.व त्यामुळे शहरीकरण वाढत जाते. गावामध्ये या लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देत नाही, आरोग्याच्या सोयी देत नाही त्याचप्रमाणे शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे धाव घेतात व त्यामुळे त्यांचा बोजा शहरावर वाढत जातो. ग्रामीण भागातीललोकांचा बोजा शहरावर वाढता कामा नये यासाठी ग्रामीण भागातील लोकांना तेथेच रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले जातील. खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मार्फत कॉटेज उद्योगाला चालना देण्यासाठी या उद्योगाला सबसिडी देण्यात येत होती त्याचप्रमाणे भागभांडवल देण्यात येत

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक ...

होते त्याबाबातीत व्यावहारिक विचार करुन कॉटेज इन्डस्ट्रीजला चालना देण्यासाठी आणि त्यांना मार्केट उपलब्ध करुन देण्यासाठी शासन निश्चितपणे एखादी योजना तयार करील आणि त्या दृष्टीने योगय ती कार्याही करील..

सभापती महोदय , स्मॉल स्केल इन्डस्ट्रीज हे ॲन्सलरी युनिट आहे .एखादा मोठा उद्योग जर बंद पडला तर त्या उद्योगावरसुध्दा परिणाम होतो. मोठा उद्योग जीवत राहिला तर लहान युनिटससुध्दा चालू शकतील. पुण्यातील टेल्को आणि ऑटोमोबाईल इन्डस्ट्रीज बाबत सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी उल्लेख केला होता . त्यांनी असे सांगितले की हा उद्योग जीवंत राहिला पाहिजे. पुणे विभागातील टेल्को सारखा उद्योग जर बंद पडला तर त्यावर अवलंबून असलेले अनेक उद्योग बंद पडतील.व लाखो कामगारावर उपासमासरीची वेळ येईल पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी झाल्यामुळे अनेक खाजगी व्यक्ती गाडया खरेदी करु शकतील अशा प्रकारे गाडयाची विक्री वाढली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत मुंबईतील जुन्या टॅक्सीजचा मुद्दा वारंवार सभागृहात उपस्थित करीत असतात. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, 25 वर्षाच्या जुन्या टॅक्सीज बदलण्याची शासनाची मानसिकता असून हे प्रकरण कोर्टातसुध्दा गेले होते. त्याबाबत शासनाने काही तरी उपाययोजना केली पाहिजे अशी देखील मागणी करण्यात आली होती. त्या सदंर्भात मी आपल्याला संगू इच्छितो की, दिल्लीच्या धर्तीवर मुंबईतील 30-40 हजार टॅक्सीज बदलून नवीन टॅक्सीज देण्यासाठी शासन उपाय योजना करील. त्यांना व्हॅटमध्ये काही सवलत देता येईल काय, रजिस्ट्रेशन फी माफ करता येईल काय ? केन्द्राकडून एक्साईज डयुटीमध्ये काही माफी करता येईल काय ? या संदर्भात विचार करुन मुुंबईतील ज्या जुन्या 40 -50 हजार टॅक्सीज आहेत त्या बदलून नवीन टॅक्सीज आणण्यासाठी शासन एखादी ययोजा तयार करील आणि ती करीत असतांना शासन अशी अट टाकणार आहे की , या राज्यात तयार होणा-या टॅक्सी जर खरेदी केली असेल तरच त्यांना व्हॅटमध्ये सूट देऊ, केन्द्राकडील एक्साईज डयूटीमध्ये सुट देऊ, रजिस्ट्रेशन फी मध्ये सूट देऊ. त्याच प्रमाणे या उद्योगाला चालना देण्यासाठी आणि मुंबईतील जुन्या टॅक्सीजचा विषय मार्गी लावण्यासाठी पुढील काही दिवसात एखादी बैठक घेण्यात येईल आणि ऑटोमोबाईल इन्डस्ट्रीला जीवंत ठेवण्यासाठी निणर्य घेण्यात येईल.

3..



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 10.10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक ...

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेंत असतांना सन्माननीय सदस्यासंनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्यावर पॉझिटीव्हली विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र .पाटील यांनी आपले विचार मांडत असताना असे सांगितले की, गुजराथचे मुख्यमंत्री श्री. मोदी आपल्या राज्यातील कारखाने पळवून त्यांच्या राज्यात घेंऊन जात आहेत.निटको कंपनीचे त्यांनी उदारहरण सुध्दा दिले होते. निटको कंपनीचे मालक असे सांगतात की , गुजराथचे मुख्यमंत्री उद्योग सुरु करण्यासाठी त्याच्या राज्याची दारे उधडी ठेवतात आणि या राज्यातील अधिकारी मात्र त्रास देतात. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या राज्यातील डायरेक्टर बीस, फॅक्टरी इन्सपेक्टरच्या संदर्भात जे कायदे आहेत ते सुटसुटीत करणार आहोत अडथळे निर्माण करणारे जे कायदे आहेत त्यात बदल करण्यात येईल. तसेच सेफटीच्या बाबतीत खाजगी सुरक्षा रक्षक नेमणार आहोत. गुजराथमध्ये वन विंडो सिस्टीम सुरु करण्यात आलेली आहे

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक ....

म्हणजे एखादा कारखाना या राज्यात उघडावयाचा असेल तर त्यासाठी लागणाऱ्या विविध विभागांकडील परवानग्या मिळविण्यासाठी संबंधित उद्योजकाला एकाच ठिकाणी अर्ज करावा लागेल अशी व्यवस्था आपण निर्माण केली आहे. गुजराथ राज्यामध्ये ज्याप्रमाणे 'एक खिडकी योजना' तयार करण्यात आली आहे त्याप्रमाे आपल्याकडे देखील अशी व्यवस्था करून 'रेड टेपिझम' दूर करण्याच्या दृष्टीने कारवाई करण्याचा निर्णय शासन निर्णय घेईल आणि त्यानुसार कारवाई करील आणि या राज्यातील कारखानदारी इतर राज्यांमध्ये जाणार नाही या दृष्टीने शासन उपाय योजना करील.

सभापती महोदय, मुंबई, ठाणे-बेलापूर या पट्ट्यामध्ये कारखानदारी बंद होत आहे याची आपल्यालाही कल्पना आहे. त्यामागील एकच कारण आहे आणि ते म्हणजे त्या भागातील जमिनींचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले गेले. त्यामुळे तेथील उद्योजक त्या भागातील आपले कारखाने बंद करून दुसरीकडे घेऊन जात आहेत व ती जागा 200-500 कोटी रूपयांना विकत आहेत. त्यासाठी ते कामगारांनाही त्यांची देणी देत आहेत. पण त्यातून आपल्याकडील बेरोजगारी वाढत आहे. त्यासाठी शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे की, तेथे एनओसी घेतल्याशिवाय ती जमीन त्यांना विकसित करता येणार नाही, हस्तांतरित करता येणार नाही. याशिवाय आणखी एक महत्त्वाचा निर्णय आपण या संदर्भात आता घेणार आहोत. हे उद्योजक या राज्यातील आपले कारखाने, उद्योग बंद करीत आहेत, कारण त्यांना येथे कारखाने चालू ठेवणे परवडत नाही, येथे कर जास्त आहेत, पाण्याचे दर जास्त आहेत, ऑक्ट्रॉय जास्त लागतो. इतर ठिकाणी त्यांना कारखाना उभा करायचा असतो. पण येथील कारखान्याची जमीन विकल्यानंतर, कारखान्यातील कामगारांची देणी दिल्यानंतर राहिलेले ते पैसे तुम्ही इतर राज्यांमध्ये घेऊन जाऊ नका, इतर राज्यांमध्ये उद्योग उभे करण्यासाठी वापरू नका तर याच राज्यामध्ये ते पैसे त्यांनी वापरले पाहिजे, गुंतविले पाहिजेत अशी अट टाकून त्यांना कारखाना बंद करण्यास, जमीन विकण्यास परवानगी देण्याच्या दृष्टीने कायद्यात जर काही बदल करावा लागत असेल तर तो करून या राज्यातील उद्योग धंदे वाढविण्याचाच सरकार विचार करील.

सभापती महोदय, असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या संदर्भात देखील या ठिकाणी काही मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या राज्यातील 92 टक्के

..... जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मलिक ....

कामगार हा असंघटित क्षेत्रातील आहे. म्हणजे संघटित असलेल्या 8 टक्के कामगारांसाठी आपल्याकडे विविध कायदे आहेत मात्र 92 टक्के कामगार जे असंघटित आहेत त्यांच्यासाठी एकही कायदा नाही. आपण माथाडी कामगारांसाठी कायदा करून माथाडी कामगारांना न्याय देण्याची भूमिका घेतली. सुरक्षा रक्षक मंडळ देखील आपण निर्माण केले. गेल्या काळामध्ये आपण बांधकाम उद्योगातील कामगारांसाठी देखील मंडळ निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, यासाठी एक टक्का सेस लावण्यात आलेला आहे. कोठेही 10 लाखापेक्षा जास्त बांधकाम होईल त्याला 1 टक्का सेस त्यावर द्यावा लागणार आहे. ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आता सभागृहाच्या या विशेष बैठकीची वेळ संपत आली आहे आणि अजून दोन मंत्र्यांची उत्तरे येथे व्हावयाची आहेत. ...

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, मी दोन मिनिटात माझे भाषण संपविणार आहे. मी आपल्याला सांगत होतो की, बांधकाम उद्योगातील जे असंघटित कामगार आहेत त्यांच्यासाठी एक बोर्ड तयार करण्यात आलेले आहे. त्यासाठी 1 टक्का सेसची कपात आपण डायरेक्टली ऑन द सोर्स करणार आहोत. बांधकाम खात्याने कामे दिली तर त्यांच्याकडूनही एक टक्का डिडक्शन करून घेणार आहोत आणि या डिडक्शन व्यतिरिक्त जे खाजगी क्षेत्रातील बांधकामे होणार आहेत त्यातून देखील कन्स्ट्रक्शन कॉस्टवर एक टक्का सेस आपल्याला मिळणार आहे. त्यातून आपल्याला अधिक पैसा यासाठी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणारा हा जो असंघटित कामगार आहे त्यांना सुरक्षा देण्यासाठी, त्यांना न्याय देण्यासाठी, त्यांचे प्रश्न दूर करण्यासाठी या मंडळामार्फत आपण काम करणार आहोत.

सभापती महोदय, घरेलू कामगारांसाठी देखील आपण मंडळ निर्माण करणार आहोत. सुरक्षा रक्षक मंडळामध्येदेखील काही बदल करण्याची शासनाची तयारी आहे. याप्रमाणेच इतर जी क्षेत्रे आहेत उदा. सिनेमा क्षेत्र, या क्षेत्रातील जे असंघटित कामगार आहेत मग ते स्पॉट बॉईज् असतील, लाईटमेन्स असतील, ज्युनि. आर्टिस्ट असतील त्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होत आहे. एखाद्या मोठ्या कलाकाराला उदा. शाहरूखखानला 10-15 लाख-कोटी रूपये मिळत असतील. पण त्या क्षेत्रात अगदी खालच्या स्तरावरील जो काम करणारा वर्ग आहे, लाईट घेऊन उभा राहणारा लाईटमन असेल, स्पॉटबॉय असेल, डान्सर असेल, चहा देणारा असेल, त्याला काम

..... जी 3 ...



KBS/MMP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 10:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्यानंतरच पैसे मिळतात. पण तो आजारी पडला तर उपचारासाठी देखील पैसा त्याच्या जवळ राहत नाहीत. म्हणून या सिनेमा क्षेत्रातील असंघटित कामगारांसाठी देखील माथाडींच्या धर्तीवर एखादे बोर्ड निर्माण करून जवळपास दोन अडीच लाख कामगारांना न्याय देण्याची भूमिका घेत आहोत. जेथे जेथे शक्य असेल तेथील सर्वच असंघटित कामगारांना न्याय देण्याची भूमिका या शासनाची राहणार आहे. या विदर्भामध्ये जे खाण कामगार आहेत, त्यांचा सेस केंद्र सरकार वसूल करीत असते. जेव्हा या सर्व खाणींवर केंद्र सरकारचे अधिपत्य होते तेव्हा त्यासाठी हा कायदा करण्यात आला होता. पण आता राज्यांमध्ये सर्वत्र खाजगीकरण झालेले आहे. त्यामुळे त्यांचे प्रश्न राज्य सरकारकडे येतात आणि सेस मात्र केंद्र सरकारकडे जातो. तेव्हा ते सेसचे पैसे या राज्यात आणून या खनिज खाणींमध्ये काम करणारे जे कामगार आहेत त्यांच्या वेल्फेअर करण्याचे काम देखील आपण हाती घेणार आहोत.

सभापती महोदय, प्रश्न बरेच आहेत. त्या सगळ्यांवर उत्तरे द्यायची म्हटले तर अधिक वेळ लागणारच. पण अजून अन्य विभागाच्या मंत्र्यांना देखील या प्रस्तावावर उत्तर द्यावयाचे आहे. सभापती महोदय, स्वयंरोजगाराबाबत देखील काही प्रश्न येथे उपस्थित करण्यात आले. त्यावर उत्तर देण्यासाठी अन्य मंत्र्यांना देखील संधी देणे आवश्यक आहे. मात्र मी या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो की, हा जो मंदीचा काळ आहे त्यात मानसिक मंदी जास्त आहे. त्यातून या राज्यातील, देशातील जनतेला बाहेर आपल्याला काढावयाचे आहे. या मंदीच्या संकटाचे एका संधीत रूपांतर करणे ही शासनाची जबाबदारी राहील. त्यासाठी वेलआऊट पॅकेजची देखील चर्चा झाली. वेलआऊट पॅकेज जेव्हा आपण देतो तेव्हा त्या कामगारापर्यंत या पॅकेजचे पैसे निश्चितपणे गेले पाहिजेत. केवळ कारखानदारांनी हे वेलआऊट पॅकेजचे पैसे घ्यायचे, एक्साईज मध्ये कमी घ्यायचा आणि वर कामगार कपात करायची ही भूमिका आम्ही स्वीकारू देणार नाही. वेलआऊट पॅकेज तयार होईल तेव्हा ते डायरेक्ट कामगारापर्यंत कसे जाईल याचा देखील शासन विचार करील. येणाऱ्या काळात त्यादृष्टीने बैठक घेऊन, या मंदीच्या काळातून राज्याला आणि देशाला बाहेर काढण्यासाठी जे जे म्हणून उपाय करता येतील ते आम्ही करणार आहोत एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

( यानंतर श्री.सरफरे ....एच 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपुडकर (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा परिणाम राज्यातील कामगार, उद्योग धंद्यावर झाल्यामुळे त्याचा परिणाम रोजगार व स्वयंरोजगारावर झालेला आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी नियम 260 अन्वये हा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावावरील चर्चेमध्ये माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, अरुण गुजराथी, नितीन गडकरी, एस. क्यु जमा, दीपक सावंत, अरविंद सावंत तसेच माननीय सदस्या सर्वश्रीमती मधु जैन, नीलम गोऱ्हे यांनी भाग घेऊन आपले विचार मांडले.

माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी राज्यामध्ये स्वयंरोजगार मोठया प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. सेवा योजन कार्यालयामधून देखील आज रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत, हे सेवायोजन कार्यालय आज अस्तित्वातच नाही अशाप्रकारे आपले म्हणणे मांडले. सेवा योजन कार्यालयामार्फत आजपर्यंत देण्यात आलेल्या रोजगाराची परफेक्ट आकडेवारी आता माझ्याजवळ नाही. आज राज्यामध्ये 28 ते 30 लाख बेरोजगार तरुणांची संख्या वाढली आहे. आज प्रसार माध्यमामध्ये 15 टक्के, गुंतवणूक व्यवसायामध्ये 15 टक्के, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये 19 टक्के अशा विविध उपक्रमामध्ये नोकऱ्या उपलब्ध असल्याची आकडेवारी दिलेली आहे. भविष्यात सुध्दा अनेक प्रकारच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात अशाप्रकारच्या सूचना त्यांनी केल्या आहेत. बँकींग व्यवसायामध्ये आज 15 लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे मॉलमध्ये, बांधकाम व्यवसायामध्ये, जाहिरात व्यवसायामध्ये, हॉस्पिटॅलिटीमध्ये, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये, जैविक तंत्रज्ञानामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. या संदर्भात सांगावयाचे झाले तर महाराष्ट्र शासनाच्या सेवा योजन कार्यालयामध्ये आज 32 लाख सुशिक्षित बेरोजगारांची नोंदणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आज वेगवेगळया कॉल सेंटरमध्ये तरुण मुलांना रोजगार उपलब्ध होत आहेत. तसेच, राज्य शासनाच्या व विविध कंपन्यांच्या वेबसाईटवर सुध्दा रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याची माहिती दिली जाते. आजची तरुण मंडळी वेबसाईटवरील माहिती घेऊन खाजगी किंवा शासकीय व्यवस्थापनामध्ये उपलब्ध असलेल्या नोकरीकरिता अर्ज करतात आणि नोकऱ्या मिळवितात. आपापल्या व्यवस्थापनामध्ये रिक्त असलेल्या जागांबाबत खाजगी कंपन्या आणि शासनाच्या विविध विभागामार्फत वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. खाजगी व्यवस्थापनाकडून त्यांच्याकडे असलेल्या नोकऱ्यासंदर्भात वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द केली जात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. सुरेश वरपुडकर....

नाही असे आपले म्हणणे असलेतरी खाजगी कंपन्यांमार्फत कमी प्रमाणात वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. शासनाची "रोजगार वाहिनी" नावाची वेबसाईट असून या वेबसाईटव्दारे शासनाच्या विविध विभागामध्ये उपलब्ध असलेल्या रोजगारांची माहिती प्रसिध्द करण्याचा फार चांगला कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. कॉप्युटर सोसायटी ऑफ इंडियाला राज्य स्तरावर आउटस्टँडीग प्रोजेक्टमध्ये दि. 18.12.2008 ला पहिला क्रमांक प्राप्त झाला आहे. प्रश्न असा आहे की, सेवा योजन कार्यालयामार्फत एखाद्या सुशिक्षित बेरोजगार तरुणाला नोकरीसाठी कॉल लेटर पाठविल्यानंतर आणि त्याला नोकरी मिळाल्यानंतर बेरोजगार तरुणांच्या संख्येमध्ये किती घट झाली याची पुन्हा आकडेवारी आपल्याकडे येत नाही. शासकीय व खाजगी व्यवस्थापनामध्ये नेमक्या किती लोकांना नोकऱ्या उपलब्ध झाल्या याची आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध होत नाही. म्हणून त्या संदर्भात निश्चितपणे सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. मागील काही वर्षात इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ महाराष्ट्रने एक अहवाल तयार केला आहे. त्या सर्व्हे अंतर्गत कोणकोणत्या क्षेत्रामध्ये किती नोकऱ्या उपलब्ध आहेत. त्या नोकऱ्यांमध्ये घट झाली आहे काय? नोकऱ्यांचे प्रमाण प्लस झाले आहे की मायनस झाले आहे? याचा सर्व्हे रिपोर्ट उपलब्ध आहे. त्यामध्ये ॲग्रिकल्चर, फॉरेस्ट, फिशरीज या डिपार्टमेंटमध्ये गेल्या दहा वर्षात 7 टक्के नोकऱ्या कमी झाल्या आहेत. मायनिंगमध्ये आणि मॅन्युफॅक्चरिंगमध्ये 0.3 टक्के नोकऱ्यांमध्ये वाढ झाली आहे, इलेक्ट्रॉनिक, गॅस आणि वॉटर सप्लायमध्ये 0.1 टक्केने वाढ झाली आहे, कंस्ट्रक्शनमध्ये 6 टक्क्यांनी वाढ झाली आहे, ट्रेड, हॉटेल इंडस्ट्रीमध्ये 11 टक्क्यांनी नोकऱ्या वाढल्या आहेत. फायनान्शिअल इंस्टिटयुशनमध्ये 1.2 टक्केनी वाढ झली आहे, कम्युनिकेशन, सोशल आणि पर्सनल सर्व्हिसेसमध्ये मायनस परसेंटेज आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपुडकर ...

आपण सगळ्या उद्योगांचा जर विचार केला तर फक्त अग्रीकल्चर आणि सोशल यामध्ये मायनस आहे आणि बाकीच्या सर्व क्षेत्रामध्ये जवळपास प्लस आहे. यादृष्टीकोनातून विचार करुन महाराष्ट्र शासनाने एक मोठा कार्यक्रम आयोजित केला. कोणकोणत्या नोकऱ्यांमध्ये स्कोप आहे, कोणकोणत्या नोकऱ्यांच्या बाबतीत ट्रेनिंग दिले पाहिजे याचा विचार करुन ते ट्रेनिंग देऊन मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या लावण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम या ठिकाणी केला. आज आपल्या महाराष्ट्र शासनाची काय परिस्थिती आहे ? वर्षाला 10 ते 15 हजार नोकऱ्यांची राज्य शासनाकडे नोंद होते. सरासरी 10 ते 15 हजार किंवा 10 ते 12 हजाराच्या वर नोकऱ्यांचा आपल्याकडे रेकॉर्ड नाही. परंतु महाराष्ट्र शासनाच्या संदर्भामध्ये 60 विविध प्रकारचे कोर्सेस आपण नियमित केलेले आहेत. त्यामध्ये आपण पाहिले तर शाश्वत रोजगार योजनेच्या मंजुरीच्या संदर्भात आपण प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये बीपीओ कॉल सेंटरच्या संदर्भात विविध प्रोग्राम्स आहेत. संगणीकरणाच्या संदर्भात विविध प्रोग्राम्स आहेत. नर्सिंगमध्ये वेगवेगळे प्रोग्राम्स आहेत. पॅरामेडिकल कोर्सेसमध्ये विविध कोर्सेस आहेत. ज्वेलरीमध्ये विविध कोर्सेस आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी हिऱ्याच्या बाबतीत उद्योग केला होता. त्यासंदर्भात ट्रेनिंग देण्याच्या संदर्भात आपण कोर्सेस केलेले आहेत. हॉटेल मॅनेजमेंटच्या संदर्भात कोर्सेस आहेत. मोटार ड्रायव्हींगच्या संदर्भात कोर्सेस आहेत. फायर ब्रिगेडच्या संदर्भात कोर्सेस आहेत. ॲव्हिएशनच्या संदर्भात कोर्सेस आहेत. असे 60 ते 70 कोर्सेस आहेत. या संदर्भामध्ये महाराष्ट्र शासनाचा जो कार्यक्रम आहे त्याचा खर्च जवळपास 250 कोटी रुपये आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितले की, अनुसूचित जाती जमातीच्या संदर्भात वेगळे कोर्सेस असले पाहिजेत. त्यासंदर्भात प्रशिक्षण सध्या चालूच आहे पण ते कमी प्रमाणात आहे. 50 कोटी रुपयांचा कार्यक्रम घेऊन अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना प्रशिक्षण देण्याचे काम आपण करीत आहोत. आदिवासींना प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात 35 कोटी रुपयांचा कार्यक्रम आपण घेतो. शाश्वत नोकरीच्या संदर्भातील प्रशिक्षण या कार्यक्रमामध्ये आहे. या कार्यक्रमाची जर पूर्णपणे अंमलबजावणी झाली तर वर्षाला जवळपास साडेतीन लाख लोकांना प्रशिक्षित करुन नोकरी देण्याच्या संदर्भातील कार्यक्रम आहे. एकदा नोकरी लागल्यानंतर त्याला कमीतकमी साडेतीन हजारपर्यंत पगार मिळत असेल तर त्याला 500 रुपयांचे अनुदान देण्याचे

...2...

श्री. सुरेश वरपुडकर....

शासनाचे धोरण राहणार आहे. 5 हजार रुपयांपर्यंत पगाराची नोकरी लागली तर त्याला 1 हजार रुपये अनुदान देण्याची योजना राहणार आहे. अशा विविध योजनांच्या संदर्भामध्ये आता एक नोट लवकरच कॅबिनेटसमोर घेऊन जाणार आहोत. त्याला जर मान्यता मिळाली तर विविध क्षेत्राच्या संदर्भात हे काम होऊ शकते. आपण या ठिकाणी सगळ्यात महत्वाच्या गोष्टीचा विचार केला तर ट्रान्स्क्रीप्शनच्या दृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. मी खासदार असताना सायन्स अँड टेक्नॉलॉजी समितीचा सदस्य होतो. या सायन्स अँड टेक्नॉलॉजीमध्ये आजही आपल्या भारतामध्ये कॉल सेंटर्समध्ये हे प्रयत्न चालू आहेत. औरंगाबाद, पुणे, मुंबई यासारख्या ठिकाणाचा आपण विचार करतो. त्या ठिकाणी काय चालू आहे ? जे मेडिकल ट्रान्स्क्रीप्शन आहे त्याच्या संदर्भामध्ये विचार केला तर अमेरिकेमध्ये जे डॉक्टर्स असतात त्या ठिकाणी रात्रीचे काम असेल तर दिवसा काम मिळत नाही. त्या ठिकाणी वेळ कमी असतो. आपल्याकडे त्यासंदर्भातील टेक्नॉलॉजी असल्यामुळे ती बाब थोडी स्वस्त आहे. तेथील जे रेकॉर्ड आहे त्याचे पूर्ण ट्रान्स्क्रीप्शन या ठिकाणी करतात आणि ती पूर्ण फाईल परत त्या ठिकाणी पाठवतो. अशा प्रकारचा फार मोठा उद्योग भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये चालू आहे. आपल्याला नोकरीच्या दृष्टीकोनातून ट्रान्स्क्रीप्शनच्या संदर्भात काय करता येईल, विविध घटक विकण्याच्या संदर्भामध्ये काय ट्रान्स्क्रीप्शन करता येतील, या सर्व उद्योगांचा आपण या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विचार करीत आहोत. भविष्यामध्ये या प्रशिक्षणाचा विचार जर या ठिकाणी झाला तर निश्चित स्वरुपामध्ये महाराष्ट्रातील युवकांना चांगल्या प्रकारची संधी उपलब्ध होऊ शकते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एक प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला होता. त्यांची मुख्य मागणी अशी होती की, स्थानिक भूमिपुत्रांच्या संदर्भात आपण काय केले ? मागच्या मंत्रिमंडळाच्या काळात आपण एक जी.आर. नुकताच काढलेला आहे. त्या जी.आर. प्रमाणे स्थानिक भूमिपुत्रांना 80 टक्के नोकऱ्या द्यावयाच्या आहेत. सुपरवायजरी कॅडरमध्ये 50 टक्के आणि बाकीचे लेबरमध्ये अशा प्रकारे 80 टक्क्याच्या संदर्भात आपण जी.आर. काढलेला आहे. सुपरवायजरच्या कॅडरमध्ये आपण कमीतकमी 50 टक्क्याची प्रोव्हीजन केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.रामनाथ मोते ) :** सभागृहाची वेळ 10.45 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमध्ये जो गोंधळ सुरु आहे, त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आपल्या राज्यात कम्पलसरी नोटिफिकेशन ऑफ एम्प्लॉयमेंट एक्सचेंज ॲक्ट आहे. या कायद्यातील तरतुदीच्या अधिन राहून एम्प्लॉयमेंट एक्सचेंजलाच नोडल एजन्सी म्हणून नेमले पाहिजे. कारण वेब साईटवरुन डायरेक्ट रिक्रुटमेंट होतात. त्यामुळे त्यांना कळत नाही. कोणत्याही क्षेत्रामध्ये नेमणुका झाल्या तर त्याची माहिती त्यांच्याकडे आली पाहिजे. उदाहरण म्हणून मी सांगेन की, सावंत यांनी नोंदविलेलेच नसते. म्हणून हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर एम्प्लॉयमेंट एक्सचेंजलाच नोडल एजन्सी म्हणून नेमले पाहिजे. त्यामुळे त्यांना माहिती मिळू शकेल.

श्री.सुरेश वरपुडकर : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी केलेल्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल. स्थानिकांना 80 टक्के नोक-या देण्याच्या संदर्भात दिनांक 17.11.2008 रोजी जी.आर.काढला आहे. जिल्हा स्तरावर वेगवेगळया जिल्हयाचे जिल्हाधिकारी व अधिकारी यांची त्या त्या जिल्हयात कमिटी नेमली आहे. राज्य स्तरावर विकास आयुक्त व उद्योग संचालक यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. त्यांनी 3 महिन्यामध्ये सर्वेक्षण करुन 80 टक्के स्थानिकांना नोक-या मिळाल्या किंवा नाही यासंबंधीची माहिती घेऊन त्यांना पुढील कार्यवाही करण्याचे पूर्ण अधिकार या जी.आर.नुसार दिले आहेत. या सर्व मुद्यांचा विचार करुन भविष्यात रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या माध्यमातून प्रशिक्षण देणे, उद्योगांना चांगल्या प्रतीचे कामगार, कुशल कामगार तयार करुन देण्याचे काम महाराष्ट्र सरकार करील, एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.अरविंद सावंत : खाजगी आस्थापनांनी या जी.आर.ची अंमलबजावणी केली नाही तर त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार काय ?

श्री.सुरेश वरपुडकर : जी.आर.मध्ये खाजगी आस्थापनांवर कारवाई करण्याची तरतूद असून त्या कमिटीला पूर्ण अधिकार दिलेले आहेत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक : रोजगार हमी योजनेबाबत शासनाची भूमिका कशी राहणार आहे असे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मला चिठ्ठी पाठवून विचारले आहे, त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, रोजगार हमी योजनोचा संपूर्ण पैसा खर्च होईल याची दक्षता घेण्यात येईल. केंद्र सरकारकडूनही या योजनेसाठी पैसा मिळत असल्यामुळे या योजनेसाठी जास्तीत जास्त खर्च करण्याची शासनाची भूमिका आहे.

-------

3...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मी मांडलेल्या प्रस्तावावर शासनाच्यावतीने माननीय कामगार मंत्री श्री.नवाब मलिक यांनी उत्तर देत असताना असे म्हटले की, भविष्यामध्ये येणा-या संकटाला तोंड देण्यासाठी हे सरकार सकारात्मक भूमिका घेत आहे. पण या विषयाची व्याप्ती व गांभीर्य इतके जास्त आहे ते विचारात घेता अद्याप काही प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. याचे कारण संपूर्ण जगावर मंदीचे सावट पडले आहे. अमेरिका, युरोप, रशिया या देशांमध्ये सुध्दा मंदीचे सावट आहे. या देशांमध्ये अनेक भारतीय तरुण नोक-या करीत आहेत. त्या तरुणांच्या तेथील नोक-या गेल्यामुळे ते भारतात परत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जे अनिवासी भारतीय आहेत, नोकदार आहेत मग अगदी धुण्याभांडयाचे काम करणा-यांपासून ते सॉफ्टवेअर इंजिनिअरपर्यंतच्या सर्व लोकांसमोर बेकारीचा प्रश्न उभा राहिला आहे. लॉस एंजेलिसमध्ये राज्यातून जास्तीत जास्त बुध्दीमान तरुण नोकरीसाठी गेलेले आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचे काम शासनाला करावे लागणार आहे. तेथे गेल्यावर त्यांची लाईफ स्टाईल बदलली होती आणि आता येथे आल्यावर त्यांना त्याच लाईफ स्टाईलमध्ये राहता येणार नाही, हा देखील प्रश्न आहे. अशा तरुणांचा राज्यामध्ये कसा उपयोग करुन घेतला जाणार आहे आणि त्यासाठी काय उपाययोजना केली जाणार आहे ते देखील स्पष्ट झाले पाहिजे. माननीय कामगार मंत्र्यांनी समर्थपणे उत्तर दिले आहे. पण जागतिक मंदी हा केवळ कामगार विभागाचा विषय आहे असे नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड....)

या मंदीवर उत्तर शोधण्यासाठी विविध खात्यांनी एकत्रित काम केले पाहिजे. केवळ कामगार खात्यावर अवलंबून राहून चालणार नाही तर उद्योग खाते, अर्थ खाते, ग्राम विकास खाते, कामगार खाते, गृह खाते, उच्च व तंत्र शिक्षण खाते या सर्वांनी एकत्र बसून एक कायम स्वरुपी उच्चस्तरीय समिती शासनाला निर्माण करावी लागणार आहे. त्या समितीमध्ये अर्थतज्ज्ञ घ्यावे लागतील. जागतिक मंदीचा देशावर काय परिणाम होणार आहे यासाठी एक उच्चस्तरीय समिती सरकारने स्थापन करावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अतिशय चांगले विचार या ठिकाणी मांडले. राजकीय मतभेद असले तरी राज्याच्या विकासाच्या प्रश्नामध्ये त्यांनी पूर्णपणे सहकार्याची भूमिका दर्शविली. महात्मा गांधींनी देशापुढे मांडलेला विचार, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी स्वीकारलेले धोरण आणि राजीव गांधी यांनी 21व्या शतकाकडे नेताना आखलेले धोरण याची त्यांनी प्रशंसा केली. मंदीवर उत्तर शोधत असताना शहरी भागातील लोकसंख्या आज 47 टक्क्यावर आलेली आहे हे देखील आपण लक्षात घेतले पाहिजे. भविष्यामध्ये शहरी आणि ग्रामीण भागातील लोकसंख्या 50-50 टक्के होईल. चीनमध्ये लोकसंख्येचा विचार करता कॉटेज इंडस्ट्री सुरु केलेली आहे. आपल्या शासनाला देखील त्या दृष्टीकोनातून सपोर्टिंग सिस्टिम आखावी लागेल. सरकारने या दृष्टीकोनातून काम करावे अशी आमची अपेक्षा आहे. आपल्या देशामध्ये आणि विशेषत: राज्यामध्ये बचत गटाच्या माध्यमातून महिला बचत गटांचे काम उत्तम पध्दतीने चाललेले आहे. बचत गट काम करीत असताना त्यांच्यासाठी मार्केटिंगची व्यवस्था अतिशय प्रभावी करणे आवश्यक आहे. कारण या बचत गटांनी निर्माण केलेला माल विकला गेला नाही तर ते चालू शकणार नाहीत आणि केवळ 4 टक्के कर्ज घेऊन हा प्रश्न सुटणार नाही. म्हणून बचत गटांच्या बाबतीत त्यांचा रोजगार सतत चालू राहील या दृष्टीकोनातूनही निर्णय घ्यावा लागेल. इन्फ्रास्ट्रक्चरची निर्मिती करण्याचे शासनाचे धोरण आहे. परंतु हे मशिनमेड न करता माणसे कशी कामाला लागतील अशा पध्दतीचे धोरण आखावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, मंदीची संधी घेण्याचा विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. ज्यांची क्रयशक्ती आहे असेच लोक या मंदीची संधी घेऊ शकतात. म्हणून सामान्य माणसाची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड...)

क्रयशक्ती वाढवावी जेणे करुन तो खरेदी करु शकेल.

सभापती महोदय, सुरक्षा रक्षकाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, मुंबई शहरामध्ये 3 लाख सुरक्षा रक्षक आहेत आणि बोर्डामध्ये फक्त 15 हजार सुरक्षा रक्षकांची नोंद झालेली आहे. कामठीपुरामध्ये टॉप सेक्युरिटीमधे 5 हजार सुरक्षा रक्षक काम करीत आहेत. काही दरोडेखोर देखील सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत आहेत. मुंबईमध्ये आतंकवादी हल्ला झाला. या पाश्वभूमीवर प्रत्येक सुरक्षा रक्षाकाची नोंद बोर्डामध्ये झाली पाहिजे. तसेच सुरक्षा रक्षक नेमल्यानंतर त्याची संपूर्ण माहिती पोलीस स्टेशनला द्यायला पाहिजे गावातील लोकांना सुरक्षा कशी करावी हे चांगले माहीत असल्यामुळे भूमिपुत्रांनाच सुरक्षा रक्षक नेमणे अधिक चांगले. मतदारसंघनिहाय सुरक्षा रक्षकाच्या नेमणुका सुरु झाल्या होत्या. तेव्हा मी उपस्थित केलेल्या मुद्यांच्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. नवाब मलिक : मंदीच्या संदर्भात विदेशामध्ये काम करणारे भारतीय टेक्निशियन जेव्हा परत येतील त्यावेळी त्यांच्याबाबतीत काय उपाययोजना करणार असा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला. त्यासंदर्भात केन्द्र शासनाला शिफारस करण्यात येईल. तसेच विविध खात्यांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे येथे सांगण्यात आले. यानुषंगाने करावयाच्या उपाययोजनेच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विविध खात्यांचे सचिव, खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी, नॅसकॉमचे लोक यांची समिती स्थापन करण्यात येईल. सुरक्षा रक्षकाच्या संदर्भात मी सांगेन की, कोणत्याही सुरक्षा रक्षकाची नोंदणी झाली नाही तर त्याला काम करता येणार नाही अशी शासनाची भूमिका राहील. सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणा-याची माहिती पोलीस स्टेशनला दिली नसेल किंवा नोंदणी न झालेल्या सुरक्षा रक्षकाची कोणी नियुक्ती केली असेल तर त्याच्यावरही कारवाई करण्याची शासनाची भूमिका राहील.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्यासाठीचा शासनाने जो जी.आर.काढलेला आहे, त्या जी.आर.चे कायद्यात रुपांतर करण्यात येईल काय ? आस्थापनेवरील ठोस कार्यवाहीचे स्वरुप या ठिकाणी सांगितले जाईल काय ? या ठिकाणी टॅक्सीचा मुद्दा उपस्थित केला गेला. मुंबई शहरात सर्वात मोठा व्यवसाय टॅक्सीचा आहे. या व्यवसायावर लाखो लोक अवलंबून आहेत. टॅक्सीवाल्यांनी टॅक्सीचे परिवर्तन केल्यानंतर त्यांना शासनाकडून कोणकोणते फायदे दिले जाणार आहेत, त्याबाबतची माहिती एका पत्रकाव्दारे टॅक्सी चालकांपर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल काय ?

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, भूमिपुत्रांना नोक-यांमध्ये सामावून घेण्यात यावे यासंबंधीचा जी.आर.शासनाने काढलेला आहे. या मंदीच्या लाटेतून सर्व उद्योजकांना विश्वासात घेऊन या जी.आर.ची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाईल यासंबंधी लक्ष घालण्यात येईल. यासंबंधीचा जो जी.आर.काढलेला आहे, त्याचे कायद्यात रुपांतर करता येईल काय यादृष्टीने तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. टॅक्सीच्या संदर्भात तिसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. दिल्ली शहरात टॅक्सी चालकांच्या संदर्भात अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यांना काही प्रमाणात सबसिडी देण्यात आली. तशाच प्रकारे सबसिडी देण्यासंबंधी काय करता येईल? रजिस्ट्रेशन फी मध्ये काही सवलत देता येईल काय? एक्साईजमध्ये काही सवलती देता येतील काय? यादृष्टीने शासन विचार करील. टॅक्सींचा चेहरा मोहरा बदलून मुंबई शहरात एक वेगळे चित्र निर्माण करण्याची शासनाची भूमिका आहे आणि त्यासाठी परिवहन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलाविण्यात येईल. त्या बैठकीस कामगार मंत्री म्हणून मी उपस्थित राहीन, आपल्याला देखील त्या बैठकीस बोलाविण्यात येईल. त्या बैठकीत एक ठोस उपायोजना काय करता येईल याबाबतीत चर्चा करु आणि त्यात काय उपायोजना करण्यात आली आहे त्याबाबतची माहिती जनतेसमोर निश्चितपणे आणू.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी "वन विन्डो"ची कार्यवाही तातडीने करण्यात येईल असे सांगितले. यासंदर्भात शासनाच्या वतीने या सभागृहात अनेक वेळा आश्वासने देण्यात आली आहेत. आपल्याकडे अनेक प्रस्ताव पेडींग आहेत. उद्योग विभाग, पर्यावरण विभाग, नगररचना विभाग यांच्याकडे नो ऑब्जेक्शन्स सर्टिफिकेट मिळण्यासंबंधीचे प्रस्ताव वन विन्डो करण्यासंदर्भात किती दिवसात शासन निर्णय घेईल? आय.टी.आय.मध्ये वेगवेगळे कोर्सेस सुरु

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

आहेत. ते कोर्सेस नवीन टेक्नॉलॉजीप्रमाणे बदलण्याची आवश्यकता आहे. वेल्डींगचा कोर्स आय.टी.आय.मध्ये सुरु आहे. आता अल्यूमिनियम वेल्डींगचा कोर्स सुरु करण्याची आवश्यकता आहे. सॉफ्टवेअरचे कोर्सेस आहेत. आय.टी.आय.मधील कोर्सेस बदलण्याचा शासन निर्णय घेईल काय ?

श्री. नवाब मलिक : वन विन्डोच्या संदर्भात किती कालावधी लागणार आहे असा प्रश्न विचारण्यात आला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, या राज्यात वन विन्डो सिस्टीम तीन महिन्यात लागू करण्याची कार्यवाही शासनाकडून केली जाणार आहे. दुसरा प्रश्न आय.टी.आय.मध्ये कालबाहय झालेले कोर्सेस सुरु आहेत. आय.टी.आय.मधील जुने कोर्सेसचे ट्रेनींग पूर्ण घेतल्यानंतरही नोक-या मिळत नाहीत अशी वस्तुस्थिती आहे. बदलत्या युगात तरुणांना लागलीच रोजगार निर्मिती मिळेल अशा प्रकारचे कोर्सेस आय.टी.आय.च्या माध्यमातून सुरु करण्याची शासनाची भूमिका आहे. अल्यूमिनियम वेल्डींग ट्रेनिंग आहे. स्टील वेल्डींग ट्रेनिंग आहे. फिजीकल फिटनेस ट्रेनिंग आहे. ज्या कोर्सेसमधून रोजगार निर्मिती होऊ शकते असे कोर्सेस डिझाईन करुन ते कोर्सेस आय.टी.आय.मध्ये सुरु करण्याचा निश्चितपणे शासनाकडून प्रयत्न केला जाईल.

डॉ.नीलम गो:हे : सभापती महोदय, असंघटित क्षेत्राच्या संरक्षणा संदर्भात बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी प्रश्न विचारला होता की, महिला बचत गटांना कामगार विभागातर्फे आर्थिक सुरक्षा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून जे जे विभाग महिला बचत गटांना चालना देत आहेत.शहरी विभागात आणि ग्रामीण विभागात महिला बचत गटांचे वेगवेगळे व्यवसाय आहेत. उद्योगामध्ये अनेक कामे अशी आहेत की, कंपन्यांमधील कामे आऊट सोर्सींगने केली जात आहे. कंत्राटी कामगार घेऊन ती केली जात आहेत. महिला बचत गटांना अधिक चालना मिळावी यासाठी शासन काही पावले उचलेल काय ?

श्री. नवाब मलिक : या देशातील आणि राज्यातील महिलांची लोकसंख्या 50 टक्के एवढी आहे. नारी शक्ती वाढविणे ही शासनाची कायमची भूमिका आहे. महिला बचत गटामार्फत जो उद्योग चालतो, त्या उद्योगातून ज्या वस्तू तयार करण्यात येतात, त्यांना चांगली बाजारपेठ निर्माण करुन देण्याचा शासन प्रयत्न करील. त्याचप्रमाणे आऊट सोर्सींगची कामे आहेत, ती महिला बचत गटांना मिळवून देण्यासाठी ज्या काही उपायोजना कराव्या लागतील, त्या उपाययोजना शासनाच्या वतीने करण्यात येतील.

3...



ABG/ SBT/ KGS/ KTG/ प्रथम श्री.शिगम 10:40

श्रीमती अलका देसाई : टॅक्सी धारकांना सबसिडी देण्याचा शासनाचा मानस दिसतो आहे. परंतु मुंबई शहरात काही लोकांकडे दहा-दहा टॅक्सी आहेत. ते टॅक्सी मालक वाहन चालक ठेवून टॅक्सी व्यवसाय करतात. अशा टॅक्सी मालकांना दहा टॅक्सीची सबसिडी देणार आहात की जो टॅक्सी चालविणारा वाहन चालक आहे, त्यास सबसिडी देणार आहात काय ?

श्री. नवाब मिलिक :. जुनी वाहने स्क्रॅब करावयाची आहेत. ऑटोमोबाईल इंडस्ट्रीजला काही कामे द्यावयाची आहेत. शासन अशा गोष्टींच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेत असते सन्माननीय सदस्यांनी उल्ल्ेख केल्याप्रमाणे टॅक्सीच्या संदर्भातील दोन-चार प्रकरणे असू शकतात. जुनी टॅक्सी स्क्रॅब करा आणि नवीन टॅक्सी खरेदी करा अशी भूमिका शासनास स्वीकारता येत नाही. परंतु अजून काही टॅक्सी धारकांना परमीट देता येईल काय ? मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करता येईल काय ? यासंबंधीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 10:45

श्री.नवाब मलिक.........

त्यात संधी असेल तर अधिक लोकांना रोजगार मिळावा म्हणून शासन कारवाई करेल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कायद्यात शासनाने बदल केला आणि शासनाचे जे कॉन्ट्रिब्यूशन द्यायचे होते ते बंद केले. कारण योजनेचा निधी खर्च होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जामा यांनी कॉटेज इंडस्ट्रीबाबत सूचना केली, त्यासंबंधी मंत्रीमहोदयांनी सकारात्मक भूमिका मांडली. परंतु त्यासाठी निधीची गरज आहे. रोजगार हमी योजनेच्या कायद्यात बदल करण्याची गरज आहे. जोपर्यंत हा बदल होत नाही तोपर्यंत शासनाचा निधी खर्च होणार नाही. संपूर्ण निधी इन्फ्रास्ट्रक्चर, रस्ते आणि विहिरी यावरच खर्च करुन उपयोग होणार नाही. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची तरतूद रोजगार हमी योजनेमध्ये नाही. सुशिक्षित बेरोजगारांचा अंतर्भाव या योजनेत केला तर त्यांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्याप्रमाणे शासन कायद्यात बदल करणार आहे का?

श्री.नवाब मलिक : अखर्चित पैसा लॅप्स होऊ नये म्हणून कायद्यात बदल केला गेला. शासनाची ही भूमिका असेल की, ग्रामीण भागात रोहयोची कामे पूर्ण होत नसतील, पैसा खर्च होत नसेल तर शहरी भागात..........

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी माझा मुद्दा समजून घ्यावा. शहरी आणि ग्रामीण असा मुद्दा नसून ग्रामीण भागात सुध्दा सुशिक्षित मुले आहेत.

श्री.नवाब मलिक : त्याबाबत उपाययोजना करुन सुशिक्षित बेरोजगारांच्या दृष्टीने कामाचा अंतर्भाव यामध्ये करण्यात येईल. त्याबाबत अभ्यास करुन सुशिक्षित बेरोजगार माती उचलू शकत नाहीत, रस्ता बनविण्याचे काम करु शकत नाहीत परंतु इतर कामे करु शकतात. कामाचे डिझाईन तयार करु शकतात, कॉम्प्युटरवर काम करु शकतात, रोस्टरचे काम करु शकतात. सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली आहे त्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर याठिकाणी चर्चा झालेली आहे. आर्थिक मंदीचे हे संकट संधीमध्ये कसे रुपांतरित करता येईल यादृष्टीने सर्व संबंधित तज्ज्ञांची बैठक बोलावून या संकटाचा विचार व्हावा, केवळ वांझोटी चर्चा झाली असे होऊ नये.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक : मी यापूर्वीच जाहीर केले की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमणार आहात त्या समितीमध्ये कामगार क्षेत्रातील, उद्योग क्षेत्रातील, शासनाचे प्रतिनिधी आणि विविध गटनेत्यांचा समावेश करणार आहोत. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे त्या समितीमध्ये जो विचार होईल, ज्या उपाययोजना सुचविण्यात येतील त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सकाळी 10.48 ते 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( **स्थगिती नंतर** )

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पॉइंट ऑफ प्रोसिजरसंबंधी**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराला सुरुवात करण्यापूर्वी मी फक्त अर्ध्या मिनिटात माझा मुद्दा निदर्शनास आणून देणार आहे. तो म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "अलिबाग जिल्ह्यातील एका गावात गावठी दारु पिऊन जे मृत्युमुखी पडले" अशा महत्वाच्या विषयाच्या संदर्भात सभागृहात नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्या सूचनेच्या संदर्भात माननीय सभापतींनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी, अशी मान्यता दिली. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये ही चर्चा दाखविलेली नाही. खालच्या सभागृहात हा स्थगन प्रस्ताव फेटाळण्यात आला होता परंतु आजच्या कामकाज पत्रिकेत ती चर्चा त्या सभागृहात दाखविलेली आहे. आपल्या कामकाज पत्रिकेत ती न दाखविण्यात कोणती अडचण होती हे समजले नाही.

**उपसभापती** : यासंदर्भात माननीय सभापतींशी चर्चा करुन शनिवार दिनांक 27 डिसेंबर, 2008 रोजी ही चर्चा आपण घेऊ.

---------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**वाढीव महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(1) * 46230 श्री. वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, श्री.दिलीपराव सोनवणे , प्रा. बी. टी. देशमुख :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दरवेळी महागाई भत्ता वाढ देतांना "प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे शासन आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता रहाणार नाही" "मंजूर अनुदानातच तो खर्च करावा" असे शासनाचे स्पष्ट आदेश असतांना दरवेळी महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अमरावती जिल्हा कार्याध्यक्षांनी दिनांक 23 ऑगस्ट, 2008 रोजी किंवा त्या दरम्यान मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे शिक्षणाधिकारी (माध्य.) अमरावती, यांच्यामार्फत एक निवेदन पाठवून केलेली आहे, हे खरे आहे काय,

(2) क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या या धोरणामुळे दिनांक 1 जानेवारी 2008 पासून लागू झालेल्या वाढीव महागाई भत्याचा शासन निर्णय जरी दिनांक 16 मे, 2008 रोजी निर्गमित झाला असला तरी त्याची प्रत्यक्ष अमंलबजावणी माहे जुलै-ऑगस्ट, 2008 मध्ये करण्यात आल्याचे या तक्रारीत नमूद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) "पुरवणी मागणी मान्य झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत थकीत देयके देऊ नये" असे आदेश (क्रमांक:अमाशा/2007-08 वाढीव म.भ./15 क 4) शिक्षण संचालकांनी दिनांक 6 ऑक्टोबर, 2007 रोजी काढले व बरीच आंदोलने झाल्यानंतर त्याच शिक्षण संचालकांनी दिनांक 12 जून, 2008 रोजी आदेश (क्रमांक अशामा/08-09/वाढीव म.भ./15 क 4) काढून "वरील परिस्थितीचा विचार करता वेगळी तरतुद उपलब्ध झालेली नसली तरी मुळ मंजूर तरतुदीतून वाढीव महागाई खर्च करण्याची परवानगी दिली ही गोष्ट खरी आहे काय",

(4) सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(5) नसल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**डॉ.पतंगराव कदम** : (1) होय.

(2) होय.

(3) दिनांक 1 जुलै, 2007 पासुन मान्य झालेला वाढीव झालेला महागाई भत्ता नियमीत तरतूदीतून अदा करावा तथापी थकबाकी पूरक मागणी मान्य झाल्याशिवाय देवू नये असे शिक्षण संचालकांनी दिनांक 6 ऑक्टोबर, 2007 च्या पत्रान्वये निर्देश दिलेले होते. त्याच धर्तीवर दिनांक 1 जानेवारी, 2008 पासुन मान्य झालेला वाढीव झालेला महागाई भत्ता नियमीत तरतूदीतून अदा करावा तथापी थकबाकी पूरक मागणी मान्य झाल्याशिवाय देवू नये असे शिक्षण संचालकांनी दिनांक 12 जून, 2008 च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

(4) व (5) राज्य शासनाने दिनांक 15 ऑक्टोबर, 2008 च्या शासन निर्णयान्वये जुलै, 2008 पासुन मान्य केलेला 7% वाढीव महागाई भत्ता शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमीत वेतनात अदा करण्याबाबत दिनांक 16 ऑक्टोबर, 2008 च्या पत्रान्वयें शिक्षण संचालकांना निर्देश देण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने शिक्षण संचालकांनी सर्व शिक्षणाधिकाऱ्यांनी दिनांक 1 नोव्हेंबर, 2008 च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

----------

.....3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 46230.......

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. कारण ज्यावेळेस केंद्राप्रमाणे वाढीव महागाई भत्ता राज्यातील कर्मचाऱ्यांना लागू होतो तो एकाच वेळी सर्वांना लागू करावा असा शासन निर्णय 6 जानेवारी, 2000 रोजी शासनाने काढलेले आहे. त्यात असे म्हटले आहे की, सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबतचे वित्त विभागाचे आदेश मान्यताप्राप्त शाळातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील व त्यासाठी प्रत्येक वेळेस स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता असणार नाही. असे असतानाही सहा सहा महिने या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ही रक्कम दिली जात नाही, याचे कारण काय ? तसेच ज्यावेळेस शासकीय कर्मचाऱ्यांना हे आदेश लागू होतील त्याच वेळेस शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करणार काय ?

डॉ. पतंगराव कदम : महोदय, हे खरे आहे की, विभागातील काही लोकांनी ही चूक केली आहे. परंतु शासनाने यासंबंधीचे कालच स्पष्ट असे आदेश काढलेले आहेत की अशा प्रकारे पुन्हा आदेश काढण्याची आवश्यकता नाही. ज्यावेळेस सरकारी कर्मचाऱ्यांबाबतचा निर्णय होतो त्याच वेळेस शिक्षकांना सुध्दा महागाई भत्त्याची रक्कम देण्यात यावी.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे. परंतु गेली दोन वर्षे शासनाचे शिक्षण संचालक व उपसंचालक तसेच शिक्षणाधिकारी असा प्रकार करीत आहेत. अशा प्रकारे प्रत्येक जण वेगवेगळे आदेश काढतो म्हणून याच सभागृहात यासंबंधी चार-पाच वर्षापूर्वी मोठा संघर्षही झाला होता. यासंबंधीच्या आदेशांमध्ये असे लिहिलेले असते की, यासंबंधी वेगळे आदेश काढण्याची आवश्यकता नाही, त्या अनुदानातूनच वाढीव महागाई भत्ता देण्यात यावा. तरी सुध्दा हे कृपावंत होऊन असे लिहितात की, आता फार आंदोलने होत आहेत, आता सर्व देऊन टाका. याचा अर्थ हे शिक्षणाधिकारी, संचालक व उपसंचालक शिक्षकांवर मेहेरबानी करीत आहेत असा होता अशा प्रकारे शासनाने घेतलेल्या आदेशांची अंमलबजावणी हे अधिकारी करीत नाहीत. म्हणून ज्यावेळेस शासकीय कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता लागू होईल त्याच वेळेस या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही तो लागू करणार काय ? तसेच ज्या अधिकाऱ्यांनी हे काम केले त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :46230....**

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख तसेच सन्माननीय सदस्य श्री. खोटरे साहेबांनी यांनी जे प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात आदेश काढण्यात आलेले असून ज्या अधिका-यांनी यासंदर्भात चुका केल्या असतील त्यांची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

---------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात फेरीवाला धोरण लागू करण्याबाबत**

**(2) * 48190 श्री. संजय पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक 45574 ला दिनांक 23 जुलै, 2008 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात फेरीवाला धोरण लागू करण्याच्या शासनाच्या विचाराधीन बाबीवर निर्णय घेण्यात आलेला आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रकरणी अद्याप निर्णय घेतलेला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ, श्री. अशोक चव्हाण यांच्या करिता: 1),2),3) राष्टीय फेरीवाला धोरण राज्यात लागू करण्यासंदर्भात अद्याप शासनस्तरावरुन अंतिम निर्णय झालेला नाही. सदर धोरण लागू करण्यासाठी आवश्यक कायदेशीर व संरचनात्मक व्यवस्था व इतर उपाययोजनांविषयी विचार निनिमय चालू असून लवकरच याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये शासनाने फेरीवाल्यांसाठी कोणते धोरण केलेले आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय,सन 2008 साली केन्द्र सरकारच्या नगरविकास आणि दारिद्रय निर्मुलन खात्याने रस्त्यावर किरकोळ विक्री करणा-या फेरीवाल्यांसाठी एक राष्ट्रीय धोरण आखावे, अशी सूचना उच्चतम न्यायालयाने केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जे धोरण ठरेल त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाचे प्रधान सचिव व नगरविकास खात्याचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. या विषयाच्या संदर्भात या समितीच्या अनेक बैठका झाल्या आहेत. फेरीवाल्यांसाठी व्यवसाय विनिमय करणे, कायदेशीर रचना निर्माण करणे व त्यांच्यासाठी कायद्यामध्ये आवश्यक असेल ते बदल करणे, कलम 101 ची तरतूद करणे, यासारख्या अनेक सूचना समितीने केल्या होत्या. मुंबईचे लोकप्रतिनिधीची या विषयाच्या संदर्भात एक बैठक सुध्दा घेण्यात आली असून या बैठकीत मुंबईच्या लोकप्रतिनिधींच्या सूचनाही घेण्यात आल्या होत्या. गरीब फेरीवाल्यांसाठी एक चांगले धोरण शासन तयार करीत आहे.

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : **48190** ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी फेरीवाल्यांच्या संदर्भात आमदाराची बैठक घेतली होती व या बैठकीत आमदारांच्या सूचनाही घेण्यात आल्या होत्या, असा उल्लेख केलेला आहे. या बैठकीमध्ये आम्हाला प्रारुप दिले जाईल, असे सांगण्यात आले होते परंतु अजूनपर्यंत आम्हाला यासंदर्भातील प्रारुप प्राप्त झालेले नाही. मुंबईमध्ये रोजच्या रोज हजारो परप्रांतीय येत आहेत. या परप्रांतीयांना कायदेशीर करण्याचे धोरण सुरु आहे. जे फेरीवाले आहेत, त्यांना इमारतीमध्ये जागा दिली जात आहे. परंतु जे धोबी आहेत, इस्त्री करणारे आहेत, ते फेरीवाले नाहीत. खरे म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणात फेरीवाले असावे, असे निर्देश असतांनाही त्या निर्देशाचे पालन शासनातर्फे केले जात नाही. मुंबईमध्ये आपण फेरीवाला झोन निर्माण करणार आहात. ते ही अनुत्तरित आहे. लोकसंख्येच्या मानाने फेरीवाले असावे असा महानगर पालिकेने प्रस्ताव केलेला आहे, असे निवेदन केल्यामुळे मी त्यावेळी खूप संतापलो होतो. यासंदर्भात माझ्याकडे सर्व माहिती अधिकृत आहे. फेरीवाल्यांच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेने काही धोरण आखले तर त्यासंदर्भात वातावरण तप्त केले जाते. फेरीवाल्यांच्या संदर्भात निर्णय घेण्यापूर्वी मुंबईच्या आमदारांना व इतर भागात हा प्रश्न असेल तर त्या ठिकाणच्या आमदारांना आपण विश्वासात घेतले पाहिजे, त्यांच्या बरोबर बैठक घेतली पाहिजे. फेरीवाल्यांना इमारतीमध्ये जागा देण्यासाठी एफएसआय देऊन त्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. परंतु धोबी आणि इस्त्री वाले हे फेरीवाले नाही. धोबी आणि इस्त्रीवाल्यांच्या संदर्भात कोणतेही धोरण ठरवण्यात आलेले नाही. त्यामुळे फेरीवाल्यांच्या संदर्भात निर्णय घेण्यापूर्वी मुंबईतील आमदारांना तसेच इतर ठिकाणी जर अशाच प्रकारचे प्रश्न असतील तर त्या भागातील आमदारांबरोबर बैठक घेऊन फेरीवाल्यांच्या संदर्भात शासन धोरण आखणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जर फेरीवाल्यांच्या विषयाच्या संदर्भात प्रारुप प्राप्त झाले नसेल तर ते प्रारुप पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येईल. फेरी वाल्यांसाठी फुटपाथच्या एका बाजूला 1x1 मिटरची व आरे दुध आणि इतरसाठी 2x1 मिटरची जी जागा आहे,

यानंतर श्री सिगम

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.48190.......

श्री.हसन मुश्रीफ ...............

स्टॉलमध्ये टेबल वा खोका ठेवता येणार नाही. धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था इत्यादी ठिकाणापासून 100 मीटर दूर अंतरावर असावे अशाप्रकारच्या अटी घातलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी "फेरीवाल्याची" व्याख्या करावी असे सांगितले. महानगरपालिका आणि संबंधितांना विश्वासात घेऊन फेरीवाल्याची व्याख्या केली जाईल. तसेच यासंबंधीचा निर्णय लवकरात लवकर घेतला जाईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, फेरीवाल्यांसंबधी समितीमध्ये निर्णय घेणार आहोत. माझा मंत्रिमहोदयांन प्रश्न आहे की, हा निर्णय किती दिवसांत घेणार आहात ? फेरीवाल्यांचे जीवन अतिशय कष्टमय आहे. फेरीवाले अतिशय गरीब असतात. दिवसाच्या धंद्यावर त्यांचे पोट असते. जेथे फेरीवाल्यांकडून हप्ता मिळतो त्याठिकाणी सर्व व्यवस्थित सुरु असते. परंतु ज्याठिकाणी फेरीवाल्यांकडून हप्ता मिळत नाही तेथे त्यांना धंदा करु दिला जात नाही. हा भेदभाव का केला जात आहे ? या संदर्भात शासनाचे धोरण स्पष्ट होत नाही तोपर्यंत फेरीवाल्यांना न्याय मिळणार नाही. वर्षानुवर्षे जे भाजीपाला विकत आहेत, वर्षानुवर्षे जे रस्त्यावर गाड्या लावतात त्यांच्याबाबतीत आपणास विचार केला पाहिजे. कालपर्यंत पाच रुपये हप्ता होता तो दीडशे रुपयांवर गेल्यामुळे तो देताना फेरीवाल्यांच्या तोंडाला फेस येतो. सरकार चांगले धोरण घेत आहे यात शंका नाही. परंतु या संदर्भात जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत सरकार फेरीवाल्यांना न्याय देणार आहे की नाही ?

सभापती महोदय, माझा दुसरा एक प्रश्न आहे. सरकार पेपर विक्रेत्यांना फेरीवाल्यांच्या संज्ञेत टाकणार आहे काय ? हे पेपर विक्रेते सकाळी 4.00 वाजल्यापासून तसेच दुपारी प्रसिध्द होणारे वर्तमानपत्र विकून लोकांचे प्रबोधन करीत आहेत. या पेपर विक्रेत्यांकडून पोलिसांना हप्ता मिळत नाही म्हणून पोलीस त्यांना रस्त्यावर पेपर विकू देत नाहीत. हे पेपर विक्रेत वर्षानुवर्षे पेपर विकत आहेत. तेव्हा या पेपर विक्रेत्यांना फेरीवाल्यांच्या संज्ञेत न मोडता त्यांना न्याय देणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.48190.......

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, फेरीवाल्यांसंदर्भात निर्णय घेण्याबाबत फेरीवाल्यांचे प्रतिनिधी, एन.जी.ओ. महानगरपालिकेचे प्रतिनिधी, महानगरपालिका आयुक्त यांच्याबरोबर तीन-चार बैठका झाल्या असून त्याबाबतचा अहवाल तयार झालेला आहे. फेरीवाल्यांचे विनियमन करण्यासाठी आदर्श उप विधी तयार केलेली आहे. ती लागू करण्यासाठी महाराष्ट्र महानगर पालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका आणि नागपूर प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा यासाठी थोडा अवधी लागेल. परंतु ही कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, पेपर विक्रेत्यांचा फेरीवाल्यांमध्ये समावेश केला जाईल.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या संदर्भात पुन्हा आमदारांची बैठक घेऊन त्यांना आणि महानगरपालिकेला विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात येईल.

**उपसभापती** : या प्रश्नाची व्याप्ती व्यापक स्वरुपात असल्यामुळे माननीय सभापतींशी चर्चा करुन त्यांच्या परवानगीने या प्रश्नासंबंधी वेगळया आयुधांच्या माध्यमातून चर्चा घेण्यात येईल.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील रिंगरोड प्रकल्पास निर्माण होणारा अडसर**

**(3) * 45854 श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेश नवले , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी : तारांकित प्रश्न क्रमांक 25319 ला दिनांक 28 मार्च, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) रिंगरोड हद्दीत मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरु असून त्यामुळे रिंगरोड प्रकल्पास अडसर निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रिंगरोडच्या मार्गातील बेकायदा बांधकामे जमिनदोस्त करणेबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली येथील रिंगरोड हद्दीत मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरु आहेत काय या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे देण्यात आलेले आहे. बांधकामे होऊ शकत नाही असे म्हणणे धाडसाचे होईल. त्याठिकाणी जो रिंगरोड होत आहे तो किती कालावधीत होणार आहे ?

यानंतर श्री.गायकवाड.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45854..

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रात 18.95 किलोमिटर्स लांबीचा रिंग रोड विकास आराखडया नुसार प्रस्तावित आहे. त्यातील दीड किलोमिटर्स रस्त्याचे काम एम.एस.आर.डी.सी. करणार असून या रस्त्याच्या कामासाठी 141कोटी रुपये खर्च येणार आहे. केन्द्र सरकारच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुथ्थान योजने अंतर्गत हा रस्ता प्रस्तावित केलेला आहे व त्यासबंधीचा प्रस्ताव केन्द्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे त्यांच्याकडून यासंबंधीची मंजुरी आल्यानंतर तातडीने या कामास सुरुवात होईल. या ठिकाणी 1995 पूर्वीची थोडी अतिक्रमणे होती परंतु सध्या तेथे अतिक्रमणे नाहीत तसेच बांधकामे सुरु नाहीत.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात हा प्रश्न असून उल्हासनगर महानगरातील बेकायदेशीर बांधकामच्या सदंर्भात चर्चा होऊन कायदा मंजूर होऊन 950 बांधकामे तातडीने पाडण्याचा निर्णय घेतला होता . त्यासंबंधी पुढे काय कार्यवाही करण्यात आली होती.

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45854..

श्री.मुझफ्फर हुसेन: सभापती महोदय , माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात असे म्हटलेले आहे की,त्या ठिकाणीच्या रिंगरोडचे काम एम.एस.आर.डी.सी.च्या माध्यमातून चालू आहे. माझा त्यांना असा प्रश्न आहे की, या रिंगरोडच्या आरक्षणामध्ये किती अतिक्रमणे आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्या ठिकाणी 1900 पूर्वी सात तबेल्याचे अतिक्रमण होते ते अतिक्रमण काढण्यासाठी न्यायालयात प्रकरणं गेलेले आहे. नवीन 719 कुटुंबे होती व त्यांचे 2005 पूर्वीच पुनर्वसन केलेले आहे त्यामुळे नवीन अतिक्रमण झालेले नाही.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## तारांकित प्रश्न 47918 पुढे ढकलण्याबाबत

**उपसभापती** : विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण विभागाच्या माननीय मंत्र्यांच्या विनंती वरुन ताराकित प्रश्न क्रमांक 47918 पुढे ढकलण्यात आला आहे.

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय , हा प्रश्न या विभागाच्या मंत्र्यांकडे कसा आला ?

**उपसभापती** : त्याबाबतीत तपासून मी आपल्याला सांगतो

श्री.विनोद तावडे : हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे उद्या घेण्यात यावा.

**उपसभापती** :तो प्रश्न मी पुढे ढकलला आहे. याचाच अर्थ असा की, तो उद्या किंवा परवा घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खामगांव नगरपरिषदेत झालेल्या अनेक गैरप्रकारांची चौकशी प्रलंबित असल्याबाबत**

**(५) * ४६३६८ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव नगरपरिषदेत सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना किट वाटपासाठी ५ लाख रुपयांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा मागविल्यानंतर दिनांक २० मार्च, २००८ रोजी इदची सुट्टी असताना त्या निविदा उघडणे, दिनांक २१ मार्च, २००८ रोजी धुलीवंदनाची सुट्टी असताना निविदा उघडून त्यांची वर्क ऑर्डर देणे, व दिनांक २७ मार्च २००८ रोजी अंदाजपत्रकापेक्षा ५० टक्के वाढीव दराने साहित्य खरेदी करणे इत्यादी सर्व कारवाई घाईगडबडीत झालेली आहे व त्यात गैरप्रकार झालेले आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कीट वाटपाप्रमाणेच खामगांव शहरातील घन कचरा उचलण्यासाठी दिनांक १९ एप्रिल, २००८ रोजी २२ लाखाचा ठेका देणे तथापी अटीप्रमाणे कामे न होणे, गांधी चौक भागातील पाणपोई बांधकामासाठी अर्ज प्राप्त होण्यापूर्वीच बांधकामास मंजूरी देणे इत्यादी अनेक गैरप्रकार खामगांव नगरपरिषदेत झालेले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरप्रकारांची चौकशी कोणत्या अधिकाऱ्यांकडून केव्हा करण्यात आली आहे, चौकशीत काय आढळून आले व कोणाकोणाविरुध्द कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे,

(५) कारवाई झाली नसल्यास, ती किती दिवसात होणार आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री अशोक चव्हाण यांच्याकरिता:** (१) होय.

(२) वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी नियोजित उद्दीष्ट गाठण्याचे बंधन असल्यामुळे नगरपरिषदेने अल्प मुदतीच्या निविदा मागविल्या होत्या. चार स्पर्धात्मक निविदेतून सर्वात कमी दर असलेल्या निविदा धारकास आदेश देण्यात आले. पुरवठा धारकाने मागणीप्रमाणे पुरवठा केलेला आहे. यामध्ये कुठलाही गैरप्रकार झालेला नाही. वित्तीय वर्षाच्या आत उद्दीष्ट गाठण्याचे दृष्टीने सुट्टीच्या दिवशी कामकाज करण्यात आलेले आहे. टुलकिटचे कुठलेही सी.एस.आर.दर उपलब्ध नसल्यामुळे अंदाजपत्रक तयार करण्यात आले नाही.

(३) नाही, खामगांव शहरातील घरोंघरचा घनकचरा संकलीत करणे व विल्हेवाट लावण्यासाठी दि.१९.४.२००८ रोजी रु.२३,५२,०००/- चा ठेका नियमानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन देण्यात आलेला आहे. त्याची मुदत दि.२०.४.२००८ ते दि.३१.३.२००९ पर्यंत आहे. सदर ठेका विहित करारनामा करुन देण्यात आला असून करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन करण्यात येत आहे. गांधी चौक भागामध्ये पाणपोई उभारण्यासाठी दि.१०.३.२००८ रोजी नगरपरिषदेकडे अर्ज प्राप्त झाला असून प्रस्तावास बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाडुरंग फुंडकर :माननीय मंत्री महोदयांना उत्तरात काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उत्तर चार मध्ये मला पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. "उत्तर क्रमांक दोन बाबत सहाय्यक प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन अमरावती यांनी चौकशी केली असून त्यात तथ्य आढळून आलेले नाही आणि पाचव्या प्रश्नाचे उत्तर " प्रश्न उदभवत नाही " असे वाचावे .

श्री.पांडुरंग फुडकर : या व्यतिरिक्त आणखी दुरुस्ती नाही ना ?

श्री.हसन मुश्रीफ : नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या अधिवेंशनामध्ये हाच प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी यासबंधी चौकशी करुन कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर दिले होते. आता माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना असे सांगिलते आहे की, या प्रकरणी चौकशी केली आहे परंतु त्यात तथ्य आढळून आले नाही. मला असे सांगावयाचे आहे की या मध्ये अनेक प्रकारची अनियमितता झालेली आहे. सुवर्ण जयंती रोजगार हमी योजना ही केन्द्र सरकारची योजना आहे . 31 मार्चच्या आत हा खर्च करणे आवश्यक असल्यामुळे घाई करण्यात आली होती. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी नियोजित उद्दीष्ट गाठण्याचे बंधन असल्यामुळे नगरपरिषदेने अल्प मुदतीच्या निविदा मागविल्या होत्या. सभापती महोदय, मी आपल्या माहितीकरता हे सांगू इच्छितो की, सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेचा 31 लाख रुपयांचा फंड 31 मार्च 2007 अखेर नगरपालिकेकडे शिल्लक होता. त्या नंतर ऑगस्ट 2007 मध्ये आणखी 30 लाख रुपयांचा निधी त्यांना मिळाला होता. ऑगस्ट 2007 मध्ये 60 लाख् रुपयांचा निधी शिल्लक असतांना ऑगस्ट ते मार्च पर्यन्त खर्च का केला नाही मार्च च्या शेवटी घाई घाईने हा निधी खर्च करण्याचा प्रयत्न का केला.? सुवर्ण जयंती रोजगार हमी योजने अंतर्गत निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यासाठी 21 दिवसांची मुदत द्यावयास पाहिजे होती आणि अत्यंत तातडी असेल तरच 7 दिवसांची मुदत दिली पाहिजे परंतु येथे तीन दिवसांची मुदत देण्यात आली होती.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 11:20

श्री. फुंडकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 46368 ....

त्यामध्ये जी निर्देश पुस्तिका आहे त्यातील पृ.22, मुद्दा क्र.21 नुसार या स्वर्णजयंती रोजगार योजनेंतर्गत द्यावयाच्या टूल कीटची किती 600 रूपये असताना त्यासाठी जी निविदा मंजूर करण्यात आली ती 1200 रूपये किंमत असलेली होती आणि त्या किंमतीनुसार या कीटस् खरेदी केल्या गेल्या आहेत. यामध्ये तातडी आहे म्हणून 20 मार्च 2008 रोजी ईदश्ची सुटी असतानाही निविदा उघडण्यात आला आणि त्यावर निर्णय घेण्यात आला. इतकेच नव्हे तर त्याची वर्क ऑर्डर म्हणजे पुरवठा आदेशही देण्यात आला आणि लगेच 26 मार्चला त्या कीटस्चा पुरवठाही झाला आहे. ही सर्व प्रक्रिया 3-4 दिवसात पूर्ण करण्यात आली व याचे ॲग्रीमेंट 31 तारखेला करण्यात आले. इतकी अनियमितता या साऱ्या व्यवहारामध्ये झालेली आहे. सभापती महोदय, यामध्य आणखी एक आश्चर्याची बाब म्हणजे हे जे टेंडर देण्यात आले होते ते एका हार्डवेअर दुकानदाराला देण्यात आले आहे. वस्तुत: यामध्ये लेदर बॅग वगैरे सारखे आयटेम्स होते की त्यांचा हार्डवेअर दुकानाशी काहीही संबंध नाही. पण तरीही या वस्तु हार्डवेअर दुकानातून खरेदी करण्यात आल्या. सभापती महोदय, या साऱ्या व्यवहारामध्ये अनेक अनियमितता झालेल्या आहेत. या संबंधात जी चौकशी झालेली आहे ती चुकीची झालेली आहे म्हणून आता या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत तर मी आपल्यामार्फत त्यांच्याकडे मागणी करू इच्छितो की, या साऱ्या व्यवहाराची जी चौकशी करण्यात आली आहे ती चुकीच्या दिशेने करण्यात आली आहे. 600 रूपये किंमत असताना 1200 रूपये किंमतीच्या कीटस् खरेदी करण्यात आल्या आहेत आणि आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे यासाठी संचालकांची परवानगी देखील नंतर मागण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी आपण करणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या नगरपालिकेने स्वर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या अंतर्गत दै.लोकमत मध्ये 14 तारखेला निविदा मागविण्यासाठी जाहिरात दिली. त्यानुसार 19 मार्च ला चार निविदा प्राप्त झाल्या होत्या आणि त्यात जी कमीत कमी किंमतीची निविदा होती त्यास म्हणजे अनिल हार्डवेअर यांना हे काम देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, स्वर्णजयंती शहरी रोजगार योजने जी आहे त्यातून आपल्या मुला-मुलींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जे व्यवसाय करणारे आहेत त्यांना त्यासाठी प्रोत्साहन मिळावे या करिता टूल कीटस् देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यासाइी शासनाच्या दरानुसार 600 रूपये किंमतीचे कीटस्

..... आर 2 ....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुश्रीफ (पुढे चालू... ) ता.प्र.क्र. 46368 ....

देण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रक करण्यात ाले होते. सभापती महोदय, हे खरे आहे की, सुटीच्या दिवशी यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा उघडण्यात आल्या आणि वर्क ऑर्डर देण्यात आले. परंतु 31 मार्च पर्यंत हा सारा व्यवहार पूर्ण करावयाचा होता आणि तसे झाले नसते तर सुशिक्षित बेरोजगारांचे नुकसान झाले असते आणि ते होऊ नये म्हणूनच 31 मार्चच्या पूर्वी हा सारा व्यवहार पूर्ण करण्याच्या दृष्टीने सुटीच्या दिवशी देखील निविदा उघडून त्यावर निर्णय घेण्याचे काम करण्यात आले तसेच शासनाने ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा जास्तीचे जे पैसे यामध्ये द्यावे लागणार आहेत ते नगरपालिका देणार आहे. सभापती महोदय, या साऱ्या प्रकरणाची चौकशी झालेली आहे व त्या गैर काही नाही असे निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे पुन्हा उच्च स्तरीय चौकशी करण्याची गरज नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाच्या दरानुसार 600 रूपये किंमतीची कीटस् यामध्ये घेणे आवश्यक असताना 1200 रूपयांची निविदा मान्य करण्यात आली आणि त्याप्रमाणे कीटस् घेण्याच्या ऑर्डर्स देण्यात आल्या. मार्च अखेर हा व्यवहार पूर्ण करावयाचा असल्याने सुटीच्या दिवशी काम करून निविदा उघडून त्याबाबत निर्णय घेण्यात आला हे येथे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. पण मग त्यापूर्वी 7 महिने हे पैसे नगरपालिकेकडे पडून होते त्याची जबाबदारी कोणावर आपण टाकणार आहात ? ते पैसे तसेच पडून राहण्याची कारणे काय होती ? ऑगस्ट पासून मार्च पर्यंत हे 60 लाख रूपये पडून राहिले, त्याचे वाटप त्या कालावधीत करता आले असते तर त्याचे वाटप त्या कालावधीत का केले नाही ? याला कोण जबाबदार आहे ? याची आपण विचारणा केली नाही का ? नसल्यास, का केली नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही बाब तपासून पाहण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांच्या उत्तरातून ते यामध्ये झ ालेल्या भ्रष्टाचाराचे समर्थन करीत आहेत असे वाटते आहे. एक तर सात महिने पैसे यांनपी तसेच वापरले आहेत. त्याची माहिती आता हे गोळा करून देणार आहेत. पण मागील अधिवेशनामध्य हा विषय या सदनामध्ये आला असता तत्कालीन नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी सांगितले होते की, दोन महिन्यात याची चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करू. पण त्याबाबत आपण काहीच खुलासा केलेला नाही. तेव्हा माननीय राज्यमंत्री दुसऱ्याचे ओझे

..... आर 3 ...



KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 11:20

स्वत:च्या खांद्यावर का घेत आहेत ? वास्तविक या नगरपालिकेच्या बजेटमधील खर्च नोव्हेंबरपर्यंत 33 टक्के देखील झालेला नाही. याबाबतीतील जबाबदारी आपण कोणावर फिक्स करणार आहात की नाही ? ज्यांनी सहा महिन्यात हे पैसे खर्च केले नाहीत आणि मुदत संपते आहे म्हटल्यावर 15 दिवसात घाईघाईने साऱ्या प्रक्रिया पूर्ण करून पैसे खर्च केले आहेत आणि तेही शासनाच्या दरानुसार न घेता जास्त दराने खरेदी करून खर्च केले आहेत त्याबद्दल आपले काय म्हणणे आहे? याबाबत चौकशी व्हावी असे आपणास वाटत नाही का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याबाबत चौकशी करण्यात आली आहे पण त्यातून काहीही निष्पन्न झालेले नाही. केवळ 31 मार्च पर्यंत पैसे खर्च झाले पाहिजे होते म्हणूनच सुटीच्या दिवशी निविदा उघडून कमीत कमी किंमतीच्या निविदेस मान्यता दिली गेलेली आहे. यामध्ये कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही असे मी सांगितले आहे.

( यानंतर श्री. सरफरे ..... एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46368....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे. 7 महिने हे पैसे पडून राहिले याला जबाबदार कोण आहे? 7 महिन्यानंतर मार्च अखे्र पैसे खर्च करण्याकरिता घाई घाईने निविदा कां काढण्यात आल्या? हा सर्व व्यवहार संशयास्पद आहे. यामध्ये मुख्याधिकाऱ्यांना पाठिशी घातले जात आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलेली बाब मी तपासून पहातो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण मला संरक्षण दिले पाहिजे. हा प्रश्न या सभागृहामध्ये दोन वेळा उपस्थित करण्यात आला. मागील अधिवेशनामध्ये आणि या अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला आहे. यामध्ये मुख्याधिकाऱ्यांना पाठिशी घालण्याचे काम केले जात आहे. या सर्व व्यवहारामध्ये अनियमितता झाली आहे सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेचे पैसे सात महिने पडून राहिले. मुख्याधिकाऱ्यांनी हे पैसे खर्च केले नाहीत, आणि मार्च महिन्याच्या अखेरीस कामाची वर्क ऑर्डर दिली. त्यासाठी घाई-गर्दीने निविदा काढण्याची गरज काय? याचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले पाहिजे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याकरिता विभाग आयुक्तांचे पथक पाठविण्यात आले होते. त्यांनी केलेल्या चौकशीअंती कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे विभागीय आयुक्तांनी कळविले आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारे भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट झालेले नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दुसरा महत्वाचा मुद्दा मांडला आहे की, हा निधी खर्च करण्यास विलंब कां झाला? त्याबाबत निश्चितपणे माहिती घेऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विविध महापालिकांमधील स्वच्छता कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याबाबत**

**(६) * ४८१५८ डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख : दिनांक १७ जुलै, २००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १६ जुलै, २००८ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक ४४१४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध महापालिकांमधील स्वच्छता कर्मचाऱ्यांना निवासी घरे देण्यासाठी निर्णय घेण्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे,

(२) उक्त प्रश्नी अद्याप निर्णय घेतलेला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उक्त प्रकरणी सफाई कामगारांच्या एकंदरीत परिस्थितीचा विचार करता त्यांना निवासी घरे देण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेतला जावा यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) राज्यातील नगरपालिकेतील/महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरुपाचे काम विचारात घेऊन ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवा निवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसास मालकीतत्वावर मोफत सदनिका देण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, समाजातील अत्यंत गरीब आणि मागासवर्गीय असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नाला याठिकाणी तोंड फुटत आहे. आज या कर्मचाऱ्यांची आपण घरे पाहिली तर ती खुराडयासारखी आहेत. त्यांना मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांना देण्यात येणारी घरे चांगल्या स्थितीत बांधून देणार काय? त्यांच्या घरामध्ये सुधारणा करुन ती रहाण्यायोग्य करणार काय? करणार असाल तर यासंदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी आपण किती दिवसात करणार आहात?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ४८१५८....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लोकशाही आघाडी सरकारने हा एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ज्या नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये सफाई कामगार आहेत. ज्यांच्या रोजच्या जीवनाचा संबंध घाणीशी येतो, त्यांना निवारा मिळाला पाहिजे. म्हणून शासनाने ही योजना तयार केली असून त्या योजनेमार्फत त्यांना मोफत निवारा दिला जाणार आहे. ज्यांची सेवा २५ वर्षे झाली आहे त्यांना व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसाला २६९ चौरस फूट क्षेत्रफळ असलेली घरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनच्या माध्यमातून शासन त्यांना देणार आहे. या योजनेचा निर्णय दि.२२.१०२००८ रोजी शासनाने घेतला. आणि जेवढया लवकर या योजनेची अंमलबजावणी करता येईल तेवढया लवकर या सफाई कामगारांना स्वत:चा निवारा मिळवून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, शासनाने जाहीर केलेल्या या महत्वपूर्ण योजनेबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. गोरगरीब सफाई कामगारांना मोफत सदनिका देण्याचा शासनाने विचार केला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये गेली २५-३० वर्षे सफाई कामगार काम करतात त्यांना आतापर्यंत सेवेत कायम केले नाही. त्या संदर्भात शासन वेगळा निर्णय घेणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याकरिता माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदय या बाबतीतशाबासकी घेऊन स्वत:ची पाठ थोपटून घेत आहेत. महाराष्ट्र शासनाने नगरपालिकांच्या अर्थसंकल्पामध्ये सफाई कामगारांना घरे बांधून देण्यासाठी एक रुपयांची सुध्दा तरतूद केली नाही हे खरे आहे काय? ही घरे आपण नक्की कुणाच्या पैश्यामधून बांधून देणार आहात?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दि.२२.१०.२००८ ला निर्णय झाला असून सर्व नगरपालिका आणि महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पामध्ये दुर्बल घटक योजनेंतर्गत ५ टक्के तरतूद केली पाहिजे असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. हा निर्णय होऊन दोन महिने झाले आहेत.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 48158.....

**उपसभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत आपण असे उत्तर दिले की, हा प्रश्न वेगळा आहे. तो प्रश्न वेगळा असला तरी त्याचे उत्तर आपल्याला पटकन देता आले असते. गेली 20-22 वर्षे महापालिकेमध्ये त्याच खात्यामध्ये चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी काम करीत आहेत. त्यांना अद्यापर्यंत कायम केलेले नसले तरी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, महापालिकेने मान्य करुन देखील राज्य शासनाने अद्यापपर्यंत त्या रिक्त जागा 2 वर्षे, 4 वर्षे, 5 वर्षे भरलेल्या नाहीत. मी महापौर असतानापासूनच्या फाईल्स पाठविल्या होत्या पण राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने त्या मंजूर केलेल्या नाहीत. नगरसेवक किंवा अन्य कोणी महापालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडे विचारतात तेव्हा ते मंत्रालयाकडे प्रपोजल पाठविले आहे परंतु त्याला मान्यता मिळालेली नाही असे सांगतात. बाकीचे जे निकष आहेत ते मला माहीत आहेत. आस्थापनेच्या संदर्भातील निकष आहेत असे आपण सांगतो. ते मला माहीत आहे. परंतु सर्व गोष्टींची पूर्तता केलेली आहे अशा फाईल्स किती दिवसात पूर्ण करणार याबाबत सांगावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अशा सफाई कामगारांच्या ज्या जागा रिक्त आहेत आणि प्रस्ताव शासनाकडे आहे त्याचा निकाल एक महिन्याच्या आत लावू. पद मंजूर नसेल तर त्या ठिकाणी प्रश्न निर्माण होईल. पण जागा रिक्त असेल आणि मागितली असेल तर एक महिन्याच्या आत जागा भरण्यास परवानगी देऊ.

**उपसभापती** : एक महिन्यात शासनाने यासंदर्भात जी कार्यवाही केली असेल ती कृपया मला अवगत करावी.

श्री. हसन मुश्रीफ : ठीक आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण प्रश्नाचे उत्तर पाहिले तर त्यामध्ये असे म्हटले आहे की, विशिष्ट स्वरुपाचे काम विचारात धेऊन ज्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे. म्हणजे त्यांना सेवानिवृत्तीनंतर सदनिका देणार आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिवंत असताना देणार नाही. माननीय मंत्रिमहोदय या उत्तरामध्ये सुधारणा करणार आहेत काय ? त्यांना सेवेत असताना सदनिका द्यावी. तो काम करीत असताना त्याचे घर चांगले असेल तर काम करण्यासाठी त्याला आणखी ताकद येईल. म्हणून माननीय मंत्रिमहोदय या उत्तरामध्ये सुधारणा करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ज्यांची सेवा 25 वर्षापेक्षा जास्त झाली असेल त्यांना किंवा सेवानिवृत्त झाला असेल किंवा मृत्यू झाल्यास असे यामध्ये आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी दिलेले उत्तर दुरुस्त केले पाहिजे. यामध्ये 'सेवानिवृत्तीनंतर' असा उल्लेख केलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये सुधारणा करावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, राज्यातील नगरपालिकेतील/महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरुपाचे काम विचारात घेऊन ज्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्षे किंवा त्यातून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू णाल्यास त्यांच्या पात्र वारसास मालकीतत्वावर मोफत सदनिका देण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे.

श्री. अरविंद सावंत : सेवानिवृत्तीनंतर म्हणजे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : 25 वर्षे सेवा झाल्यानंतर देणारच आहोत. सेवेत असताना आपण त्यांना निवास देणार आहोत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या उत्तरामधील वाक्यरचना चुकीची आहे. ही फसवणूक आहे. या उत्तरामध्ये सुधारणा केली पाहिजे. 'सेवेत असताना' असे यामध्ये म्हटले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सांगितले की, सेवेत असताना 25 वर्षे ज्यांची सेवा झाली असेल त्यांना, सेवानिवृत्त झाले असतील त्यांना आणि मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना देण्यात येईल.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराकरिता पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमात अनुशेषग्रस्त भागाला भेदभावपूर्ण वागणूक मिळत असल्याबाबत**

**(७) * ४६१९२ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे : दिनांक १७ जुलै, २००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १६ जुलै, २००८ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक ४२१६८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांकरिता पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमामध्ये (UIDSSMT) समाविष्ट असलेल्या अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणी पुरवठा योजना या दोन प्रकल्पांच्या कामांना प्रत्यक्ष निधी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे मा.मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विनंतीनंतर अजूनही कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही हे खरे आहे काय,

(२) मा.पंतप्रधानांच्या पॅकेजमध्ये समाविष्ट असलेल्या जिल्ह्यांतील हा महत्तम अनुशेष असलेला जिल्हा आहे ही बाब राज्यशासनाने प्रस्ताव पाठवितांना केंद्र शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१), (२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक २४ ऑक्टोबर, २००८ च्या आदेशानुसार UIDSSMT योजनेअंतर्गत अमरावती शहर भुयारी गटार योजनेसाठी रुपये ३४.४४९१ कोटी एवढा निधी वितरीत केलेला आहे. तसेच वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव निधी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, केंद्र शासनाने यांच्याकडे निधी पाठविलेला आहे. या उत्तरामध्ये ते आलेले आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक 24 ऑक्टोबर, 2008 च्या आदेशानुसार 34 कोटी रुपये एवढा निधी वितरीत केला आहे. ऑक्टोबरमध्ये हा निधी वितरीत झाला

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46192.... प्रा.बी.टी.देशमुख....

आणि महिना, दोन महिने फाईल पडून राहिल्यानंतर शासनाने 2 डिसेंबरला जी.आर.काढला आहे. ते उत्तरामध्ये आलेले नाही. महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हयातील महानगरपालिकेमध्ये भुयारी गटार योजना नाही. शासनाने जी.आर.काढून निधी वितरित करण्याचे आदेश काढले आहेत. परंतु मागासवर्गीयांचे प्रस्ताव पाठविले जात नाहीत, पाठविले तरी निधीच्या क्रमामध्ये जात नाही आणि क्रम लागला तर निधी येत नाही. आता या निधीतून स्थानिक अधिका-यांचा जुने पेमेंट करण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण केंद्र सरकार ते मान्य करीत नाही. जुन्या योजना वगळून ही योजना करावी असे केंद्र सरकारने म्हटले आहे. त्यामुळे दिनांक 31 मार्च पर्यंत या योजनेतील बाकीच्या सर्व कामांवर हा निधी खर्च झाला पाहिजे अशी सक्त ताकीद शासन देईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एक गोष्ट मी अनेक दिवस या सभागृहामध्ये पहात आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे तीन गोष्टींबाबत आग्रही असतात. शिक्षकांसंबंधीचा धोरणात्मक प्रश्न असेल, सगळयाच प्रश्नामध्ये ते पडत नाहीत, दुसरा अनुशेषाचा प्रश्न आणि तिसरा अमरावती शहराचा प्रश्न. हा प्रश्न अमरावती शहराचा असल्यामुळे मी सखोल अभ्यास करुन आलो आहे. शासनाला या शहराला न्याय मिळवून द्यावयाचा आहे. अमरावती महानगरपालिकेला केंद्र सरकारची UIDSSMT योजना लागू केली आहे. या योजनेच्या अंतर्गत अमरावती शहरासाठी दोन योजना राबविल्या जाणार आहेत. एक म्हणजे 160 कोटी 4 लाख किंमतीची भुयारी गटार योजना आणि दुसरी महानगरपालिकेची 93 कोटी 29 लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना, या दोन योजना केंद्राकडे पाठविल्या होत्या. त्यापैकी ही जी भुयारी गटार योजना आहे त्याच्या कामासाठी 81 कोटी रुपयांचा पहिला हप्ता केंद्र सरकारने मंजूर केला आहे. त्यापैकी 34 कोटी 44 लाख रुपये शासनाकडे आलेले आहेत. या निधीमध्ये राज्य सरकारचा हिस्सा म्हणून 10 टक्के निधी घालून हा निधी वितरित केला जाणार होता. याबाबत आजच ऑर्डर काढण्याचे शासनाने ठरविले होते. परंतु दरम्यानच्या काळात यासंदर्भात आमदार श्री.अर्जुन खोतकर यांनी जालना महानगरपालिकेच्या संदर्भात हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे की, UIDSSMT या योजने अंतर्गत येणारा जो पैसा आहे तो पाणीपुरवठा व्यतिरिक्त इतर योजनांसाठी वितरित करु नये. तशाप्रकारचे आदेश शासनाला द्यावे. यासंदर्भात तातडीने हायकोर्टात ॲफिडेव्हिट दाखल करुन ही स्थगिती उठविली जाईल. मी सभागृहाला असे आश्वासन देतो की, दिनांक 31 मार्च पर्यंत ही कार्यवाही पूर्ण करुन, कोर्टाची स्थगिती उठवून हा पैसा वितरित केला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : याबाबत कोर्टाने स्थगिती दिली असेल तर शासन ही स्थगिती उठविण्यासाठी जरुर प्रयत्न करील. परंतु अमरावती महानगरपालिकेला हा निधी वितरित करण्यासाठी कोर्टाने स्थगिती दिली आहे काय ? नसेल तर ही स्थगिती उठविण्याचा प्रयत्न केले जातील असे सांगण्यात येऊ नये. पाणीपुरवठयाच्या योजनेसाठी ही याचिका दाखल झाली आहे असे मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे. परंतु पाणीपुरवठा योजनेबाबत शासनानेच सभागृहात सांगितले आहे. मी आपला आभारी आहे, आपण असे म्हणालात की मी शिक्षकांच्या प्रश्नाबाबत व अनुशेषाबाबत आग्रही असतो. दुर्दैवाने अमरावती जिल्हा हा अनुशेषाच्या बाबतीत क्रमांक 1 वर आहे. दांडेकर समितीने विदर्भातील अनुशेष काढला त्यामध्ये विदर्भात पाणीपुरवठयाचा महत्तम अनुशेष असल्याचे नमूद केले आहे आणि पाणीपुरवठयाच्या बाबतीत अमरावती शहराचा क्रमांक 1 आहे. कै.शंकरराव चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी पाणीपुरवठा योजनेचे भुमिपूजन केले होते, परंतु आजतागायत या योजनेसाठी निधी वितरित केला नाही. या योजनेला प्राधान्य देण्यात यावे असे पत्र आजपर्यंत केंद्र सरकारला पाठविण्यात आलेले नाही. विद्यमान माननीय मुख्यमंत्र्यांकडून आता तरी तसे पत्र पाठविले जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, केंद्र सरकारकडे 3500 कोटी रुपयांचे प्रस्ताव पाठविले आहेत. यामध्ये अमरावती शहराच्या पाणीपुरवठा योजनेचा सहावा क्रमांक आहे. अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणीपुरवठयाची योजना या दोन्ही योजना मार्गी लागाव्यात अशी शासनाची इच्छा आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : शासनाने या सभागृहात कबूल केले आहे. अमरावती जिल्हयामध्ये महत्तम अनुशेष आहे हे रेकॉर्डवर आलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/ 11:40

(ता.प्र.क्र. 46192... (प्रा. बी.टी.देशमुख....

याला टॉप प्रायॉरिटी देण्यासंबंधीचे पत्र माननीय मुख्यमंत्र्यांनी पाठविले असे आपण या प्रश्नापूर्वी सांगितले आणि आता आपण कबूल केले आहे की असे पत्र पाठविलेले नाही. त्या पाणी पुरवठा योजनेला प्रायॉरिटी द्या असे पत्र पाठवायला काय हरकत आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : आम्ही 6 नंबरला प्रायॉरिटी घेतलेली आहे. पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांचे पत्र पाठवू. याबाबतीत आमची मनापासूनची इच्छा आहे. म्हणून या दोन्ही प्रश्नामध्ये मी स्वत: लक्ष घालीन.

प्रा.बी.टी.देशमुख : आम्ही माननीय मंत्री महोदयांनी भेटलो त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही 4ला प्रायॉरिटी दिलेली आहे. फक्त 5वा राहिलेला आहे. पुढच्या वर्षी ती प्रायॉरिटी आपली राहील असे तत्कालीन राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांनी सांगितले. ती प्रायॉरिटी 11व्या क्रमांकावर टाकली होती. आता पुन्हा ती 6व्या क्रमांकावर आहे असे आपण म्हणता. आपण महत्तम अनुशेष नाकारलेला नाही. माझे म्हणणे असे आहे की, अनुशेषग्रस्त भागाला तुम्ही निर्दयपणे वागवू नका. माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र पाठविले असे आपण सांगितले.

श्री. हसन मुश्रीफ : आजच माननीय मुख्यमंत्र्याचे पत्र पाठवू. तसेच मी स्वत: दिल्लीला जाऊन मंत्र्यांना भेटून येईन.

श्री. चंद्रकात रघुवंशी : भुयारी गटार योजनेच्या संदर्भातील निर्णय केव्हा होईल ? UIDSSMT च्या योजनांना पैसे मंजूर करुन पाठविलेले आहेत ते 8 दिवसात वितरित करण्यात येतील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : पाणी पुरवठा योजनेचा जो मंजूर निधी आहे त्याबाबतीत ताबडतोबीने कार्यवाही करण्यात येईल.

----

...2...

24-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारकर्ली (ता.मालवण) येथील खाडीमध्ये विनापरवाना बोटींग सुरु असल्याबाबत**

**(८) * ४९२४७ श्री.परशुराम उपरकर , श्री. अनिल परब , श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण येथील जागतिक पर्यटन केंद्र म्हणून नावारुपास आलेल्या तारकर्ली गावात खाडीमध्ये विनापरवाना बोटिंग प्रकल्प सुरु असल्याचे माहे मे, २००८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोटिंग इंजिनाच्या आवाजामुळे/ध्वनीप्रदूषणामुळे तारकर्ली खाडीतील मच्छिमारी ठप्प झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे तारकर्ली खाडीमध्ये अनधिकृतपणे सुरु असलेल्या बोटिंगविरुध्द प्रशासनाकडून कारवाई करण्यास टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यात काय आढळून आले तद्नुसार यात दोषी असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, श्री. रवीशेठ पाटील यांच्याकरिता** : (१) अंशत: हे खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) तारकर्ली खाडीमध्ये बोटींगचा व्यवसाय करतांना महाराष्ट मेरीटाईम बोर्डाकडून आवश्यक प्रवासी वाहतूक परवानगी घेण्याबाबत संबंधित बोटचालकांना व विना परवानगी प्रवासी वाहतूक केल्यास बोटचालकांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबतच्या सूचना मालवण पोलीस ठाणे यांना देण्यात आल्या आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : तारकर्ली तसचे मालवण आणि देवगड बंदरामध्ये 15 वर्षाची, जुनी झालेली आणि गेट वे ऑफ इंडिया येथे फिरणारी यूडीआरव्हीआय 00141 क्रमांकाची बोट मेरीटाईम बोर्डाची परवानगी न घेता 200-200 प्रवाशांना फिरवित असल्याची तक्रार करण्यात आलेली होती. परंतु त्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्यानंतर काल ती बोट देवगड बंदरामध्ये बुडाली हे खरे आहे काय ? असल्यास, ती बोट तेथे कशी आणली गेली ? मेरीटाईम बोर्डाची परवानगी न घेता त्या बोटीतून प्रवासी वाहतूक कशी करण्यात आली यासंबंधीची चौकशी करण्यात येणार आहे काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : तारकर्ली पर्यटन केन्द्रावर 2 प्रवासी वाहतूक बोटींना परवाना दिलेला आहे. त्या शिवाय तेथे मच्छिमार बोटी अवैध प्रवासी वाहतूक करतात असे निदर्शनास

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आल्यानंतर बंदर अधिका-यांना त्याबाबतीत पत्र दिलेले आहे. मच्छिमार बोटी प्रवासी वाहतूक करीत असल्यामुळे त्याठिकाणच्या मच्छिमारीवर परिणाम झालेला आहे अशा प्रकारची तक्रार मत्स विकास आयुक्तांनी देखील केलेली होती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम श्री. शिगम 11:45

ता.प्र.क्र.49247...

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर...

परंतु बंदर अधिका-यांनी चौकशी केली असता, त्या ठिकाणी मच्छिमारी व्यवसाय करणा-या बोटी अवैध प्रवासी वाहतूक करीत आहेत असे सांगितले. यासंदर्भात पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांचे समवेत बैठक घेण्यात आली आहे. मच्छिमारी व्यवसाय करणा-या बोटी अवैध प्रवासी वाहतूक करीत असल्याची बाब निदर्शनास आल्याबरोबर त्या अनुषंगाने निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, अवैध प्रवासी वाहतूक करणारी मच्छिमारी व्यवसाय करणारी बोट त्या ठिकाणी बुडाली आहे...( अडथळा )

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी मच्छिमारांच्या बोटी अवैध प्रवासी वाहतुकीसाठी वापरल्या जात असून एका बोटीचा क्रमांक सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी दिला आहे. बोट क्रमांक व्हीडीआर-आयव्ही-00141 असा आहे. या क्रमांकाच्या बोटीतून प्रवासी वाहतूक होत होती ही गोष्ट खरी आहे काय? ही बोट देवगड येथे बुडाली ही गोष्ट सत्य आहे काय ? या बोटीचा मालक कोण आहे ? या संदर्भात सखोल चौकशी करण्यात येऊन संबंधित अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : या बोटी संदर्भातील माहिती मेरीटाईम बोर्डाकडे आलेली नाही. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे, त्या अनुषंगाने चौकशी करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : तारकर्ली खाडीमध्ये बोटींगचा व्यवसाय करताना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून आवश्यक प्रवासी वाहतूक परवानगी घेण्याबाबत संबंधित बोटचालकांना व विना परवानगी प्रवासी वाहतूक केल्यास बोट चालकांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबतच्या सूचना मालवण पोलीस ठाो यांना देण्यात आल्या आहेत. संबंधित बोटीचे मालक आणि चालकाचे नाव काय आहे ? बोटचालकाविरुध्द कडक कारवाई करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचना कशासाठी दिल्या गेल्या? यासंदर्भात सचिव पातळीवरुन चौकशी केली जाईल काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, चौकशी करण्यात येईल.

---------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबई येथे वीजेच्या खांबावर लावण्यात येणाऱ्या जाहिरातींच्या निविदांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(९) * ४६९३५ श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री.चंद्रकांत पाटील , श्री. मधुकर चव्हाण , श्री. सुभाष चव्हाण , श्री. सुरेश नवले , श्री. संजय दत्त , श्री. चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे रस्त्यावरील वीजेच्या खांबांवर लावण्यात येणाऱ्या जाहिरातींच्या निविदेमध्ये ३३ कोटी रुपयांच्या खाली निविदा भरु नये अशा प्रकारची जाचक अट ठेवली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिरातीचा ठेका मिळविण्यासाठी उत्सुक असणाऱ्या १५ जाहिरात कंपन्यांनी बेस्टचे मुख्य स्थापत्य अभियंत्याशी चर्चा करुन ही अट शिथील करण्याची वारंवार मागणी केली परंतू त्याचा फेरविचार न केल्याने सर्वच जाहिरात कंपन्यांनी माघार घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) परंतु दुसऱ्याच दिवशी यातील एका कंपनीने २१ कोटी रुपयांच्या अटीनुसार भरलेली निविदा तातडीने बेस्ट समितीला मंजूरीसाठी सदर करण्यात आली व घाईगडबडीने प्रस्तावही मंजुर करण्यात आला व या प्रकरणात २१ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २००८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) अद्याप, चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ,श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय.

(२),(३) व (४) जाहिरातीचा ठेका मिळविण्यासाठी उत्सुक अशा १३ कंपन्यांनी कोरे निविदा नमूने विकत घेतले. त्यापैकी ४ कंपन्यांनी बेस्ट उपक्रमाकडे दि.२४.७.२००८ रोजी इसारा रक्कम भरली. सदर ४ कंपन्यांनी निविदेतील काही अटी शिथिल करण्याची मागणी बेस्टकडे केली असता त्यावर विस्तृतपणे चर्चा केल्यांनतर उपस्थित निविदाकारांना प्रस्ताव सादर करण्याची विनंती बेस्टकडून करण्यात आली. तद्नंतर इसारा रक्कम भरलेल्या ४ निविदाकारांपैकी मे.पायोनिअर पब्लिसिट कॉर्पो. लि. यांनी रु.२१ कोटीची निविदा निविदापेटीमध्ये टाकली. त्यानंतर सर्व उपस्थित कंपन्यांच्या

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रतिनिधीसमोर त्याच दिवशी निविदा उघडण्यात आली आणि कंत्राट देण्याचा प्रस्ताव बेस्ट समितीच्या मंजूरीसाठी दि.२८.७.२००८ रोजी प्रशासनाकडून सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास दि.२९.७.२००८ रोजी बेस्ट समितीने मान्यता दिली.

सदर प्रकरणी वरील प्रमाणे मे. पायोनिअर पब्लीसीटी कॉर्पोरेशन यांची रु. २१ कोटीची निविदा मंजूर केल्यानंतर त्याविरुध्द उर्वरित ३ निविदाकारांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. सदर याचिकांवर सुनावणी अंती मा.उच्च न्यायालयाने सदरहू प्रकरणी "अपेक्षित राखीव किंमतीतला बदल हा त्या दिवशी उपस्थित असलेल्या सर्व संबंधितांच्या समक्ष करण्यात आला होता, तसेच अपेक्षित राखीव किंमतीचा समावेश जाहिरातीत दिलेल्या अटीत नव्हता", याचा तसेच पुर्वोदाहरणांचा विचार करता अपेक्षित राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीची निविदा स्वीकारण्याचा बेस्टचा निर्णय चुकीचा नसल्याचा निर्वाळा दिलेला आहे व मंजूर निविदाधारकांची संमत्ती लक्षत घेता निविदेतील देकाराची रक्कम रु.२१ कोटीवरुन रु.३३ कोटीपर्यंत वाढवून मंजूर निविदाधारकाबरोबर कंत्राट करण्याबाबत बेस्टला निर्देशित केले आहे. त्यानुसार बेस्टने मंजूर निविदाधारक मे.पायोनिअर पब्लिसिटी कार्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी रु.३३ कोटी रक्कमेचा करारनामा करुन कार्यादेश निर्गमित केलेला आहे.

(५) व (६) मा.मुंबई उच्च न्यायालयाचे वरोल्लेखित निर्णय पहाता कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी या प्रश्नाच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. टेंडरमध्ये मिनिमम क्वॉलिफिकेशन प्राईज 33 कोटी रुपये नमूद केले होती. या ठिकाणी लेखी उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे. शासनाने उत्तरात दुरुस्ती करावी. कारण कोर्टाला अचानक 33 कोटी रुपये सुचले नाही. 33 कोटी रुपये मिनिमम प्राईज कोट केली होती. त्यावर त्यांनी टेंडर उचलले. ही प्राईज जास्त आहे म्हणून ते टेंडर फायदेशीर होऊ शकत नाही. या टेंडरची मुदत 3.00 वाजेपर्यंत होती. ते टेंडर भरण्यास कोणी तयार होत नव्हते. श्री. खोब्रागडे साहेब यासंदर्भात वाटाघाटी करीत होते. परंतु वाटाघाटी सफल झाल्या नाहीत. टेंडर भरणारी काही मंडळी तेथून निघून गेली. त्यानंतर टेंडरची मुदत 5.00 वाजेपर्यंत वाढविली. सायंकाळी

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

5.00 वाजता 21 कोटी रुपये मिनिमम प्राईज ठरली. उरलेले लोक कोर्टात गेल्यानंतर 21 कोटीचे 33 कोटी करा असे कोर्टाने सांगितले. हे टेंडर रद्द केले तर बीईएसटीचे नुकसान होईल. पुन्हा नवीन टेंडर प्रोसेस सुरु करावी लागेल.

यानंतर श्री. भोगले...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46935..... श्री.विनोद तावडे...

पुन्हा नवीन टेंडर प्रोसेस करावी लागेल. म्हणून मग 33 कोटी घ्या असे म्हटले. यामध्ये बेस्टचे 12 कोटी रुपयांचे नुकसान करणारे जे अधिकारी होते त्यांच्यावर कारवाई करावी असे वाटले नाही का? म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावत आहे. रिंग करणे हे टेंडरिंगमध्ये चालते. त्यामुळे हे टेंडर रद्द करण्याची कडक कारवाई करुन मॅसेज देण्याची गरज आहे. अशा पध्दतीने अधिकारी वागणार असतील तर आपल्याला पारदर्शकतेची भाषा बोलता येणार नाही. जे अधिकारी 12 कोटी रुपयांचे नुकसान करणार होते त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात? हे टेंडर रद्द करुन पारदर्शकतेचा मॅसेज दिला जाईल का?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, बेस्ट उपक्रमाने मुंबईतील रस्त्यावर असलेल्या विजेच्या खांबावरील जाहिरातीचा ठेका देण्यासाइी निविदा प्रसिध्द केली. या निविदा भरण्यासाठी 13 कंपन्यांनी कोरे फॉर्म नेले. फक्त 4 कंपन्या निविदा भरण्यासाठी उपस्थित राहिल्या. बेस्टने 33 कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेची निविदा भरता येणार नाही असे टेंडरमध्ये लिहिले होते. चार कंपन्यांमध्ये चर्चा सुरु झाली की आम्हाला 33 कोटी रुपये ही किंमत परवडत नाही. त्यांनी सांगितले की, बेस्ट ऑफर काय असेल ती द्या. मे.पायोनियर कंपनीने 21 कोटीची ऑफर दिली. इतर तीन कंपन्यांनी निविदा भरली नाही. नंतर ते कोर्टात गेले. कोर्टाने सांगितले की, यात कोणतीही अनियमितता झालेली नाही. 3 वर्षापूर्वी असेच टेंडर काढले होते त्यावेळी 21 कोटीची ऑफर बेस्टने दिली होती. त्यावेळी 10.59 कोटी रुपयांना पृथ्वी या कंत्राटदाराला ठेका मिळाला होता. आता पृथ्वी या कंपनीला ठेका मिळाला नाही. म्हणून तीन कंपन्या मिळून कोर्टात गेल्या. कोर्टाने 33 कोटी रुपये किंमत करावयास लावली. त्या किंमतीस मान्यता देण्यात आली आणि या तीन कंपन्यांनी 33 कोटी रुपये भरण्यास अनुमती दिली. त्यांनी रिंग केले होते. त्यांनी 21 कोटी रुपये द्यायचे ठरविले होते. परंतु कोर्टाने 33 कोटी रुपये निश्चित केल्यानंतर त्यांनी मान्य केले आणि त्याप्रमाणे करार करण्यात आला. त्यामुळे अनियमितता झालेली नाही.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मंत्रीमहोदय म्हणाले की, यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. यामध्ये स्पष्टपणे अनियमितता झालेली आहे. 13 कंपन्यांनी कोरे फॉर्म नेले त्यावेळी अपसेट प्राईस 33 कोटी रुपयांची होती. 13 कंपन्या टेंडर भरण्यास इच्छुक होत्या. परंतु 33 कोटी रुपयांना परवडत नाही म्हणून 4 कंपन्यांनी निविदा फॉर्म



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46935..... श्री.भास्कर जाधव...

भरले. 9 कंपन्या बाजूला झाल्यामुळे त्यांचा हक्क हिरावून घेतला. 21 कोटी रुपयांची निविदा भरली होती. ज्यावेळी 21 कोटी रुपये किंमत ही अपसेट प्राईसपेक्षा कमी येते त्यावेळी किमान दोन वेळा टेंडर रिकॉल करावे लागते. त्यानंतर चर्चा करावी लागते. ती चर्चा झाली नाही. याचा अर्थ यामध्ये निश्चितपणे अनियमितता झाली आहे. तीन कंपन्या कोर्टात गेल्या नसत्या तर 21 कोटी रुपयांना निविदा मंजूर झाली असती. त्यामुळे बेस्टचे 12 कोटी रुपयांचे नुकसान झाले असते. याबद्दल अधिका-यांना कोणती शिक्षा करणार आहात?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही बाब न्यायप्रविष्ठ झालेली आहे. हायकोर्टाने 33 कोटी रुपयांना पायोनियर कंपनीला तयार केले आणि करार केलेला आहे. यात बेस्टचे नुकसान झालेले नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय आपल्या खांद्यावर कशाला दुसऱ्याचे ओझे घेत आहेत. प्रश्न असा आहे की, जर या तीन कंपन्या कोर्टात गेल्या नसत्या तर 21 कोटी रुपयांना टेंडर मंजूर झाले असते. उत्तरात म्हटले आहे की, त्या लोकांनी काही अटी शिथील करण्यास सांगितल्या होत्या. त्या अटी कोणत्या होत्या? टेंडर रिकॉल करण्याची गरज काय होती? बेस्टमध्ये महाव्यवस्थापक श्री.खोब्रागडे यांनी धुडगूस घातला आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 46935..... श्री. मधुकर चव्हाण.....

सर्व बेस्टला लुटत आहेत, कोणालाही मानत नाही, कोणत्याही पक्षाच्या नगरसेवकांना मानत नाही. या आयएएस अधिकाऱ्याने हे काय चालविले? याचा खुलासा झाला पाहिजे. म्हणून याप्रकरणी बेस्टचे महाव्यवस्थापक असलेल्या श्री. खोब्रागडे यांची चौकशी शासन करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, 21 कोटीचे टेंडर्स आले समितीकडे गेले.........

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे की..........

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, यामध्ये बेस्ट उपक्रमाचे नुकसान झालेले नाही. हे कंत्राटदार कोर्टात गेले नसते तर कोर्टाने हे बरोबर आहे असे म्हटले नसते. कारण कोर्टाने ही पध्दत बरोबर असल्याचे म्हटले आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय मंत्री महोदय ज्यावेळेस हलायला लागतात त्यावेळेस आम्हाला कळते की काय झाले आहे. कारण शालेय शिक्षण राज्यमंत्री असतानाचा आमचा अनुभव आहे. सन्माननीय सदस्य श्री. चरणजितसिंगजी सप्रा व इतर सदस्य जागेवरुनच बोलत आहेत. म्हणून या टेंडर पध्दतीमध्ये काही चुकीचे झाले असेल तर त्या चुका लक्षात आणून दिल्या आणि कोर्टाने सुध्दा त्याबाबत ताशेरे ओढलेले आहेत. त्याबाबत कोर्टाने म्हटले आहे की, 12 कोटीचे बेस्टचे नुकसान करणाऱ्याला पाठीशी घालत आहेत. अशा प्रकारे पाठीशी घालतांना माननीय मंत्री महोदयांचे या पायोनियरबरोबर काही पायोनियर झालेले आहे काय ? याचा खुलास व्हावा.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांवर हेत्वारोप केलेले आहेत, तसे त्यांनी करु नयेत, अशी माझी सूचना आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांवर जे हेत्वारोप केले आहेत ते कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : महोदय, पायोनियरगिरी याचा अर्थ मला असे म्हणावयाचे होते की, ज्या अधिकाऱ्यांनी ही टेंडरची प्रोसिजर केलेली आहे त्यांच्यावर आपण कारवाई करणार की नाही?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याला माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सुस्पष्ट असे उत्तर दिलेले आहे. त्यांनी असे सांगितले की, ही बाब न्यायालयात गेली असून त्यासंबंधीचा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. न्यायालयाच्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .........

निर्णयाचा आपण नेहमीच आदर करीत आलो आहोत. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांकडून माननीय मंत्री महोदयांवर हेत्वारोप झाले असतील तर ते ताबडतोब काढून टाकण्यात येतील आणि प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर या विषयावर झालेली चर्चा आपण पूर्ण करु.

श्री. विनोद तावडे : यासंबंधीचा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, वारंवार सभागृहात न्यायालयाचे नाव घेऊ नका. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार माहिती देणे आवश्यक आहे. कारण न्यायालयाने याप्रकरणी ताशेरे ओढलेले आहेत आणि असे म्हटले की, अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची निविदा का काढली ? त्यानंतर ते स्पष्ट झाले की कशा प्रकारे निविदा काढणे आवश्यक होते. जाहिरातीमध्ये 33 कोटीची निविदा होती परंतु .......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

हे लपवण्यासाठी 21 कोटी रुपयांची कमी किमतीची निविदा मंजूरीसाठी समितीपुढे ठेवण्यात आली. या समितीने या निवेदेनावर ऑब्जेक्शन घेतल्यानंतर या समितीवरच चिखलफेक करण्यात आली.

**उपसभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. आता रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर केला जाईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देऊन बहीर्गमन करतात.)

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (समिती सदस्य ) सभापती महोदय, रोजगार हमी योजना समितीचा अठरावा अहवाल सभागृहास सादर करतो.

**उपसभापती** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. मुझफ्फर हुसेन (समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा पहिला अहवाल सादर करतो.

( प्रेस : कृपया येथे सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल छापावा.)

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उपसभापती** :सभागृहाने अहवाल विचारात घेतला आहे.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री. अरविंद सावंत (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार दिनांक 26 डिसेंबर 2008 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय ठराव व पुर:स्थापनार्थ असलेले एक विधेयक यांस द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता बुधवार, दिनांक 24 डिसेंबर, 2008 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामाकाजासाठी एकूण 150 मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. डॉ नीलम गो-हे, वि.प.स. यांचे एक अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ आहे. त्यास 5 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 145 मिनिटांचा वेळ खालील प्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत........

**अशासकीय विधेयक-**

सन 2008 चे वि.प.वि.क्र.18 डॉ.नीलम गोऱ्हे.वि.प.स. 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव**

1. ठराव क्रमांक 33 श्री.दिवाकर रावते, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. ठराव क्रमांक 80 श्रीमती अलका देसाई, वि.प.स. 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. ठराव क्रमांक 51 श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावांचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**उपसभापती** : अशासकीय विधेयक आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.अरविंद सावंत ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईन्ट ऑफ प्रोप्रायटी संदर्भात**

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, काल रात्री 9.00 च्या सुमारास......

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, औचित्याचे मुद्दे मांडावयाचे असल्यास ते शुक्रवारी मांडावेत असा निर्णय झालेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य कोणत्या नियमाखाली बोलण्यासाठी उभे राहिले आहेत हे आम्हाला समजले पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी काल माझ्याकडे ठाणे जिल्ह्यात घडलेल्या एका घटनेचा उल्लेख करुन तो सभागृहात मांडण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली. मी त्यांना अपवाद म्हणून बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहात पाच किंवा सहा विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्याची परवानगी असताना मी सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन दहा सूचना मांडण्याची परवानगी दिलेली आहे. कधी कधी अशा काही घटना धडतात त्याची सभागृहात तातडीने नोंद घेणे आवश्यक असते. सन्माननीय सदस्यांनी माझी रीतसर परवानगी घेतलेली आहे आणि मी त्यांना परवागनी दिलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यात विषारी दारु पिऊन काही आदिवासींचा मृत्यू झाला. त्याबाबत मी औचित्याद्वारे मुद्दा उपस्थित न करता नियम 289 अन्वये सूचना दिली होती. सन्माननीय सदस्य कोणत्या नियमाखाली बोलण्यासाठी उभे आहेत हे आम्हाला कळले पाहिजे हे जाणून घेण्यासाठी मी उभा राहिलो.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी त्यांचे म्हणणे मांडावे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे येथील रौनक पार्क इमारतीमध्ये मागील एक महिन्यापासून अनधिकृत बांधकामवरुन वाद सुरु होता. त्यामध्ये रॅप्टाक्रॉस कंपनीचे जी.एम.श्री.रेगे आणि इतर सोसायटीतील रहिवाशी यांच्यामध्ये तो वाद होता. या संदर्भात काही दिवसांपूर्वी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड........

पोलीस स्टेशनमध्ये पोलीस इन्स्पेक्टर श्री.जगताप यांच्यासमोर असा निर्णय झाला की, दोन्ही पार्टीजनी टाळे लावावे. खरे म्हणजे बिल्डर्सनी हे अनधिकृत गाळे बांधले होते. बिल्डर्सनी बांधलेल्या अनधिकृत गाळ्यातील एक टाळे विरोधी पक्षाने तोडले. त्यानंतर काल रात्री 9.00 वाजता सर्वश्री जोशी, रेगे, कुलकर्णी हे पोलीस स्टेशनमध्ये गेले. यापूर्वी देखील त्यांनी श्री.वाघमारे जे त्यांच्या विरोधी होते त्यांच्या विरुध्द दहा तक्रारी केल्या होत्या. परंतु पोलिसांनी त्यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. त्यानंतर विक्रोळी कोर्टामधील मेट्रोपोलीटन मॅजेस्ट्रीट त्या पोलीस स्टेशनला आल्या आणि त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये सर्वश्री रेगे, जोशी, कुलकर्णी यांच्या विरुध्द असंख्य कलमांखाली तक्रार दाखल केली. त्यावेळी पोलीस अधिकारी श्री.जगताप सांगत होते की, सर्वश्री रेगे, जोशी, कुलकर्णी हे पोलीस स्टेशनमध्ये बसले होते ते बाहेर पडलेले नाहीत. तेव्हा मारामारी होण्याची शक्यता नाही. तरी देखील तेथील सिनिअर पी.आय.ने काहीही ऐकले नाही. डी.सी.पी.नी फोन करुन सांगितले की, त्यांच्यावर तक्रार दाखल करु नका, तक्रार दाखल केली असल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करु नका, गुन्हा दाखल केला असल्यास त्यांना अटक करु नका, हे सर्व सांगितलेले असताना आणि त्या रहिवाशांचा काही दोष नसताना त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करुन जेलमध्ये टाकलेले आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

सभापती महोदय, आज सकाळी मी त्यांना फोन केला होता. श्री.रेगे वगैरे सगळी मंडळी पोलीस स्टेशनमध्ये बसलेली होती . श्री.जगताप नावाचे साहेब तसेच श्री श्री.शिरोळे नावाचे साहेब सांगतात की, हे पोलीस स्टेशनला होते आणि चुकीचा गुन्हा नोंदवला गेला. तेव्हा त्या स्वत:मला सांगतात की, " मी तरी काय करु ? मेट्रोपोलिटीयन मॅजिस्ट्रेट आल्या मुळे मला गुन्हा नोंदवावा लागला." मी त्यांना असे सांगितले की, " तुम्ही त्यांना अटक तरी करावयास नको होती.अशा गुन्हयासंबधीचे प्रकरण तुम्ही डी.वाय.एस.पी यांच्याकडे पाठवावयास पाहिजे होते. किंवा ए.सी.पी.कडे पाठवावयास पाहिजे होते " परंतु माझे काहीही न ऐकता रेप्टॉक्राप्स कंपनीचे मॅनेजर, बॅन्क ऑफ इडियाचे मॅनेजर जेलमध्ये खितपत पडलेले आहेत. आज त्यांना पोलीस कस्टडी होईल व त्यांना आपआपल्या नोक-या गमवाव्या लागतील. एका पोलीस स्टेशनच्या सिनिअर इन्सपेक्टरची मनमानी एवढी आहे की, त्यांच्या जाचाला कंटाळून सबंधित डी.सी.पी त्या पोलीस स्टेशनला गेल्या चार महिन्यापासून गेले नाहीत. या बाबतीत मी सकाळी फोन केला होता. त्यावेळी मला असे सांगण्यात आले होते की," ठीक आहे . मी यांसंबंधीचा गुन्हा नोंदवला असून मला काय होईल ? फाशीच होईल ना ? , मी फाशीला सामोरे जाण्यास तयार आहे . तुम्हाला जे काही करावयाचे असेल ते करुन घ्यावे " सभापती महोदय, जनहितासाठी तेथील लोकांसाठी जर आम्ही काही बोललो व आम्हाला अशा प्रकारे ऐकावे लागणार असेल तर आम्ही काय करावयाचे हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. त्या इन्सपेक्टरच्या मनमानी वागण्यामुळे गोर गरीब व्यक्तींना जेलमध्ये खितपत पडावे लागले आहे. तेहा सभापती महोदय, या सबंधी आपण योग्य तो निर्णय देऊन या गरिबांना न्याय द्यावा अशी मी सभागृहाच्या माध्यमातून आपणाला आणि शासनाला विनंती करीत आहे.

**उपसभापती** : आता 12.00 वाजलेले आहेत तेव्हा या संदर्भात तातडीने सायंकाळी 4.00 च्या आत शासनाने सबंधित विभागाच्या डी.सी.पी.कडून अहवाल मागवून घ्यावा. हा प्रश्न महत्वाचा आहे . या अधिका-यांना कारण नसतांना पोलीस कस्टडी झाल्यास त्यांच्या आयुष्याचा प्रश्न निर्माण होईल . तेव्हा सायंकाळी 4.00 च्या आत संबंधित विभागाच्या डी.सी.पी. नी राज्य शासनाला तातडीने रिपोर्ट सादर करावा आणि शासनाने योग्य ती कार्यवाही तातडीने करावी.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, होय.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, त्यांना न्यायालयासमोर उभे करुन पोलीस कस्टडीत पाठविलेसुध्दा असेल .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : त्याबाबतीत मी आता लगेच काही सांगू शकत नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, पोलिसांकडून त्याबाबतीत असा रिपोर्ट घ्यावा लागेल आणि तो कोर्टाला सादर करावा लागेल आणि कोर्टातून त्यांची मुक्तता करावी लागेल.

**उपसभापती** : आपले म्हणणे बरोबर आहे. त्याकरिता मी असा उल्लेख केला होता की , या बाबतीत पोोलीस उप आयुक्तांकडून तातडीने रिपोर्ट घेण्यात यावा. त्यांनी कसा रिपोर्ट द्यावयाचा हा त्यांचा प्रश्न आहे.

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय, आपले म्हणणे बरोबर आहे. तसेच आपला उद्देशही योग्य आहे. या बाबतीत पोलीस उप आयुक्ताकडून रिपोर्ट मागविण्यात येणार आहे. परतु शासनाने कोर्टाला याबाबतीत सांगितले पाहिजे. हे अधिकारी जर संध्याकाळच्या आत जर सुटले नाहीत तर ते आयुष्यातून उठतील.

**उपसभापती** : आता या ठिकाणी मी अत्यंत क्लिअर निदेश दिलेले आहेत. आपण जो मुद्दा मांडला आहे त्या बाबतीत मी काही बोलू शकणार नाही. म्हणून ती बाब मी पोलीस उप आयुक्तांवर सोपवली असून राज्य शासनाला ते रिपोर्ट देतील आणि या सगळया गोष्टी व्यवस्थित होतील.

श्री.बबनराव पाचपुते :सभापती महोदय,या संदर्भात माहिती घेऊन ती आपल्या पर्यत देण्याची व्यवस्था करण्यात येईल

डॉ.दीपक सांवत :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर यानी काल जी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती त्यावेळी आपण शासनाला काही सांगितले होते,निदेश दिले होते.

**उपसभापती** :आज संध्याकाळ पर्यन्त माहिती द्यावयाची होती.

डॉ.दीपक सावंत : आज संध्याकाळ पर्यन्त तरी ती यादी मिळणे आवश्यक आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे.

श्री.बबनराव पाचपुते :होय.

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यानी मघांशी जो मुद्दा मांडला होता त्याबाबतीत डी.सी.पी यांना संध्याकाळी 4.00 च्या आत कोर्टात जाऊन असे सांगावे लागेल की आम्ही जे गुन्हे दाखल केलेले आहेत ते विथ् ड्रॉ केलेले आहेत .शासनाला ते रिपोर्ट सादर करणार आहेत हे बरोबर आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : डी.सी.पी. नी चौकशी केल्याशिवाय तो कोर्टात जाईल काय ? तेव्हा या बाबतीत त्यांना त्यांचा निर्णय घेऊ द्यावा. तेवढे स्वांतत्र्य आपण त्यांना दिले पाहिजे.

श्री.मधुकर चव्हाण : त्यांनी शासनाला रिपोर्ट दिला पाहिजे.

**उपसभापती** : त्यांनी शासनाला रिपोर्ट सादर करावा असे मी सांगितलेले आहे. या नंतर नियम 93 च्या सूचना घेण्यात येतील.

नंतर श्री.सुबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 12:15

**नियम 93 अन्वये सूचना.**

**उपसभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "नवी मुंबई सिडकोने सुरू केलेल्या 12.5 टक्के योजनेंतर्गत खारघर येथील भागात सुरू असलेल्या बांधकामांना तेथे रस्ते, पथदिवे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, गटारे इ. मुलभूत सुविधा नसून सिडकोच्या व्यवसापकीय संचालकांना याबाबत कळवूनदेखील त्याकडे लक्ष न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

( माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर खाली बसून काही बोलतात. त्यांना उद्देशून..)

मी माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांना सांगू इच्छितो की, आपण हे लक्षात घ्यावे की, प्रश्नोत्तराचा तास हा आज 12 वाजेपर्यंत होता. तेव्हा मला आपण एक तरी उदाहरण द्यावे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतरही आपण प्रश्नोत्तरे पुढे चालू ठेवतो. आपण जो प्रश्न येथे प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उपस्थित केला होता त्यावेळी मी त्यावर अधिक चर्चा होण्यासाठी, शासनाकडून त्यावर सविस्तर निवेदन यादृष्टीने तो विषय लक्षवेधी सूचनेद्वारा सभागृहात आणावा असे सांगितले त्यावर आपणही 'लक्षवेधी सूचना करा' असे सांगितले आणि मी ते मान्य केले. तेव्हा यापेक्षा अधिक मी काय करायला पाहिजे होते अशी आपली अपेक्षा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या शेवटी शेवटी प्रश्नावरील उत्तर अपुरे रहात असेल तर तो प्रश्न पूर्ण होईपर्यंत आपण त्यासाठी संधी देत असता.

**उपसभापती** : तसे नाही. त्या आपल्या प्रश्नावर सभागृहात 10-12 मिनिटे चर्चा झालेली आहे. तेव्हा अशा प्रकारे आपण आरोप करू लागलात तर ते बरोबर होणार नाही, मी ते मान्यही करणार नाही. तेव्हा हा विषय मी येथेच संपवितो.

**( सभापतीस्थानी - तालिका सभापत श्री.भास्कर जाधव )**

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, पाशा पटेल, मधुकर चव्हाण, केशवराव मानकर यांनी "अमरावती विभागात 90 जलसिंचन सहकारी संस्थांची नोंदणी केलेली असून त्यापैकी 45 संस्था कार्यरत आहेत. सदर संस्थांनी भूविकास बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक इ. वित्तीय संस्थांकडून सभासदांनी शेतजमीन गहाण टाकून घेतलेले कर्ज " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय

..... सीसी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ...

होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "राज्य शासनाने मल्टीप्लेक्सच्या सुरक्षा व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी श्री.एन.बी.मिराणी यांची समिती नेमण्यात येणे, सदर समितीने मुंबईत सर्व मल्टीप्लेक्स असुरक्षित असल्याचे आपल्या अहवालात नमूद केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, चंद्रकांत पाटील व भगवान साळुंखे यांनी " जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक या शैक्षणिक संस्थेचे वेतनेतर अनुदान चार वर्षापूर्वी तातडीने अदा करण्याचे आदेश देऊनही अनुदान न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी यांनी "नांदेड जिल्ह्यातील पायोनिअर डिस्टिलरीजच्या विषारी प्रदूषणाने परिसरातील नागरिक व जनावरे अनेक आजाराने त्रस्त असून परिसरातील जमिनीत सदर कंपनीचे दूषित पाणी सोडल्याने जमिनीची उत्पादकता कमी होत असल्याने सदर डिस्टिलरी बंद करण्याची होत असलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यात गांडूळ प्रकल्प व फुलशेतीसाठी शासनाने तेथील शेतकऱ्यांना स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, नाटूरवाडी द्वारा धनादेश दिले असून ते बचत खात्यात भरले असता बाऊन्स/डिसऑनर्स होण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी "हिंगोली जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत कृषी विभागातील शेततळ्यासाठी गनी बॅग खरेदीमध्ये सन 2008 मध्ये मोठ्या

..... सीसी 3 ...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रमाणावर गैरव्यवहार झाला असल्याने सदर प्रकरणी चौकशी करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला शहरातील काळी-पिवळी जीप्स व टॅक्सीचे परवाने परिवहन अधिकारी निरनिराळ्या कारणांवरून रद्द करीत असून दंडाच्या रकमेचे 500 रूपये घेऊन 100 रूपयांची पावती देण्यात येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व चंद्रकांत पाटील यांनी "रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब यांनी त्यांच्या भाडे तत्त्वावर असलेल्या जागेमध्ये गेलॉप्स रेस्टॉरंटला करारपत्रांच्या अटींचा भंग करून 10 वर्षांसाठी वापरण्यास दिल्याबाबत तसेच रेस्टॉरंटने सदर जागेत परवानगी नसताना अनधिकृत बांधकाम करणेबाबत महानगरपालिकेने दिलेली नोटीस" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतून वगळलेल्या आसदे-गोलीवली, मानगाव, निळजे व इतर सुमारे 27 गावांतील नागरिकांनी ही गावे उक्त महानगरपालिकेच्या क्षेत्रात समाविष्ट करण्यास विरोध दर्शविल्याने शासनाने ही गावे मनपा हद्दीतून व पर्यायाने विकास योजना प्रस्तावातून वगळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख व श्री.दिलीप सोनवणे यांनी "बुलढाणा जिल्हा परिषदेने 30-40 आदिवासी शिक्षकांना जात प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे सेवामुक्त करण्यात आले. त्याकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 15 जून 1995 ला मुदतवाढ देऊन आदिवासी शिक्षकांना संरक्षण देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना

..... सीसी 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या बाकीच्या सूचना दालनात नाकारण्यात आलेल्या आहेत.

( यानंतर श्री. सरफरे .... डीडी 1 ...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मच्छिमारांना पर्यटनावर आधारित जोड व्यवसाय उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : मच्छिमारांना पर्यटनावर आधारित जोड व्यवसाय उपलब्ध करुन देणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( मत्स्य व्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. परशुराम उपरकर यांनी "मच्छिमारांना पर्यटनावर आधारित जोड व्यवसाय उपलब्ध करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, याठिकाणी शासनाने मच्छिमारांसाठी जे पॅकेज जाहीर केले आहे त्यामधून काही मच्छिमारांना वगळण्यात आले आहे. प्रामुख्याने जे खऱ्या अर्थाने मत्स्य व्यवसाय करीत आहेत . त्यामध्ये अलायजे, पागदारे, शिनारे, मासे सुकवणारे, कालवे काढणारे, खेकडे काढणारे, मासे वहातूक करणारे, बर्फ कारखानदार त्याचप्रमाणे 1 टनापेक्षा कमी असलेल्या होडीधारकांना या पॅकेजमधून वगळले आहे. त्यांना या पॅकेजमध्ये अंतर्भूत करणार काय?तसेच, सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ला तालुक्यातील खवणे या सोसायटीला किमान मच्छिमारांच्या बोटींना जे पॅकेज देण्यात आले आहे ते देण्यात येईल काय? तसेच, ज्या उपाय योजना आपण सुचविल्या आहेत, त्यामध्ये एक टनापेक्षा कमी असलेल्या ज्या फायबर बोटी आहेत त्यांना परवानगी देण्यासाठी आपण प्रयत्न करणार काय? आणि त्यांना दिलासा देणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लोकशाही आघाडी सरकारने हे राज्य स्थापन झ ााल्यापासून कोकणातील मच्छिमारांना पहिल्यांदा 31 कोटी रुपयांचे मोठे पॅकेज दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. या पॅकेजमधून अनेक थोडे लोक वंचित राहिले आहेत. त्याकरिता लवकरात लवकर माननीय सदस्यांना आणि ज्या संस्थांचा उल्लेख केला आहे त्यांना बोलावून त्यांना या पॅकेजचा कशाप्रकारे फायदा देता येईल यादृष्टीने विचार करु. त्याचप्रमाणे `पर्यटनाच्या दृष्टीने जे जे करता येणे शक्य आहे ते करु. तसेच, त्यांनी फायबरच्या होडयांबाबत सांगितले आहे. त्यासंबंधी पर्यटन मंत्र्यांबरोबर सर्व माननीय सदस्यांची बैठक घेऊन निश्चितपणे निर्णय घेऊ.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, सातत्याने मागणी करण्यात येत आहे की, या मच्छिमारांना सबसिडाईज दराने रॉकेल उपलब्ध करुन दिले पाहिजे. ही मागणी कित्येक वर्षापासून प्रलंबित आहे त्याबाबत आपण निर्णय घेणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की ज्या लहान बोटी आहेत त्यांना स्टार्ट करण्यासाठी रॉकेल लागते. त्याबाबत देखील सर्वसमावेशक एक बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये पॅकेज आणि रॉकेलबाबत देखील विचार करु. तसेच, पर्यटनासंबंधी विचार करण्यासाठी माननीय पर्यटन मंत्र्यांकडे सर्व माननीय सदस्यांची एक बैठक घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयंत प्र. पाटील : मच्छिमारांना देण्यात येणाऱ्या पॅकेजचे वाटप सोसायटीमार्फत करण्यात येते. परंतु जे सोसायटीचे सभासद नाहीत, परंतु दुष्काळग्रस्त आहेत त्यांचे वाटप शासन डायरेक्ट त्यांना करणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या पॅकेजपासून वंचित राहिलेल्या सर्व लोकाबाबत मी याठिकाणी उत्तर दिले. जे सोसायटीचे सभासद नाहीत, परंतु मच्छिमार आहेत. अशा लोकांच्या बाबतीत सुध्दा निश्चितपणे विचार करु.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, पॅकेजची मदत देत असतांना मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी त्या मच्छिमारांना तुम्ही सोसायटीचे सभासद आहात काय? असे विचारतात. आणि त्यांना ते वाटप करतात. तशा सूचना शासन जिल्हा पातळीवर देईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : मच्छिमारांना पॅकेज दिले आहे, परंतु सोसायटीचा त्या पॅकेजमध्ये समावेश नाही. असे जे सभासद राहिले असतील त्यांना सुध्दा पॅकेज देण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ. शी.** : नागपूर महानगरपालिका व्यवस्थापनाने माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या अग्रिमापासून वंचित ठेवणे

**मु. शी.** : नागपूर महानगरपालिका व्यवस्थापनाने माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या अग्रिमापासून वंचित ठेवणे याबाबत सर्वश्री श्री. व्ही. यू. डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नाना पंचबुध्दे ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. व्ही. यू. डायगव्हाणे, वि.प.स. यांनी "नागपूर महानगरपालिका व्यवस्थापनाने माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या अग्रिमापासून वंचित ठेवणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(श्यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर आहे आणि नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी दिलेली नाही. तसेच इतरांना सहाव्या वेतन आयोगाचा अग्रीम दिला गेला तोही त्यांना दिलेला नाही. पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी दिली नाही. या ठिकाणी काल आणि परवा सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. कालपर्यंत याबाबत निर्णय झालेला नव्हता परंतु आता 20 तारखेला याबाबत कार्यवाही झाली असे म्हटले आहे. ही थकबाकी 1996 ते 1998 चीच आहे काय ? त्याची एकूण रक्कम किती आहे ? ही रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा केली की, त्यांच्या खात्यात जमा केली ? दोन महिन्याच्या अग्रीमच्या संदर्भात असे म्हटले आहे की, ही रक्कम तातडीने उपलब्ध करुन देण्यात येईल. पंधरा दिवसांमध्ये ही रक्कम त्यांच्या खात्यामध्ये जमा होईल काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी पाचव्या वेतन आयोगाची जी रक्कम आहे ती 1996 ते 1998 ची आहे काय असा प्रश्न विचारला. ही जी रक्कम देण्यात आली आहे ती पाचव्या वेतन आयोगाची 1996 ते 1998 ची रक्कम 2007 मध्ये अदा करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न ही रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा केली काय असा विचारला. याबाबतची माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हा प्रश्न पाचव्या वेतन आयोगाच्या संदर्भात आहे. 20.12.2008 रोजी जी थकबाकी दिली ती 1996 ते 1998 ची राहिलेली होती तीच आहे काय ? ती रक्कम किती आहे ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, ही तीच रक्कम आहे. परंतु किती रक्कम आहे याची नक्की आकडेवारी आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती आकडेवारी नंतर पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, नागपूर महानगरपालिका संचालित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाचा अग्रीम मिळालेला नाही. आता हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर ते देण्याची व्यवस्था या ठिकाणी होत आहे.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

ठाणे जिल्ह्यातील कुळगाव-बदलापूर नगरपालिकेतील जवळजवळ 60 शिक्षकांना हा अग्रीम मिळालेला नाही. तेथे प्राथमिक शाळेमध्ये जे शिक्षक काम करीत आहेत, जे जिल्हा परिषदेकडून नगरपालिकेकडे वर्ग झालेले आहेत ते या अग्रिमापासून वंचित आहेत. त्यांनाही अग्रीम देण्याच्या संदर्भात शासन 15 दिवसात कार्यवाही करणार काय आणि त्यांना अग्रीम देणार काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, होय.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शिक्षकेतरांच्या आकृतीबंधाबाबत माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार पदे मंजूर करण्याबाबतचा निर्णय जाहीर करुनही अंमलबजावणी न होणे

**मु. शी.** : शिक्षकेतरांच्या आकृतीबंधाबाबत माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार पदे मंजूर करण्याबाबतचा निर्णय जाहीर करुनही अंमलबजावणी न होणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नाना पंचबुध्दे ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, यांनी "शिक्षकेतरांच्या आकृतीबंधाबाबत माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार पदे मंजूर करण्याबाबतचा निर्णय जाहीर करुनही अंमलबजावणी न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री. भास्कर जाधव )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, वेगवेगळ्या माध्यमातून हा विषय सभागृहात येत आहे आणि त्यावर चर्चा होत आहे. राज्य शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाच्या संदर्भात गेल्या 8 वर्षापासून वेगवेगळ्या प्रकारची आश्वासने देऊन सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आणि आम्हा लोकप्रतिनिधींना झुलवत ठेवलेले आहे. यांसदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे दिनांक 8 ऑगस्ट, 2007 रोजी बैठक झाली. चिपळूणकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यापूर्वी माध्यमिक शाळा संहितेमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आकृतीबंध लागू होता तो पुन्हा लागू करण्याची बाब मान्य करण्यात आली आहे अशा प्रकारचे उत्तर आता शासनाकडून मिळालेले नाही. ऑगस्ट, 2007 मध्ये हा निर्णय झाला. अद्यापही शासनाने त्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही कलेली नाही. खरे म्हणजे हा प्रश्न सभागृहामध्ये पुन्हा येऊ नये तसेच पुन्हा प्रश्न टाकण्याची वेळ येऊ नये म्हणून एक महिन्याच्या आत हा धोरणात्मक निर्णय धेऊन माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीनुसार हा आकृतीबंध लागू करण्याच्या दृष्टीने शासन सकारात्मक भूमिका धेऊन आदेश काढणार काय ?

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदय नवीन आहेत. आपण नेमका प्रश्न विचारावा. आपण अशा पध्दतीने प्रश्न डेव्हलप केल्यामुळे ते कन्फ्युज होतात असे वाटते. सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी नेमकाच प्रश्न विचारला आहे, यापूर्वी काय झाले होते ते मी सांगितले आहे. नवीन आकृतिबंधासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांकडे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने एक महिन्याच्या आत निर्णय घेतला जाणार आहे काय ? आणि दुसरा प्रश्न असा आहे की, सन 2004-05 पासून राज्यातील सर्व शाळांचे वेतनेतर अनुदान रोखून ठेवले आहे. यासंबंधी निर्णय घेण्यासाठी शासनाने उपसमिती नेमली होती, त्या उपसमितीचा अहवाल सादर झालेला आहे पण त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या उपसमितीने ही बाब मान्य केलेली आहे. या शाळेचे सन 2004-05 पासून वेतनेतर अनुदान रोखले आहे ते देण्याच्या संदर्भात शासन एक महिन्याच्या आत सकारात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.नाना पंचबुध्दे : यासंदर्भात शासनाने उपसमिती गठित केली होती, या उपसमितीने शासनाला अहवाल सादर केलेला आहे. हा अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवून त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी वेतनेतर अनुदान सुरु करण्याचा प्रश्न विचारला आहे, हा प्रश्न देखील लवकरात लवकर मार्गी लावला जाईल.

श्री.कपिल पाटील : मागील अधिवेशनामध्ये नवीन आकृतिबंध लागू करण्यासाठी माहिती मागविली आहे असे सांगितले होते. परंतु अनुकंपा तत्वावर नेमणुका केल्या तरी ब-याच प्रमाणात त्यांना दिलासा मिळेल. त्याचप्रमाणे शासनाने सन 2004-05 पासून शाळांचे वेतनेतर अनुदान रोखून ठेवले आहे. याबाबत मी शासनाला आठवण करुन देऊ इच्छितो की, संस्था चालकांच्या संघटनेने यासाठी लागणारी 5 टक्के रक्कम दिली जाईल असे सांगितले होते. हे अनुदान रिलीज केले जाईल काय आणि कायम अनुदानित शाळा आहेत, खेडयापाडयामधील शाळा आहेत त्या शाळांमधील विद्यार्थ्यांना खिचडी देण्याची योजना आहे. अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना खिचडी दिली जाते आणि विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना खिचडी दिली जात नाही. एका तुकडीतील विद्यार्थ्यांनी खाऊ खायचा आणि दुस-या तुकडीतील विद्यार्थ्यांनी त्यांचे तोंड पहावयाचे असा हा प्रकार आहे. विद्यार्थ्यांमध्ये हा भेदभाव केला जातो. शासनाला या योजनेसाठी काही खर्च येणार नाही. त्यासाठी केंद्र सरकारकडून निधी येतो.

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )** : माननीय सदस्यांनी सोपा प्रश्न विचारावा, मंत्री महोदय नवीन आहेत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, अनुकंपा तत्वावरील नेमणुका केल्या जातील काय, सन 2004-05 पासून वेतनेतर अनुदान रोखून ठेवलेले आहे. या वेतनेतर अनुदानपैकी 5 टक्के रक्कम संस्था चालकांनी देण्याचे मान्य केलेले आहे, ती रक्कम दिली जाईल काय आणि विना अनुदानित तुकडया आणि विना अनुदानित शाळांमध्ये खाऊबाबत भेदभाव केला जातो तो संपुष्टात आणला जाईल काय ?

श्री.नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, मी यापूर्वीच दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. सध्या त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. कायम विना अनुदानित खाजगी शाळांचा प्रश्न आहे तसेच यासंदर्भात प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा प्रस्ताव आलेला आहे, त्यावर देखील शासनाचा विचार सुरु आहे.

श्री.विक्रम काळे : ही उपसमिती गठित करुन जवळपास एक वर्ष झाले आहे. एक वर्षानंतरही यासंबंधी निर्णय झालेला नाही. मंत्रिमहोदयांनी आम्हाला निश्चित कालावधी सांगावा. लवकरात लवकर म्हणजे नेमके किती दिवसामध्ये याबाबत कार्यवाही केली जाईल, शासन कालबध्द कार्यक्रम आखणार आहे की नाही ?

श्री.नाना पंचबुध्दे : उपसमितीचा शासनाला अहवाल प्राप्त झालेला आहे. हा अहवाल मंत्रिमंडळासमोर नेऊन त्याला लवकर मान्यता घेऊन हा प्रस्ताव मंजूर करता येईल.

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:35

**पृ. शी.** : गोंदिया जिल्हयात अपु-या पावसामुळे धानाच्या उत्पादनात झालेली घट

**मु. शी.** : गोदिया जिल्हयात अपु-या पावसामुळे धानाच्या उत्पादनात झालेली घट याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर व मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रमेशचंद्र बंग ( अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर व मधुकर चव्हाण यांनी "गोंदिया जिल्ह्यात अपु-या पावसामुळे धानाच्या उत्पादनात झालेली घट" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : या प्रश्नाला माननीय श्री. रमेशचंद्र बंग यांनी उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी पहिल्या परिच्छेदामध्ये दिलेल्या उत्तरासंबंधीचा उल्लेख मी शेवटी करीन. 15 दिवस बारदान न आल्यामुळे मोरगाव/अर्जुनी तालुक्यातील शेतक-यांचा माल बाहेर विकला गेला नाही. परिणामी त्यांच्या मालाला 850 रु. दर मिळून त्यांचे प्रति क्विंटल 100 रुपये नुकसान झाले. या नुकसानीला जबाबदार असलेल्या अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे ? नुकसान झालेल्या शेतक-यांना मदत करण्यात येणार आहे काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मोरगाव/अर्जुनी तालुक्यातील 8 केंद्रापैकी 6 केन्द्रे चालू आहेत. 2 केन्द्रे अद्याप का सुरु झालेली नाहीत ? गोंदिया जिल्ह्यामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. तेथे 47 टक्के आणेवारी 15 नोव्हेंबर 2008ला जाहीर झालेली आहे. तेव्हा गोंदिया जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून जाहीर करण्यात येईल काय ?

श्री. रमेशचंद्र बंग : गोंदिया जिल्ह्यामध्ये 945 गावे आहेत. 744 गावात 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असल्याचे सकृतदर्शनी मान्य केलेले आहे. 181 गावामध्ये 50 पैशापेक्षा जास्त आणेवारी आहे. काल राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी टंचाईग्रस्त दुष्काळ जाहीर करण्याबाबत सांगितलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांनुसार कार्यवाही होईल. मार्केटिंग फेडरेशनने 1,29,342 नग बारदान उपलब्ध करुन दिले आहेत. मध्यंतरीच्या काळामध्ये ज्यूट मिलर्सचा संप झाल्यामुळे बारदान पुरवठयामध्ये अडचण निर्माण झाली होती. तरीसुध्दा ज्या मिल्स सुरु होत्या त्यांच्याकडून बारदान उपलब्ध करुन घेण्यात आले. त्यामुळे बारदान मोठया प्रमाणात आलेली असल्यामुळे शेतक-यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. शेतक-यांचे धान खरेदी करण्याची राज्य शासनाची जबाबदारी नाही. शेतक-यांचे कोणतेही नुकसार झालेले नाही. त्यामुळे शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : मार्केटिंग फेडरेशन मार्फत शासन धान खरेदी करते. त्यामुळे मार्केटिंग फेडरेशनला सांगून 27 रुपयामध्ये हे बारदान मिळते. परंतु बारदान खरेदीसाठी टेंडर काढल्यानंतर त्याचा भाव 57 रु. आला. तेव्हा हा जो घोळ झाला त्यामुळे बारदान वेळेवर मिळाले

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:35

(श्री. जयंत प्र. पाटील...

नाही हे खरे आहे काय ? बारदान वेळेवर न मिळाल्यामुळे विदर्भ आणि कोकणातील लाखो टन धान्य पडून राहिले, याला जबाबदार असणा-या शासकीय अधिका-यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. रमेशचंद्र बंग : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे बारदान खरेदी करण्याचा विचार शासनापुढे मांडला गेला होता. त्यासंदर्भात 4 निविदा आल्या होत्या आणि त्या निविदांचे दर जास्त आल्यामुळे मार्केटिंग फेडरेशनकडून बारदान खरेदी करण्याची जी पध्दत होती त्याच पध्दतीने बारदान खरेदी करण्यात आले. बारदानाचा दर 23.58 रु. आलेला आहे. निविदातील दरानुसार बारदान खरेदी केलेले नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेशचंद्र बंग...

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे मार्केटींग फेडरेशनचे संचालक आहे. त्यामुळे यासंबंधी त्यांना पूर्ण कल्पना आहे. मी जे उत्तर दिले आहे, त्या उत्तरामुळे त्यांचे समाधान झाले असेल.

श्री.जयंत प्र.पाटील : विदर्भात आणि कोकणात बारदानां अभावी धान्य पडून आहे. बारदान नसल्यामुळे धान्याचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, त्यामुळे संबंधित अधिका-यांवर जबाबदारी फिक्स करणार आहात की नाही ? मी मार्केटींग फेडरेशनचा संचालक आहे. मी हे प्रकरण बाहेर काढले. मी ते प्रकरण थांबविले. हे प्रकरण थांबविले नसते तर बारदान खरेदी 57 रुपयांप्रमाणे झाली असती. सदर बारदानांची खरेदी 23 रुपयांप्रमाणे झाली आहे. कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार बारदान खरेदीमध्ये झाला असता. मार्केटींग फेडरेशनला तोंडी यासंबंधी तोंडी कळविले गेले आहे. मार्केटींग फेडरेशनमध्ये त्यासंबंधी रेकॉर्ड तयार करुन ठेवले आहे. ज्या अधिका-याने अशा प्रकारचा घोटाळा करण्याचा प्रयत्न केला, त्या अधिका-यां विरुध्द कारवाई केली जाईल काय ?

श्री.रमेशचंद्र बंग : राज्य सरकारने कोणत्याही प्रकारची बारदानांची खरेदी केलेली नाही. बारदान खरेदी करण्याचा शासनाचा विचार होता. यासंदर्भात 15 नोव्हेंबर रोजी निविदा प्रसिध्द केली.

श्री. जयंत प्र.पाटील : मी हे प्रकरण उघडकीस आणले नसते तर बारदानांची खरेदी 57 रुपये दराने झाली असती..

श्री. रमेशचंद्र बंग : सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्णपणे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदय, प्राप्त परिस्थितीप्रमाणे उत्तर देत आहेत. मुद्दा असा आहे की, बारदान 57 रुपये दराने खरेदी करण्याचा निर्णय झाला होता. ही बारदाने 23 रुपये दराने मिळता आहेत ही बाब मार्केट कमिटीच्या निदर्शनास आणून दिली आणि त्यामुळे बारदान खरेदी 57 रुपये दराने झाली नाही. यामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला असता, परंतु जागरुक सदस्यांमुळे तो भ्रष्टाचार झाला नाही. जागरुक सदस्यांनी आपली जागरुकता दाखविली नसती तर संबंधित अधिका-यांनी 57 रुपये दराने बारदान खरेदी करुन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केला असता. 57 रुपये दराने बारदान खरेदी करण्यासंबंधी ज्या अधिका-यांनी संमती दिली होती, त्या अधिका-यांविरुध्द कारवाई केली जाईल काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, अधिका-यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. बारदानाचे दर 47 रुपये 42 पैसे असे आले होते. यासंदर्भात चार निविदा प्राप्त झाल्या होत्या ही वस्तुस्थित्ी होती. परंतु नंतर सदर निविदा व्यवहार रद्द करण्यात आला. सरकारच्या या भूमिकेची मार्केटींग फेडरेशनला कल्पना होती. परंतु शासनाने आपली भूमिका अंमलात आणली नाही. त्यामुळे अधिका-यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ KGS/ प्रथम श्री.शिगम 12:40

**पृ.शी.**: श्री.राजेद्र धुर्वे,आंभोरा, ता.कांरजा या कास्तकारास त्याच्या सागवान लाकडांचे विक्रीचे पैसे वन विभागा कडून न मिळणे

**मु.शी.**: श्री.राजेद्र धुर्वे,आंभोरा, ता.कांरजा या कास्तकारास त्याच्या सागवान लाकडांचे विक्रीचे पैसे वन विभागा कडून न मिळणे याबाबत श्री. दिवाकर रावत,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदय, श्री. दिवाकर रावते यांनी "श्री.राजेंद्र धुर्वे,आंभोरा,जि.कारंजा या कास्तकारास त्यांच्या सागवान लाकडाचे विक्रीचे पैसे वन विभागाकडून न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री. राजेंद्र दावजी धुर्वे यांनी शेत सर्वे क्रमांक 71 व 108 मधील शेतातील 1673 साग झाडे तोडीसाठी वृक्ष अधिकारी, कारंजा यांच्याकडे परवानगी मागितली. वन विभागाने संपूर्ण प्रकारे निरीक्षण करुन त्यांना परवानगी दिली आहे.परवानगी देतांना जी काही पध्दत अवलंबिली आहे, त्यासंबंधीची सर्व माहिती निवेदनात नमूद करण्यात आली आहे. उत्पादित सनोपज साग नग 2602 (82.910 घनमिटर) आणि साग भर 15 शासकीय काष्ट आगार, बांगडापूर येथे वाहतूक करुन दिनांक 11.3.2008 च्या लिलावात विक्री करण्यात आले असेही निवेदनात म्हटले आहे. शेत सर्वे क्रमांक 71 व 108 ची मोजणी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कारंजा, यांच्याकडून करुन घेतली. दिनांक 6.12.2007 रोजी खातेदाराने शेतात तोड केलेल्या उत्पादीत वनोपजाचे पासिंग करुन निर्गत परवाना मिळण्यासाठी वृक्ष अधिकारी, कारंजा यांचेकडे अर्ज सादर केला. त्याला परवानगी दिली आहे. त्याप्रमाणे वन खात्याने त्याचा झाडांचा लिलाव देखील केला व त्याप्रमाणे खातेदारास सर्वे क्रमांक 71 व 108 मधील मालाची किंमत अनुक्रमे रुपये 1,44,600 व रुपये 5,10,600 इतकी देय होती. सदर खातेदार आदिवासी आहे. त्या आदिवासी खातेदारास सर्वे 71 चे पैसे दिले. मध्यंतरी दुसरे खातेदार श्री. प्रदीप मसराम यांनी माझ्या सर्व्हे मधील सागाची झाडे तोडून त्याची विक्री केली अशा स्वरुपाची तक्रार वन विभागाकडे केली. प्रथम आदिवासी खातेदाराचे सर्वे क्रमांक 108 मधील सागाच्या झाडाच्या विक्रीचे 5 लाख 10 हजार 600 रुपये देणे अडवून ठेवले आहे. निवेदनात आपण असे म्हटले आहे की, शेतक-यंचे पैसे देण्यास जाणीवपूर्वक विलंब करण्यात आलेला नाही. सदर प्रश्न सर्वे क्रमांक 108 आणि 107 मधील सीमा व मोजमापाबाबतचा वाद मिटल्यानंतर निकाली काढता येईल. ही गोष्ट देखील बरोबर आहे. त्या आदिवासी खातेदाराचे 5 लाख 10 हजार 600 रुपये गेल्या सात आठ महिन्यापासून पडून आहेत.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:45

श्री.दिवाकर रावते.......

एका आदिवासी माणसाचे 5 लाख रुपये देणे बाकी आहे. हा वाद निश्चित कालमर्यादेत संपविला जाईल का? या निर्णयाप्रमाणे हे पैसे व्याजासहित दिले जातील काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, निवेदनात सुस्पष्ट माहिती दिलेली आहे. गट नं.71 चे पैसे दिले आहेत. गट नं.108 चे पैसे देणे शिल्लक आहे. ज्यावेळी सर्व्हे झाला त्यानंतर श्रीमती अनुसयाबाई मसराम यांनी तक्रार दिली. त्यांचे म्हणणे होते की, गट नं.108 चा जो बांध आहे त्याची रेषा निश्चित झालेली नाही. या संदर्भात त्यांनी दुसरा नकाशा दिला. दोन्ही नकाशे उपलब्ध आहेत. त्या नकाशामध्ये गट नं.108 आणि गट नं.107 याच्या मधील बांध रेषेचा निर्णय व्हायचा आहे. त्यांनी जो नकाशा दिला त्यामध्ये गट नं.107 आहे परंतु गट नं.108 नाही. मी स्वत: याबाबत डीएलआर यांना माझ्या कार्यालयात बोलावून घेतले, त्यांच्याशी चर्चा केली. त्यांना सांगितले आहे, उद्यापासून तीन दिवसात रेषा निश्चित करुन द्यावी. बांध रेषा निश्चित झाल्यानंतर त्याप्रमाणे श्रीमती अनुसयाबाई मसराम यांना पैसे दिले जातील व एका आठवडयात हा प्रश्न मिटेल.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बेकायदेशीर सौंदर्य प्रसाधन विक्रीचा धंदा उघडकीस येणे

**मु. शी.** : बेकायदेशीर सौंदर्य प्रसाधन विक्रीचा धंदा उघडकीस येणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुरेश शेट्टी (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "बेकायदेशीर सौंदर्य प्रसाधन विक्रीचा धंदा उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:45

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या प्रकरणी अक्षम्य दुर्लक्ष झालेले नाही असे निवेदनात म्हटले आहे. 140 कोटी रुपयांच माल जप्त करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाने या बाबीकडे काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. माणसांच्या पोटात जाणारी जी औषधे आहेत, शरीरात घेतली जाणारी औषधे यामध्ये काही गैरप्रकार झाले तर अनेक रोग होऊ शकतील, माणसे मृत्युमुखी पडतील. 10 जुलै, 2007 रोजी धाड टाकण्यात आली होती. त्यानंतर 1 महिना 10 दिवसांनी खटला दाखल केला याची कारणे काय आहेत? मध्यंतरी तडजोड चालू होती का? श्री.जैन यांच्याविरुध्द 24.11.2007 रोजी म्हणजे चार महिन्यानंतर पोलिसांकडे जाण्याची कारणे काय आहेत? अधिकारी त्यांच्याशी तडजोड करीत होते का? पोलीस तपास पूर्ण झाल्यानंतर श्री.जैन यांना पोलिसांनी 24.11.2007 रोजी अटक केली असे म्हटले आहे. चौकशी केल्याशिवाय कोणालाही अटक करता येत नाही. लगेच त्याला पी.सी.का मागितली नाही? एवढा मोठा गुन्हा करुनही दुसऱ्या दिवशी या माणसाला जामीन मिळाला. याचा अर्थ अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी याला पाठीशी घातले. जी औषधे लहान मुले वापरतात ती व सौंदर्य प्रसाधने जर्मनीमधून आणतो असे त्यांनी सांगितले. जर्मनीमधून केवळ लेबल्स आणली. भारतात बनावट औषधांची निर्मिती केली. यामध्ये अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली, त्यांना त्वरित बडतर्फ करणार आहात का? त्यांची चौकशी करणार आहात का?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रकरणी 17.7.2007 रोजी कुंदन नॉव्हेल्टी भांडार या दुकानावर एफ.डी.ए.ने रेड घातली. त्यामध्ये खाद्यपदार्थ किंवा औषधे नव्हती. कॉस्मेटिक्स होती. जी फिल्म इंडस्ट्रीमध्ये, टी.व्ही.व ड्रामा कलाकार मेकअपसाठी वापरतात अशी सौंदर्य प्रसाधने होती. मॅन्युफॅक्चररचे नाव मुंबईतच प्रिंट करुन ती लेबल्स बॉक्सवर लावली जात होती. क्वालिटी सबस्टॅण्डर्ड होती. 100 रुपयांची पावडर 300 रुपयांना विकली जात होती.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ........

आणि त्या मॅन्युफॅक्चररकडे लायसेन्स वगैरे काही नव्हते. अशा प्रकारे पोलिसांनी तीन ठिकाणी रेड टाकून 50 लाखाचा माल जप्त करण्यात आला. तसेच या प्रकरणातील आरोपी श्री. देवीचंद जैन आणि त्याचा मुलगा श्री. रमेश जैन हे आहेत व त्यांच्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने आशिवरा पोलीस स्टेशनमध्ये 27 तारखेला एफआयआरही नोंद करण्यात आला. यासंबंधी विधानसभेतही चर्चा झाली होती. ही तक्रार दाखल झाल्यानंतर आरोपीने ॲंटिसिपेटरी बेलसाठी अर्ज केला होता व तो दि. 4.11.2008 रोजी मंजूर झाला होता. मी स्वत: आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत ब्रिफिंग घेताना स्पष्ट विचारले होते की, याप्रकरणात विलंब का झाला ? कारण अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव आहे, हे माझ्या लक्षात आले. याप्रकरणात जे पोलीस अधिकारी इन्व्हॉल्व्ह होते त्या दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून त्यांची चौकशी करण्याचे आदेश कमिशनरांना दिले. या चौकशीचा अहवाल हे अधिवेशन संपण्यापूर्वी देण्यासंबंधीच्या सक्त सूचनाही मी पोलीस आयुक्तांना दिल्या आहेत. कारण यासंदर्भात मी स्वत: समाधानी नाही. ही रेड झाल्यानंतर एफआयआर दाखल करणे आवश्यक होते. कारण एफडीएच्या अधिकाऱ्यांना इन्स्पेक्शन व अरेस्टचे अधिकार नाहीत. म्हणून पोलीस आणि एफडीएच्या अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन को-ऑर्डिनेट ठेवून कशा प्रकारे काम करायचे याबाबतचा ॲक्शन प्लॅन आम्ही तयार करीत आहोत. अगोदरची पध्दत अशी होती की, मुंबई क्राईम ब्रॅंचचे एक पथ कुठेही रेड करायची म्हटली तरी ते पथक एफडीए सोबत असायचे. परंतु ही पध्दत आता बंद करण्यात आली. आता मी माननीय गृह मंत्र्यांना विनंती करणार आहे की, अशा प्रकारचे एक पथ मुंबई आणि ठाणे शहरासाठी तरी देण्यात यावे, कारण या दोन ठिकाणी मॅक्सीमम केसेस होत असतात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, जवळपास 100-150 कोटीचा या जैनचा वार्षिक टर्न-ओव्हर आहे. त्या उत्पादनाची प्रॉडक्शन कॉस्ट 100 रुपये असताना जर्मनीहून आलेला माल असे भासवून 350 रुपयाला ते विकले जाते. अशा प्रकारे महिलांना लुबाडण्यात येते. या लोशनमध्ये ग्लिसरीनचा समावेश असतो काय याबाबत पुरुष सांगू शकत नाहीत परंतु सभागृहात माननीय मंत्री महोदया डॉ. शोभाताई बच्छाव आहेत, त्याच सांगू शकतील. तसे असल्यास या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .........

ग्लिसरीनची रिॲक्शन किती तरी लोकांवर झाली असेल, तसेच कुठल्या प्रकारचे केमिकल मिसळले हेही माहीत नाही परंतु या जैन नावाच्या गृहस्थाला ज्यावेळेस पोलिसांनी पकडले, अरेस्ट केले त्यावेळेस कोणी तरी बाहेरुन आलेला विदेशी पाहुणा अशा थाटात तो होता. कारण त्याने लक्ष्मीदर्शन केले असणार. अर्थात यात माननीय मंत्री महोदयांचा काही संबंध नाही, कारण आताच त्यांच्याकडे या विभागाचा कार्यभार सोपविलेला आहे. परंतु या विभागाच्या माजी मंत्री महोदयांनी एफडीएच्या अधिकाऱ्यांना अशा सूचना दिल्या होत्या की, "याला सांभाळून घ्या, त्याच्यावर कारवाई करु नका" अशी मला माहिती मिळाली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/ 12:55

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, श्री. जैनवर कारवाई करु नये अशा सूचना संबंधित अधिका-यांना आल्या होत्या काय ? डाएटीशअनचे काम श्रीमती अंजली मुखर्जी या करीत असतात. वजन कमी करण्यासाठी श्री. रोहिदास पाटील, माननीय मंत्रीमहोदय श्री. जयंत पाटील आणि मी सुध्दा त्यांच्याकडे गेलो होतो. डाएट करावयाचे आणि नंतर खूप खाल्ले तर वजन काही कमी होत नाही. परंतु यासंदर्भात श्रीमती अंजली यांच्यावर तक्रार झाल्याबरोबर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात आली. परंतु श्री. जैन यांनी जे कॉस्मेटीक बाजारात आणले त्यामुळे आमच्या आया-बहिणींची स्कीन खराब झाली, कमी किमतीचा माल जास्त किमतीत विकला त्यांच्यावर मांत्र काहीच कारवाई झाली नाही. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी पोलीस विभागाचा उल्लेख केलेला आहे परंतु यामध्ये पोलीस विभागाचा काही संबंध येत नाही. तुमच्या कक्षेत जे काही येते त्या प्रमाणे संबंधितावर कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे यापुढे जर असे प्रकार आढळले तर त्यांच्यावर नियमानुसार 3 दिवसांच्या आत कारवाई झाली पाहिजे. फुड अँड ड्रग ॲक्ट आणि कंझ्युमर ॲक्ट अन्वये त्याच्याविरुध्द कारवाई करा. जशी अन्नात भेसळ केली जाते तशाच प्रकारे या ठिकाणी कॉस्मेटीकमध्ये भेसळ झालेली आहे. भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये आपल्याला सुधारणा करावयाची असेल तर आपण तशा प्रकारचा अध्यादेश काढा, कायद्यात दुरुस्ती करा परंतु 3 दिवसात संबंधितावर कारवाई झाली पाहिजे. परंतु आपले फुड अँड ड्रग डिपार्टमेंट फक्त वसूली करण्याचे काम करीत आहे. आपल्या लॅबने अन्नामध्ये किंवा कॉस्मेटीकमध्ये भेसळ झालेली आहे असा रिपोर्ट दिला तर 3 दिवसात संबंधितावर कंपलेंट रजिस्टर करण्याच्या संदर्भात कायद्यात दुरुस्ती केली पाहिजे. संबंधितावर पोलीस कारवाई केली पाहिजे. त्यामुळे कॉस्मेटीक भेसळीच्या संदर्भात आपण काय करणार आहात ? आपल्याकडे मोक्कासारखा कायदा आहे हा मोक्का सुध्दा अशा लोकांना लावला पाहिजे. तेलगी प्रकरणामध्ये सुध्दा आपण अनेक अधिका-यांवर कारवाई केलेली आहे. त्यामुळे बोगस कॉस्मेटीक तयार करणा-या जैनवर आपण मोक्का लावणार आहात काय ? जे लोक अशा प्रकारचे उद्योग करतात त्यांच्यावर शासनाकडून कारवाई केली जाते हे हे महाराष्ट्रातील जनतेला करु द्या. जर अशा प्रकारची कारवई झाली तर यापुढे भेसळीची कोणी हिमंत करणार नाही. आमच्या आया-बहिणींची स्कीन खराब करणा-या लोकांवर आपण काय कारवाई करणार आहात व या पुढे अशा प्रकारची भेसळ होणार नाही यासंदर्भात आपण काय कार्यवाही करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांना सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर या प्रकरणाची चौकशी पूर्ण करुन त्याचा अहवाल माझ्याकडे देण्यात यावा अशा प्रकारचा सूचना मी ऑलरेडी कमिशनरांना दिलेल्या आहेत. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो अहवाल मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास देखील तयार आहे. या कॉस्मेटीकचे सँपल लॅबमध्ये तपासण्यात आले असून या सँपलमध्ये काही फॉल्ट नव्हता. फक्त हे कॉस्मेटीक सब-स्टँडर्डचे होते. पावडर, लीपस्टीकची किंमत 200 रुपये असावयास पाहिजे होती ती त्यांनी 300-350 रुपये ठेवली होती. या सँपलमध्ये काहीही फॉल्ट आढळून आला नाही. कॉस्मेटीक ॲक्टच्या संदर्भात जो कायदा आहे त्या कायद्या प्रमाणे आपण संबंधितांवर चार्जेस लावण्यात आलेले आहेत. फुड अँड ड्रग डिपार्टमेंटचा कोणताही अधिकारी या संबंधितांना पाठीशी घालीत असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कॉस्मेटीकमध्ये भेसळ करण्यात आल्याच्या संदर्भात या ठिकाणी 93 ची सूचना देण्यात आलेली आहे. अन्न व भेसळच्या कायद्यामध्ये आपल्याला सुधारणा करण्याची नितांत गरज आहे. आता नव नवीन प्रॉडक्ट मार्केटमध्ये येत आहेत त्यामुळे आपल्याला कायद्यामध्ये सुध्दा तशाच प्रकारची सुधारणा करावी लागणार आहे. अन्नामध्ये ज्या प्रकारची भेसळ होते व त्यांच्यावर ज्या प्रकारची कारवाई होते तशीच कारवाई कॉस्मेटीकमध्ये भेसळ करणा-यांवर झाली पाहिजे. कॉस्मेटीक उत्पादनांमधील बरीचशी नवीन उत्पादने ही ॲक्टच्या परव्यु बाहेरची आहेत. नवीन कायद्यात आपण हेल्थ केअरचा सुध्दा समावेश करणार आहात काय?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे अधिवेशन संपल्यानंतर आमदारांची एक बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीमध्ये या कायद्यामध्ये कोणत्या प्रकारची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे याचा अभ्यास करण्यात येऊन त्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया, वाशिम, हिंगोली व नंदूरबार या जिल्ह्यात अन्न व औषधी प्रशासन विभागाचे कार्यालय नसणे

**मु. शी.** : गोंदिया, वाशिम, हिंगोली व नंदूरबार या जिल्ह्यात अन्न व औषधी प्रशासन विभागाचे कार्यालय नसणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, गुरुमुख जगवानी, केशवराव मानकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी ( अन्न व औषधे प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, गुरुमुख जगवानी, केशवराव मानकर,वि.प.स. यांनी "गोंदिया, वाशिम, हिंगोली व नंदूरबार या जिल्ह्यात अन्न व औषधी प्रशासन विभागाचे कार्यालय नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** ( श्री. भास्कर जाधव ): : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, गोंदिया, वाशिम, हिंगोली व नंदूरबार या चार जिल्ह्यांची नवीन निर्मिती होऊन दहा-पंधरा वर्षे झाली तरी त्याठिकाणी अन्न व औषधी प्रशासन विभागाचे कार्यालय सुरु झालेले नाही. हे कार्यालस आतापर्यंत का सुरु करण्यात आले नाही ? ते किती दिवसांत सुरु करणार आहात ? जर त्याठिकाणी कार्यालय सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध होत नसेल तर भाड्याने जागा घेऊन त्याठिकाणी किती दिवसांत कार्यालय सुरु करणार काय ? तसेच वाशिम जिल्ह्यात जागा उपलब्ध झालेली आहे. तेव्हा यासंबंधीचा अहवाल पुढील अधिवेशनात ठेवणार काय ? कारण मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती होत नाही म्हणून मी हे रेकॉर्डवर आणत आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे खरे आहे की, मागील दहा वर्षापासून गोंदिया, वाशिम, हिंगोली आणि नंदूरबार या चार जिल्ह्यांत अन्न व औषधी प्रशासन विभागाची कार्यालये सुरु नाहीत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पुढील अधिवेशनात यासंबंधी तरतूद करण्यात येईल. ज्याठिकाणी भाड्याने जागा उपलब्ध होत असतील त्याठिकाणी अन्न व औषधे प्रशासन विभागाचे कार्यालय सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यासाठी जो स्टाफ लागेल त्यामध्ये वर्ग- 2 चे 10 अधिकारी आणि वर्ग-3 व वर्ग-4 चे 32 कर्मचारी लागतील. त्याप्रमाणे वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. एम.पी.एस.सी.मधून उमेदवार प्राप्त झाल्यास त्यांची लवकरात लवकर नियुक्ती करण्यात येईल. वरील चार जिल्ह्याच्या ठिकाणी अन्न व औषधे प्रशासनाची इमारत बांधण्यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल. जर भाड्याने जागा उपलब्ध होत असेल तर त्याठिकाणी जो जास्तीचा स्टाफ आहे त्यांना घेऊन त्याठिकाणी कार्यालय सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वाशिम जिल्ह्यात जागा उपलब्ध झालेली आहे. तेव्हा वाशिम जिल्ह्यात अन्न व औषधे प्रशासनाचे कार्यालय किती दिवसांत सुरु करणार आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, वाशिम येथे जागा उपलब्ध झालेली आहे. त्यासाठी प्रोव्हीजन झालेली आहे. चार जिल्ह्यांच्या ठिकाणी इमारती बांधण्यासाठी बजेटमध्ये तरतूद करुन लवकरात लवकर काम सुरु करण्यात येईल.

...4..

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, गोंदिया, वाशिम, हिंगोली आणि नंदूरबार हे चारही जिल्हे मागासलेले आहेत. या चार जिल्ह्यांची निर्मिती झाल्यानंतर त्याठिकाणी अन्न व औषधे प्रशासन विभागाची कार्यालये सुरु करणे आवश्यक होते. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, भाड्याची जागा उपलब्ध झाल्यास त्याठिकाणी तीन महिन्यांत कार्यालये सुरु करणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : होय.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वर्धा जिल्ह्यातील स्व.बापुराव देशमुख सहकारी साखर कारखान्याच्या संचालकांनी शेतकऱ्यांच्या ऊसाला एक हजार रुपये भाव द्यावयाचा असताना त्यांना प्रति.मे.टन रुपये 850 भाव देणे

**मु.शी.** : वर्धा जिल्ह्यातील स्व.बापुराव देशमुख सहकारी साखर कारखान्याच्या संचालकांनी शेतकऱ्यांच्या ऊसाला एक हजार रुपये भाव द्यावयाचा असताना त्यांना प्रति.मे.टन रुपये 850 भाव देणे याबाबत श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे,वि.प.स.यांनी "वर्धा जिल्ह्यातील स्व.बापुराव देशमुख सहकारी साखर कारखान्याच्या संचालकांनी शेतकऱ्यांच्या ऊसाला एक हजार रुपये भाव द्यावयाचा असताना त्यांना प्रति.मे.टन रुपये 850 भाव देणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा हा प्रश्न आहे. सहकार महर्षी स्व.बापुरावजी देशमुख सहकारी साखर कारखाना जिल्हा वर्धा या कारखान्याच्या संचालकांनी सन 2006-07 मध्ये शेतकऱ्यांना ऊसाला हजार रुपये मे.टन.भाव दिला जाईल असे सांगून शेतकऱ्यांना ऊसाची लागवड करण्यास सांगितले. परंतु शेतकऱ्यांना हजार रुपये न देता प्रति मे.टन 850 रुपये दिले. अजून 150 रुपये प्रति मे.टन देणे बाकी आहे. या संचालकांनी सन 2007-08 मध्ये सुध्दा शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे .....

2007-2008 साली पुन्हा त्या शेतक-यांना सांगण्यात आले होते की, ऊसाला 700 रुपये मे.टन हा भाव देण्यात येईल. प्रत्यक्षात मात्र या शेतक-यांना 625 रुपयांचा भाव दिला म्हणजे त्यांना 75 रुपये कमी देण्यात आले होते. अशा प्रकारे 75 रुपये आणि 150 रुपये या शेतक-यांना देण्याचे बाकी आहे. ते त्वरित देण्याच्या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचा सुध्दा एक सहकारी साखर कारखाना नागपूर येथे असून त्यांनी त्या वर्षी एक हजार रुपये भाव दिला होता आणि या वर्षी 1200 रुपये भाव दिला होता. या कारखान्या पासून 50 किलोमिटर्स्र अंतरावर असलेल्या कारखान्याने मात्र 150 रुपये कमी भाव दिला होता. शेतक-यांना 150 रुपये प्रती टन या दराने उरलेली थकबाकी देण्यात आली पाहिजे. साखरेचे भाव कोसळत आहेत असे कारण सांगितले जात आहे. तेव्हा वर्धा जिल्हयातील या साखर कारखान्या पुरताच साखरेचा भाव घसरत होता काय ? की संपूर्ण राज्यातील साखर कारखान्याच्या संदर्भात साखरेचा भाव घसरला होता याबाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. वर्धा जिल्हयातील स्व- बापुरावजी देशमुख सहकारी साखर कारखान्याने 75 रुपये आणि 150 रुपये प्रती मे.टन या शेतक-याना देण्याचे का थांबवले आहे ? 150 रुपये आणि 75 रुपयांची थकबाकी या कारखान्याने तातडीने शेतक-यांना दिली पाहिजे. दुसरी गोष्ट अशी आहे की, या साखर कारखान्याने ऊसाच्या भावाच्या संदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. परंतु प्रत्यक्षात त्याप्रमाणे शेतक-यांना भाव दिला नाही व त्यांची फसवणूक केली आहे. 2006-2007 मध्ये 1000 रुपये प्रती मे.टन भाव देण्या ऐवजी त्यांनी 850 रुपये भाव दिला आणि 150 रुपयांची थकबाकी राहिली आहे. त्याचप्रमाणे 2007-2008 सालातील 75 रुपयांची थकबाकी राहिलेली आहे तेव्हा ही थकबाकीची रक्कम संबंधित शेतक-यांना त्वरित देण्यात येणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश् दांडेगावकर :सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये जेव्हा हा विषय उपस्थित करण्यात आला होता तेव्हा त्यावर चर्चा झाली होती. स्व. बापुरावजी देशमुख सहकारी साखर कारखाने वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. या कारखान्याला ऊस मिळाला पाहिजे त्याचप्रमाणे पुढच्या वर्षाच्या हंगामासाठी जास्त ऊसाची लागवड झाली पाहिजे असा जाहिरात देण्या मागचा त्या कारखान्याचा उद्देश होता. ज्या वेळी त्यांनी जाहिरात दिली होती त्यावेळी 1800 रुपये

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ...

साखरेचा दर होता .2006-2007 ऊसाचे जे गाळप झाले होते तेव्हा ऊस तोडणी आणि वाहतूक खर्च वजा करुन त्यांनी 850 रुपयांचा दर दिला होता...

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :निवेदनामध्ये जे सांगितलेले आहे तेच आपण पुन्हा सांगत आहात.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर :सभापती महोदय, या कारखान्याने एक हजार रुपये हा भाव ज्यावेळी जाहीर केला होता त्यावैळी 1800 रुपये साखरेचा भाव गृहीत धरला होता परंतु नंतर हा भाव एक हजार रुपये झाल्यामुळे हे पैसे हा कारखाना देऊ शकले नाही. वैधानिक न्युनतम किंमत त्या कारखान्याने दिली आहे किंवा नाही हे पहाणे एवढीच राज्य शासनाची जबाबदारी आहे. या कारखान्याने दोन्ही हंगामात वैधानिक न्युनतम किंमत दिलेली आहे. त्याचप्रमाणे पुढे परिस्थिती सुधारली तर शेतक-यांना पैसे देण्याच्या बाबतीत कारखान्याला सूचना देण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृशी. : पांढरकवडा., जि. यवतमाळ येथील कापूस संकलन केद्रावर
कापूस विकण्यासाठी आलेल्या शेतक-याचा झालेला मृत्यू
मु.शी: पांढरकवडा, जि. यवतमाळ येथील कापूस संकलन केद्रावर
कापूस विकण्यासाठी आलेल्या शेतक-याचा झालेला मृत्यू
याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल,वि.प.स.
यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( पणन राज्यमंत्री ) :सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल यांनी "पांढरकवडा, जि. यवतमाळ येथील कापूस संकलन केद्रावर कापूस विकण्यासाठी आलेल्या शेतक-याचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( भास्कर जाधव )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय,यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा या कापूस संकलन केन्द्रात तीन चार दिवसापूर्वी एक हजार बैलबंडया आणि 650 इतर वाहने कापूस घेऊन आली होती. या निवेदनात असे म्हटलेले आहे की, या केन्द्रामध्ये 3.77 लाख क्विटल कापसाची खरेदी झ्रालेली आहे सद्यस्थितीत कापूस खरेदीचा ओघ वाढलेला असून कापूस ठेवण्यास कमी जागा असल्यामुळे खरेदी प्रक्रियेवर प्रचंड ताण आला होता."

सभापती महोदय, या कापूस संकलन केन्द्रावर कै. रामा आनके या शेतकऱ्याचे निधन झाले आहे. त्याने तीन दिवसा पूर्वी बैलबंडीत कापूस आणला होता परंतु त्याची तोलाई झाली नाही त्याचप्रमाणे चौथ्या दिवशी तोलाई होण्याची शक्यता न वाटल्यामुळे त्याने शेजारच्या व्यक्तीला आपल्या बैलबंडीचे रक्षण करण्यास सागितले होते व तो घराकडे जाण्यास निघाला होता ऑटोरिक्षा न मिळाल्यामुळे तो पायी जाण्यास निघाला होता. रस्त्यामध्ये तो थंडीने कूडकुडल्याने मरण पावला. अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे शेतक-याच्या कापसाची तोलाई न झाल्यामुळे त्याला तीनही रात्री थंडीत कुडकुडत रहावे लागले .कापूस वेळेवर घेण्याची जबाबदारी शासनाची असल्यामुळे कापूस वेळेवर न घेतल्यामुळे थंडीत कुडकुडत बसल्याने त्याचा मृत्यू झाला असून ही जबासबदारी शासनाने घेतली पाहिजे. श्‌ासनाच्या चुकीमुळे त्य शेतक-याचा मृत्यू झाला आहे तेव्हा त्याच्या कुटुबियाना पणन महासंघाच्या वतीने वा शासनाच्या वतीने काही आर्थिक मदत देण्यात येणार आहे काय ? कापूस पणन महासघ्ंाचे अध्यक्ष या ठिकाणी उपस्थित आहेत मला त्यांना असे सांगावयाचे आहे की, कापूस खरेदी केन्द्रावर कापसाची आवक प्रचंड वाढली आहे.

नंतरश्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 13:10

श्री. फुंडकर ....

ज्या केंद्राने स्वत:हून नकार दिल्यानंतरही अधिकारी कापूस खरेदी करीत असल्याने तेथे कापूस ठेवण्यासही जागा राहिली नाही. म्हणून मग त्यांनी मोठ्या मोठ्या जिन्स बाजूला ठेवल्या आणि ज्या छोट्या जिन्स आहेत त्यांच्याबरोबर व्यवहार करता येतो म्हणून त्यांच्यावर बरोबर केला. म्हणूनच मी आता या ठिकाणी संघाचे माननीय अध्यक्ष बसले आहत त्यांनाही यात लक्ष घालण्याची विनंत करतो आणि अपेक्षा व्यक्त करतो की ते यामध्ये लक्ष घालतील. तसेच या निमित्ताने शासनाला माझी विनंती आहे की, आपल्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे या शेतकऱ्याचा मृत्यू झाला असेल तर त्याची जबाबदारी शासनाने स्वीकारावी आणि त्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला काही आर्थिक मदत देण्याचा विचार शासन करणार आहे का ? तसेच शेतकऱ्यांच्या बैलबंड्यांचे मोजमाप होऊनही ज्या जिनिंग-प्रेसिंग तयार असतील त्यांच्यासाठी त्या कापसाची खरेदी विक्री आपण सुरू करणार का ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, जी बाब सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी विचारली आहे ती घटना पांढरकवडा केंद्रामध्ये घडली आहे. 19 तारखेला एपीएमसीने निवेदन काढले की, जागा नसल्याने आता कापसाची खरेदी बंद करणार आहोत. पण तरीही तेथे इतर 10 केंद्रे सुरू होती आणि त्यातून सुमारे 3.77 क्विं. कापसाची खरेदी झालेली आहे. पण त्यानंतर कापूस ठेवण्यास जागा नसल्याने कापसाची खरेदी आता यापुढे करणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले. पण अचानक तेथे 6-7 वाहने आणि काही बैलगाड्या आल्या. तरीही एपीएमसीच्या त्या ग्राऊंडमध्ये कापूस वजन करून घेत होते आणि जी वाहने येतील ती त्याच दिवशी रिकामी होतील असाही तेथील कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केला. त्याची आकडेवारीदेखील माझ्या कडे आता आहे. नाफेडची 213 केंद्रे आणि सीसीआयची 64 केंद्रे महाराष्ट्रात चालू आहेत. तसेच गरज भासल्यास आणखी केंद्रे वाढविण्याच्या सूचनाही संबंधितांना दिल्या जातील. सभापती महोदय, दुसरा प्रश्न तेथे आलेल्या शेतकऱ्याच्या मृत्यूसंबंधात विचारला गेला आहे. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, सदर शेतकऱ्याचे नाव श्री.रामा अनाके असे असून त्याचा मृत्यू 19 तारखेला झाला आहे. 20 तारखेला त्याच्या नावावर एका टोकनवर खाडाखोड करून कापूस मोजला गेल्याचे दाखविले आहे. सदर शेतकऱ्याचा पोस्ट मार्टेम अहवाल अजून आलेला नाही. जर यामध्ये आपला कोणी अधिकारी दोषी असेल, कापूस पणन महासंघाच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडली असेल तर त्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदत करण्याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

*** ..... एनएन 2 ...

**पृ. शी.** : खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत झालेले अनेक गैरप्रकार.

**मु. शी.** : खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत झालेले अनेक गैरप्रकार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. मदन पाटील (पणन मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व पाशा पटेल यांनी "खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत झालेले अनेक गैरप्रकार " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... एनएन 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये पणन मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी माझ्या नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेमध्ये ज प्रश्न उपस्थित केलेले आहेत तेच या उत्तरामध्ये दिलेले आहेत. माझा यातून नेमका प्रश्न असा होता की, एखाद्या संस्थेची निवडणूक लागल्यानंतर तिच्या सभासदांच्या ज्या प्राथमिक याद्या तयार होतात त्या संबंधित अधिकाऱ्यांकडून जात असतात. या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव आणि ए.आर. यांच्या माध्यमातून डीडीआर, निवडणूक अधिकारी यांच्याकडे त्या याद्या जात असतात. या याद्या तयार करीत असताना त्यात जी बोगस नावे घुसविली गेली त्याला हे दोन अधिकारी, सचिव आणि ए.आर., हे जबाबदार आहेत. त्या याद्यांबाबत हरकत घेतली तेव्हा ती नावे काढण्यात आली. परंतु ज्या 211 लोकांची नावे त्या यादीतून हरकत घेतल्यानंतर बाद करण्यात आली ती नावे अगोदर त्या यादीत एपीएमसीचे सचिव आणि ए.आर यांनी जाणीवपूर्वक घुसविली होती त्याची दखल घेऊन शासन त्यांच्यावर काही कारवाई करणार आहे काय ?

श्री. मदन पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी संचालक मंडळाची निवडणूक लागली होती आणि त्यासाठी पहिली मतदार यादी तयार करण्याचे कामाची जबाबदारी मार्केट कमिटीचे सचिव असतात त्यांच्यावर असते. जे ग्रामपंचायतीचे विकास सोसायटभ्चे सदस्य असतात त्यांची यादी तयार करण्याचे काम ए.आर. यांच्याकडे असते. या याद्या तयार केल्या जातात त्यानंतर त्यावर आक्षेप घेण्यासाठी वेळ दिलेला असतो त्याप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी स्वत:च आक्षेप घेतले होते. ...

( यानंतर श्री. सरफरे .... ओओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मदन पाटील...

खरे म्हणजे सेक्शन 13 (1)(ब) प्रमाणे मतदार यादीमधून नावे कमी करण्यासाठी वेळ दिलेला असतो. त्यामुळे त्यांनी दिलेल्या आक्षेपाप्रमाणे मतदार यादीची छाननी करण्यात आली. त्यामध्ये अे.आर.आणि सचिवांनी पाठविलेल्या यादीतील जी नावे होती ती डी.डी.आर. यांनी वगळली. त्यामध्ये 32 प्रमुख मतदार वगळण्यात आले होते. त्यामध्ये असे करण्यात आले होते की, त्याठिकाणी निवडणुकीतून जे सदस्य निवडून यायला पाहिजे ते आले नव्हते, म्हणून त्यांना को-ऑप्ट केले होते. त्यामुळे अशा सदस्यांना मतदानाचा अधिकार नाही. अशी तरतूद सहकार कायद्यात असल्यामुळे डी.डी.आर. आणि जॉईंट रजिस्ट्रार यांनी ही नावे वगळली. यामध्ये कोणतेही राजकारण झाले नाही. आपण 211 मतदारांबाबात आक्षेप घेतला. यामध्ये अडते आणि व्यापारी यांनी दोन वेळा लायसन्स रिनिव्ह केले पाहिजे अशी यामध्ये अट आहे. त्यांची नावे मतदार यादीमध्ये असतील तर त्यांना मतदानाचा हक्क आहे. त्यामुळे दोन-तीन वर्षानंतर हे झाले असल्यामुळे ही नावे कायदेशीररित्या कमी केली आहेत. हा कायदा सहा महिन्यापूर्वी झाला असल्यामुळे ही बाब सचिवांच्या लक्षात आलेला नाही. परंतु आक्षेप घेण्यात आल्यानंतर डी.डी.आर. यांनी कायदेशीररित्या ती नावे वगळण्यात आली आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितलेले बरोबर आहे. परंतु अे.आर. हे तालुका निवडणूक अधिकारी असतांना त्यांच्या स्तरावर हा आक्षेप घेतला होता . त्यावेळी त्यांनी तो आक्षेप अनाठायी असल्याचा निकाल दिला होता. आणि त्यानंतर डी.डी.आर. यांनी नावे बाद केली. अे.आर. यांनी आक्षेप अनाठायी असल्याचा निकाल कशाच्या आधारावर दिला? अे.आर. यांनी निकाल दिल्यानंतर आणि डी.डी.आर. यांनी यादी रद्द केल्यानंतर ते जाणीवपूर्वक सहकार्य करीत होते हे सिध्द होते की नाही? बोगस नावांना संमती देणारे अे.आर. आणि सचिव हे दोघेही जबाबदार असतांना डी.डी.आर. यांनी बरोबर निकाल दिला. परंतु अे.आर. आणि सचिवांनी जाणीवपूर्वक नावे पाठविली असे आपणास वाटत नाही काय? असेलतर आपण त्याबाबत कारवाई करणार काय?

श्री. मदन पाटील : सभापती महोदय, अे.आर. यांनी संबंधित नावे कमी करण्याच्या बाबतीत ज्यावेळी सजेशन आणि ऑब्जेक्शन मागविले जाते त्यावेळी हा प्रश्न उद्भवतो. ही जी नावे पाठविण्यात आली ती वरच्या पातळीवर अे.आर. यांनी सुचवावयाची होती. या संदर्भात आक्षेप आल्यानंतर डी.डी.आर. यांनी नावे कमी केली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, सोसायटी आणि ग्रामपंचायत मतदारसंघातील मतदारांची नावे सुध्दा खालून येतात. परंतु व्यापारी मतदारसंधाच्या नावांची यादी सचिव तयार करतात. त्यामधून त्यांनी बोगस नावे तयार केली. ही बोगस नावे सचिवांनी घुसवून पाठविली असा आपला प्रश्न आहे?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, बोगस यादी पाठविण्यात आलेली नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती दरवर्षी सप्टेंबरमध्ये लायसन्स देते. लायसन्स दोन वेळा रिनिव्ह झाले पाहिजे. याठिकाणी संबंधित कायदा नवीन असल्यामुळे त्यातील तरतुदी समजण्यात फरक झाला. याठिकाणी 211 नावे यादीमधून रितसर कमी करण्यात आली आहेत. त्याकरिता लायसन्स देण्यापासून त्यांचा दोन वर्षाचा कालखंड पूर्ण झाला पाहिजे तरच त्या मतदार यादीमध्ये त्यांचे नाव येऊ शकते. त्यामुळे यामध्ये कोणतेही राजकारण केलेले नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

**पृ. शी**. : कोळसा खाणीमुळे संकटात असलेला व्याघ्र प्रकल्प

**मु. शी**. : कोळसा खाणीमुळे संकटात असलेला व्याघ्र प्रकल्प याबाबत सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नाना पंचबुध्दे (खनिकर्म राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील यांनी "कोळसा खाणीमुळे संकटात असलेला व्याघ्र प्रकल्प" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी या सदनामध्ये विचारलेल्या प्रश्नाला अतिशय चांगल्या प्रकारे बगल देण्याचा प्रयत्न या निवेदनामध्ये करण्यात आला आहे. मी असे विचारले होते की, व्याघ्र प्रकल्प ज्या वन क्षेत्रामध्ये आहे. त्याठिकाणी खाण क्षेत्र असल्यामुळे हा प्रकल्प संकटात येणार आहे. त्या मुद्याला हात लावण्यात आलेला नाही. गेल्या 35 महिन्यात 44 व्यक्तिंचा मृत्यू झ ाला, त्यालाही हात लावण्यात आलेला नाही.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, जोपर्यंत या प्रकल्पाच्या बाबतीत सुरक्षिततेची हमी मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही परिस्थितीत खाणकामाला परवानगी देणार नाही याची हमी शासन देणार काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, मे. अंदानी पॉवर कंपनीस केंद्र शासनाच्या दिनांक 6.11.2007 च्या आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील लोहरा (वेस्ट) कोळसा खंडाचे वाटप करण्यात आले आहे. वन संवर्धन अधिनियम 1980 व पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 च्या तरतुदीच्या अधीन राहून त्यांना परवानगी देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, या प्रकल्प यंत्रणेने एन्व्हायरो सर्च, पुणे या कंपनीची नेमणूक केलेली आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाव्दारे प्रकल्पपूर्व मान्यता देताना प्रकल्पामुळे होणाऱ्या पर्यावरण विषयक परिणामांचा सर्वंकष अभ्यास करुन संभाव्य दुष्परिणाम कमीतकमी करण्यासाठीची उपाययोजना तसेच सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेल्या सूचना विचारात धेण्यात येतात.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हे सर्व निवेदनामध्ये दिलेले आहे. ते परत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगण्याचे कारण नाही. पर्यावरणवादी कार्यकर्ते उपोषणाला बसले होते आणि त्यांनी सातत्याने हा मुद्दा मांडला परंतु आपण त्यांच्याशी बोलत नाही. त्यांचे ऐकत नाही. संभाव्य दुष्परिणाम कमी करावयाचे हे आपण मान्य करता. तो व्याघ्र प्रकल्प या सगळ्यांमुळे अडचणीत येणार आहे. त्याबाबतीत शासनाची काय भूमिका आहे ? त्या संघर्षामध्ये एवढी माणसे मेली त्याबाबतीत शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, अदानी पॉवर कंपनीस केंद्र शासनाकडून कोळशाचा खंड वाटप झालेला आहे. खंड वाटप करीत असताना त्यांना काही अटी घातलेल्या आहेत त्या अटींप्रमाणे त्यांना वन संरक्षण कायदा, 1980 प्रमाणे प्रपोजल दाखल करावे लागेल. त्यांनी पर्यायी जमीन द्यावयाची असते तसेच इतर काळजी घ्यावयास पाहिजे. आधी ते त्यांचे प्रपोजल देतील आणि ते प्रपोजल राज्य शासनाकडे आल्यानंतर राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही कार्यकर्ते उपोषणाला बसले होते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. बबनराव पाचपुते.....

मी त्या ठिकाणी गेलो. त्यांनी उपोषण सोडलेले आहे. अदानी आणि एन.जी.ओ. यांची एकत्रित बैठक झालेली आहे. एकत्रित बैठक घेऊन जोपर्यंत सगळ्या शंकांचे निरसन होत नाही तोपर्यंत ते प्रपोजल आम्ही वर पाठविणार नाही. त्या ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास किंवा जंगल अडचणीत येणार नाही. कायद्याप्रमाणे काम केले जाईल. कोणालाही पुढे जाऊन मदत केली जाणार नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्रात जे विद्युत प्रकल्प आहेत त्यांना दररोज 95 हजार टन कोळसा लागतो. डब्ल्यूसीएल ही केंद्र शासनाची कंपनी आहे. त्यांनी शासनाला असे पत्र लिहिले होते की, आपल्या थर्मल पॉवर स्टेशनसाठी जो कोळसा पाहिजे त्याचा आमच्याकडे पुढच्या 10 वर्षापर्यंतचा स्टॉक आहे. नवीन जे कोल बेल्ट किंवा डिपॉझीट्स आहेत त्या ठिकाणी खाजगी खाणींना एन.ओ.सी. देऊ नये. असे त्यांनी पाच सहा वर्षापूर्वी कळविले आहे काय ? महाराष्ट्र शासन ज्या ठिकाणी कोळसा आहे त्या ठिकाणी खाजगीला एन.ओ.सी. का देते ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याची माहिती आता माझ्याकडे नाही. ती माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

---

.....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 12 बाबत**

**तालिका सभापती** (श्री. भास्कर जाधव ) : यानंतर नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 12 हे सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी दिलेल्या सूचनेच्या संदर्भात आहे. परंतु दोन्ही सन्माननीय सदस्य सदनामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे आता पहिली लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय सुध्दा उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये अनुक्रमांक 5 वरील प्रश्न याच विषयाच्या संदर्भात होता आणि त्यावर खुलासेवार चर्चा झालेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी त्यासंदर्भात उत्तर दिलेले आहे. मी निवेदन क्रमांक 12 ज्यावेळी पुकारले त्यावेळी नियम 93 ची सूचना देणारे दोन्ही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते. मी लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर आपण बोलत आहात.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )**.......

मी निवेदन पुकारले त्यावेळी सन्माननीय सदस्य उपस्थित असते तर मी पुढे बोलणार होतो. परंतु सन्माननीय सदस्यच अनुपस्थित असल्यामुळे मी पुढे बोललो नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी या दोघांनीही आम्ही एका बैठकीला जाणार आहोत, त्यामुळे संबंधित मंत्रिमहोदयांना हे निवेदन नंतर घेण्याची आमच्यावतीने विनंती करावी असे मला सांगितले होते.

**तालिका सभापती** : मी दोन्ही सन्माननीय सदस्यांचे नाव पुकारले होते त्यावेळी आपण मला विनंती केली नव्हती. त्याचप्रमाणे आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 5 हा यासंदर्भातच होता, त्यावर बरीच चर्चा झालेली आहे. आपले म्हणणे असेल तर हे निवेदन पुन्हा ठेवण्यात येईल.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : अमरावती विभागातील खाजगी माध्यमिक व प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे अन्न शिजवून देण्याच्या योजनेतील मानधनामध्ये झालेली अनियमितता तसेच वाशिम जिल्हयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन अकोला जिल्हयामार्फत अदा करण्याची केलेली मागणी

**मु. शी.** : अमरावती विभागातील खाजगी माध्यमिक व प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे अन्न शिजवून देण्याच्या योजनेतील मानधनामध्ये झालेली अनियमितता तसेच वाशिम जिल्हयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन अकोला जिल्हयामार्फत अदा करण्याची केलेली मागणी याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांचे कार्यालयात विविध मागण्या/समस्यांचे निवारणार्थ दिनांक 22/11/2008 रोजी आयोजित केलेली सहविचार सभा, अमरावती विभागातील खाजगी माध्यमिक व प्राथमिक शाळांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत अन्न शिजवून देण्याची योजना सुरु झाल्यापासून मुख्याध्यापक/इतर कर्मचारी यांना मानधन देण्यात आले नसणे, सुमारे 80 ते 85 लक्ष निधीची अनियमितता झाली असणे, यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी विभागातील योजनेमधील तुकड्यांवरील शिक्षक व अमरावती जिल्ह्यातील 7 शाळांमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांचे माहे मार्च 2008 पासून वेतन अनुदान बंद असणे, राज्यातील 203 माध्यमिक शाळा व 1034 तुकड्यांवरील शिक्षक/कर्मचाऱ्यांना द्यावयाचे ऑक्टोबर, 2008 पासूनचे वेतन अदा न होणे, वाशिम जिल्ह्याचे वेतन विलंबाने होणे, वाशिम जिल्ह्यातील शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन अकोला जिल्हा बँक ऐवजी वाशिम जिल्हा को.ऑप.बँकेतून अदा करावे

3....

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे.....

अशी लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, शालेय पोषण आहार योजनेचा निधी शाळांना अतिविलंबाने मिळणे, या समस्यांची पुर्तता न झाल्यामुळे अमरावती विभागातील शिक्षण क्षेत्रात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई"

श्री.नाना पंचबुध्दे ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, शालेय पोषण आहारासंबंधीचा महत्वाचा प्रश्न आहे. केंद्र सरकार पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना राज्यात 1998 पासून सुरु आहे. या योजनेमध्ये केंद्र सरकार एकूण खर्चाच्या 75 टक्के अनुदान देते आणि राज्य सरकार 25 टक्के अनुदान देते. 1998 ते 2002 पर्यंत हे काम करणा-या मुख्याध्यापकांना किंवा शिक्षकांना 100 रुपये आणि 500 पेक्षा अधिक विद्यार्थी असतील तेथे 200 रुपये मानधन दिले जात होते. 2003 नंतर या राज्यामध्ये काही विभागामध्ये हे मानधन देणे सुरु आहे. मात्र अमरावती विभागामध्ये भेदभाव करुन सन 2002-2003 पासून हे अनुदान बंद केलेले आहे. खरे तर हे मानधन वाढवून मिळण्याची आमची मागणी आहे. कारण पूर्वी तांदूळ दिला जात होता, आता शिजविलेले अन्न द्यावे लागते. त्यामुळे हे मानधन तातडीने देण्यासंबंधी शासन कार्यवाही करणार आहे काय ? सभापती महोदय, अकोला जिल्हयाचे विभाजन करुन 2001 साली वाशिम जिल्हा निर्माण करण्यात आला. त्याला आता 7 वर्षे झाली आहेत. वाशिम जिल्हयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन व्हाया अकोला होते. या लोकांची वेतनाची देयके प्रथम अकोला येथील ट्रेझरीमध्ये जातात त्यानंतर वाशिमला जातात. शासनाने शॉर्टकटचा अवलंब करुन डायरेक्ट वाशिम जिल्हयातील शिक्षकांना चेक पाठवावे. आदिवासी क्षेत्रात 1 तारखेला वेतन होते. म्हणून वाशिम जिल्हयातील शिक्षकांचे वेतन सरळ वाशिम जिल्हयामार्फत दिले जाईल काय ? तसेच शालेय पोषण आहार योजनेमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. या योजनेमध्ये शिक्षकांना दिले जाणारे मानधन एक महिन्याच्या आत पुन्हा सुरु करण्याची कार्यवाही केली जाईल काय ?

श्री.नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, सन 2003-2004 पासून शालेय पोषण आहार योजना सुरु झालेली आहे. जिल्हा परिषद व नगरपरिषदांच्या शाळांमध्ये मुख्याध्यापक व शिक्षकांना मानधन दिले जात होते. खाजगी माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी अनुदान मंजूर नसल्यामुळे त्यांना ते देण्यात आलेले नाही. काही विभागामध्ये मानधन देणे सुरु आहे अशी माहिती माननीय सदस्यांनी दिली आहे, ही माहिती तपासून घेण्यात येईल....

श्री.डी.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, यापूर्वीही याबाबतची माहिती तपासून घेण्यासाठी वेळ मागण्यात आली होती. आजपर्यंत ही माहिती आली पाहिजे होती. महाराष्ट्रात काही विभागात मानधन देणे सुरु आहे आणि काही विभागातील काही जिल्हयात मान दिले जाते अशी माझी माहिती आहे.

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदयांनी पीठासीन अधिकाऱ्यांकडे पाहून उत्तर द्यावे.

RR......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नाना पंचबुध्दे : काही विभागामध्ये मानधन देणे सुरु आहे असे माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु माझ्या माहिती प्रमाणे असे काहीही सुरु नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती तपासून घेऊन त्याबाबतची माहिती पटीलावर ठेवण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : शिक्षकांचे पगार उशिरा होणे ही केवळ एकाच जिल्हयामध्ये नाही तर संपूर्ण राज्यामध्ये अडचण आहे. याचे कारण असे की, शिक्षकांना जिल्हा बँका मार्फत किंवा सहकारी बँका मार्फत पगार दिला जातो. राष्ट्रीयकृत बँकाकडून पगार दिला तर तो मिळण्यास उशीर होणार नाही. तेव्हा शिक्षकांना राष्ट्रीयकृत बँकाकडून पगार देण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला ती बाब तपासून घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू. डायगव्हाणे यांनी वाशिम जिल्ह्याचा प्रश्न उपस्थित केला. वाशिममध्ये अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेची शाखा आहे. तेव्हा वाशिममधील शाखेमधून शिक्षकांचे पगार देण्यासंबंधी शिखर बँकेला शासनाच्या वतीने सांगितले जाईल.

श्री. रामनाथ मोते : वाशिम जिल्हयातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संदर्भात शासनाने उत्तर दिलेले आहे. अकोला बँकेकडून वाशिम बँकेकडे पगार ट्रान्स्फर होण्याच्या संदर्भात अकोला बँकेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. शिक्षकांना राज्य सरकारी कर्मचा-यांप्रमाणे 1 तारखेला वेतन मिळाले पाहिजे. तेव्हा वेतन मिळण्यास विलंब होऊ नये म्हणून वेतन/भत्त्याची बिले वाशिम शाखेकडे पाठवून त्या शाखेमार्फत वेतन देण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येईल काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : वाशिमला जी बँक आहे ती अकोलस जिल्हा बँकेची शाखा आहे. त्या शाखेला पगार देण्याचे अधिकार द्यावयाचे असतील तर त्यासाठी शिखर बँकेला शासनस्तरावरुन सांगावे लागेल...

श्री. जयंत प्र. पाटील : रेकॉडवर चुकीचे उत्तर येत आहे. यामध्ये शिखर बँकेचा काहीही संबंध नाही. राष्ट्रीयकृत बँकाकडे ही व्यवस्था गेली तर जिल्हा बँकावर अन्याय होईल. जिल्हा बँकांचे जिल्ह्यामध्ये नेटवर्क असते. राष्ट्रीयकृत बँका जिल्ह्यामध्ये नाहीत. 1 तारखेला पगार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील....)

होण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती बँकमध्ये वेळेवर पे ऑडर आली पाहिजे आणि तशी ती येण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाला सूचना देण्यात येतील काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : त्याबाबतीत तातडीने सूचना देण्यात येतील

----

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR-3

MSS/ KTG/ SBT/ 13:30

**पृ. शी.** : खानदेशातील औद्योगिक क्षेत्रातील अनुशेष दूर

दूर करण्यासाठी करावयाची उपाययोजना

**मु. शी.** : खानदेशातील औद्योगिक क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी करावयाची उपाययोजना यासंबंधी श्रीमती मधू जैन व श्री. जयप्रकाश छाजेड,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधु जैन (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"खानदेशातील जळगाव, धुळे, नंदूरबार या तिन्ही जिल्ह्यातील औद्योगिक विकास राज्यातील इतर विभागापेक्षा अतिशय कमी प्रमाणात असून औद्योगिक क्षेत्रातील अनुशेष ही एक चिंतेची बाब होणे, उर्वरित वैधानिक विकास मंडळाच्या औद्योगिक निधीचा वाटप खानदेशातील या तीन जिल्ह्यातील औद्योगिक विकासाठी न मिळणे, औद्योगिक विकासावर खर्च करणारा निधी कमी प्रमाणात मिळणे, परिणामी राज्यातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत खानदेशाच्या तीन जिल्ह्याचा औद्योगिक अनुशेष वाढत राहणे, परिणामी या तीन्ही जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती अ व ब श्रेणीहून कमी असणे, त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील विशेषत: धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी पट्टे तुलनात्मकदृष्ट्या मागास राहणे, आदिवासी गरीब, जनतेची उपासमार होणे, याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष, खानदेशातील औद्योगिक क्षेत्राचा विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा व या तिन्ही जिल्ह्यांसाठी उच्चस्तरीय अधिका-यांची नेमणूक करुन अंमलबजावणी करावी. खानदेशातील औद्योगिक क्षेत्रातील अनुशेष लवकरात लवकर दूर करण्यासाठी शासनाने योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग व संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



श्रीमती मधू जैन : जळगाव जिल्ह्याचा बराचसा भाग आदिवासी विभागत मोडतो. खानदेशातील जळगाव, धुळे,नंदूरबार या जिल्ह्यांचा औद्योगिक विकास मागील 50 वर्षात म्हणावा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

तसा झालेला नाही. या विभागातून इस्ट-वेस्ट आणि नॉर्थ-वेस्ट असे देशभराला जोडणारे रेल्वेमार्ग जातात. तसेच गुजरात आणि मध्यप्रदेशला जोडणा-या राष्ट्रीय महामार्गांचे जाळे पसरलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधू जैन..

परंतु औद्योगिकदृष्टया खानदेशाची मात्र पिछेहाट झालेली आहे. खानदेशातील जळगाव येथे 606 हेक्टर, चाळीसगाव येथे 85 हेक्टर, भुसावळ मध्ये 81 हेक्टर, धुळे येथे 255 हेक्टर, नरडाणे येथे 268 हेक्टर, नवापूर येथे 51 हेक्टर, अशी खानदेशात एकूण 1348 हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्रासाठी असून 875 हेक्टर जमिनीवर अद्यापपर्यंत काहीही करण्यात आलेले नाही. धुळे जिल्हयातील नरडाणे येथील 666 हेक्टर आणि नवापूर येथील 214 हेक्टर जमिनीवर देखील काहीही करण्यात आलेले नाही. वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून खानदेशाचा औद्योगिकदृष्टया विकास व्हावा यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. या विभागात जे उद्योग सुरु होते ते बंद पडलेले आहेत. खानदेशात नव्या औद्योगिक वसाहती निर्माण करण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. जळगाव येथील 119 उद्योग बंद पडलेले आहेत. भुसावळ, चोपडा, चाळीसगांव येथे एकही औद्योगिक युनीट सुरु नाही. संपूर्ण खानदेशातील अनेक उद्योग बंद पडलेले आहेत. जळगाव येथील ब्लो प्लॅास्ट,एजीस केमिकल, एस्ट्रेला बॅट्रीज् सारखे मोठे उद्योग बंद पडून दुसरीकडे गेले आहेत हे खरे आहे काय ? जळगावमध्ये डाळ मिलचा मोठा उद्योग आहे जळगावमध्ये डाळ मिलचे 150 पेक्षा जास्त उद्योग कार्यरत होते. ते उद्योग सुध्दा जळगाव शहराच्या बाहेर जात आहेत. खानदेशामध्ये त्यांना जकात, विक्रीकर इत्यादी सुविधा इतर राज्यापेक्षा कमी मिळते. जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्हयात औद्योगिक विकास व्हावा यासाठी शासन एखादा कालबध्द कार्यक्रम आखणार आहे काय? यासंदर्भात शासन एक अभ्यासगट नेमणार आहे काय? या विभागातील उद्योगांना शासन कोणत्या विशेष सवलती देणार आहे? खानदेशातील 25 तालुक्यापैकी 6 तालुके "ड" व 19 तालुके "ड प्लस " श्रेणीमध्ये असल्याचे नमूद केले आहे. सदर विभाग "ड" आणि "ड प्लस" मध्ये येत असल्यामुळे तेथे मोठे उद्योग येऊ शकत नाही. त्या ठिकाणी मोठे उद्योग यावेत यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे?

श्री.राणा रणजितसिंह पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधी जे निवेदन वितरीत करण्यात आले आहे त्यात या सर्व मुद्दयांचा परामर्श घेण्यात आलेला आहे. खानदेशात जळगाव, धुळे, नंदुरबार असे तीन जिल्हे आहेत, त्यात 25 तालुके आहेत. त्यात 6 "ड" श्रेणीमध्ये वर्गीकृत केले आहेत आणि 19 तालुके "ड प्लस" मध्ये वर्गीकृत केले आहेत. वर्गीकरण केल्यामुळे इन्सेटिव्ह

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील...

आपण त्यांना जास्त देतो. धुळे आणि नंदुरबार हे लो एच.डी.आय. असल्यामुळे आम्ही त्यांना वेगळया सवलती दिल्या आहेत. 2007 मध्ये जे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. त्या पॅकेजमध्ये या भागाला जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. धुळे जिल्हयातील नरडाणे या ठिकाणच्या औद्योगिक क्षेत्राचा उल्लेख करण्यात आला. तेथे मेसर्स ब्रेक्स ऑटो लिमिटेड यांनी तेथे 65 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्या ठिकाणी 350 लोकांना रोजगाराची निर्मिती करुन देणार आहे. तेथेच वर्टेक्स लिमिटेड नावाची कंपनी आहे. त्यांनी 500 कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याचे ठरविले आहे. 2800 लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. याबाबतीत त्यांनी उद्योग विभागास लेखी कळविले आहे. खानदेशात मोठया प्रमाणात उद्योग आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत एखादा अभ्यास गट नेमावा अशी सूचना केली आहे आणि औद्योगिक क्षेत्र वाढविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखावा अशीही मागणी या निमित्ताने केली. त्यांच्या या सूचनेचा तसेच मागणीचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्रीमती मधू जैन : जळगाव व धुळे येथे पाच विशाल प्रकल्प प्रस्तावित आहेत. ते प्रकल्प कोणते आहेत व ते कधी सुरु होणार आहेत ? त्या प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे? खानदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ केल्याशिवाय औद्योगिक क्षेत्राला चालना मिळणार नाही. ही बाब लक्षात घेता खानदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे काय ? त्या प्रस्तावाची देखील सद्य:स्थिती काय आहे?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, जे मेगा प्रॉजेक्ट आहेत त्यामध्ये नरडाणा येथील 2 प्रकल्प आहेत. मे.ब्रेक्स ऑटो लिमिटेड यांची 66 कोटी रुपयांची गुंतवणूक असून 350 रोजगार निर्मिती होणार आहे. मे.वर्टेक्स लिमिटेड यांची 512 कोटी रुपयांची गुंतवणूक असून 2800 लोकांना रोजगार दिला जाणार आहे. जळगाव येथे जैन इरिगेशन सिस्टिम लिमिटेड यांची 165 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून 611 लोकांना रोजगार दिला जाणार आहे. जैन इरिगेशन सिस्टिम लिमिटेड, बांभोरी यांच्यामार्फत 385 कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन 765 लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. सुप्रीम इंडस्ट्रीज, जामनेर यांच्यामार्फत 300 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून 600 लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, मागील 8-10 वर्षाच्या काळात खानदेशात, विशेषत: जळगावात नवे उद्योग आलेले नाहीत. पंचतारांकित एमआयडीसी जळगाव येथे सुरु करण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे का? जेणेकरुन त्या परिसरात नवीन उद्योग येऊ शकतील. पंचतारांकित एमआयडीसी सुरु करण्याबाबत शासन विचार करणार आहे का?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : पंचतारांकित एमआयडीसी सुरु करण्याची संकल्पना सध्या तरी नाही. परंतु धुळे, नरडाणा, नवापूर, जळगाव, चाळीसगाव आणि भुसावळ या 6 ठिकाणी 2006 पासून किती गुंतवणूक झाली आणि किती रोजगार उपलब्ध होणार आहे याची माहिती निवेदनात नमूद केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी जळगाव येथे पंचतारांकित एमआयडीसी सुरु करण्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबत निश्चित विचार केला जाईल, परंतु पंचतारांकित न म्हणता नवीन जागा शोधून तेथे सोयी उपलब्ध करुन दिल्या जातील.

श्री.दिवाकर रावते : पंचतारांकित एमआयडीसी म्हणजे नक्की काय?

श्री.नितीन गडकरी :(जागेवर बसून)तत्कालीन उद्योगमंत्री श्री.डाके यांना विचारायला सांगा.

(उत्तर आले नाही)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, निवेदन वाचले तर पूर्णपणे निराशाजनक असल्याचे दिसून येईल. प्रत्येक मुद्याच्या शेवटी "होणार आहे, होणार आहे, होणार आहे" असेच वाक्य नमूद केले आहे. 2005-06 पासून 1772 भूखंड जळगाव जिल्हयात वाटले गेले. जे 5 मोठे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...........

उद्योग येत आहेत ते जुनेच आहेत. 1772 पैकी किती भूखंडांवर उद्योग उभे राहिले? 173 व्यक्तिंना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रोजगार मिळाला ही अत्यंत निराशाजनक स्थिती आहे. इतर जिल्हयांमध्ये उद्योगांना ज्या सवलती मिळतात तशा सवलती जळगाव जिल्हयामध्ये जाहीर करुन उद्योगांना आकर्षित करण्यासाठी कोणती पावले उचलणार आहात? या संदर्भात तातडीने बैठक घेण्यात येईल काय?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : मी यापूर्वीच सांगितले आहे की, पॅकेज स्कीम ऑफ इन्सेटिव्हप्रमाणे या जिल्हयाबाबत काय इन्सेटिव्ह देऊ शकतो हे नमूद केले आहे. हे जिल्हे डी प्लसमध्ये आहेत. कोणत्या उद्योगाला पकडून आणू शकत नाही. आकर्षित करण्यासाठी इन्सेटिव्ह देतो. या भागात इन्सेटिव्ह दिल्यामुळे खास करुन 5 मेगा प्रकल्प येत आहेत. याचा अर्थ त्यांना इन्सेटिव्ह पुरेसे वाटले. आंत्रप्युनर किंवा उद्योगपती यांना ते योग्य वाटले. इतर उद्योगांना आकर्षित करण्यासाठी बैठक घ्यायला अडचण नाही.

-------------------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भातील विविध क्षेत्रातील अनुशेष दूर करण्याबाबत माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी अद्यापही न होणे

**मु.शी.**: विदर्भातील विविध क्षेत्रातील अनुशेष दूर करण्याबाबत माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी अद्यापही न होणे याबाबत प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उर्जामंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोळशावर आधारीत वीज निर्मिती प्रकल्पांना नांदगाव पेठ औद्योगिक क्षेत्रातील जमिनी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय उद्योग विभागाने तातडीने रद्द करावा अशी मागणी अमरावती जिल्हा नियोजन व विकास समितीने दिनांक 24 ऑक्टोबर, 2008 रोजीच्या बैठकीत करणे, जिल्हाधिकारी अमरावती यांनी 27 ऑक्टोबर 2008 च्या पत्रान्वये उद्योग विभागाला ही बाब कळविणे, सन 1982, 1994 व त्यानंतर 2006 च्या सिंचनाबाबत राज्य सरासरीमध्ये प्रत्येक वेळी अमरावती जिल्ह्याचा सिंचन अनुशेष कमी न होता वाढत जाणे, भारतीय संविधानाच्या खंड 371 च्या उपखंड 2 अन्वये भारताच्या मा.राष्ट्रपतींनी 9 मार्च 1994 च्या आदेशान्वये अनुशेष निर्मूलनाची विशेष जबाबदारी राज्याच्या राज्यपालांवर सोपविणे, मार्च 2010 पर्यंत हा अनुशेष संपुष्टात आणण्याचे मा.राज्यपालांनी दिलेले निदेश, या निदेशांचे स्वरुप स्पष्ट करणारा मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक 6 मे 2008 रोजी (सन 2003 ची याचिका क्रमांक 5872) दिलेला निर्णय, 50 वर्षाच्या प्रदिर्घ कालखंडानंतर अप्पर वर्धा धरणातून अमरावती जिल्ह्याला उपलब्ध झालेला अंदाजे 50 हजार हेक्टरच्या सिंचन क्षमतेतून एका वेळी 36 ते 37 हजार हेक्टरची सिंचन क्षमता हिरावून घेण्याच्या या प्रकारात जागा वाटपात उद्योग विभागाने घेतलेली आघाडी, अमरावती जिल्हा नियोजन व विकास समितीच्या बैठकीत एकमताने त्या विरोधात प्रस्ताव मंजूर होणे, तशाच अर्थाचा प्रस्ताव अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आमसभेत, अमरावती जिल्हा परिषदेच्या व अमरावती महापालिकेच्या आमसभेत एकमताने मंजूर होणे, तरी देखील हे जागा वाटप रद्द करण्याबाबत उद्योग विभागाकडून कोणतीही कारवाई न होणे, दिनांक 26 जुलै, 2008 रोजी विमानतळासाठी अग्रक्रमाने जागा देऊ अशी शासनाने तयारी दर्शविणे, तरीही अद्याप याबाबत कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

श्री. सुनील तटकरे (उर्जामंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एक गोष्ट मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की विदर्भाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहासमोर आलेला आहे. कारण या लक्षवेधीला दिलेल्या निवेदनावरुन असे दिसते की, महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून इतका अघोरी प्रकार महाराष्ट्र राज्याने यापूर्वी कधीच पाहिला नाही. विशेष म्हणजे या लक्षवेधी सूचनेत इतके मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत परंतु त्यातील एकाही मुद्याचे उत्तर निवेदनातून दिलेले नाही, एकाही मुद्याला निवेदनात हात घातला नाही. निवेदनात बाकीचे सर्व पुराण घेतलेले आहे परंतु मूळ मुद्याबाबत काहीच उल्लेख नाही. या मुद्यांचे स्पष्टीकरण निवेदनात नसले तरी देखील आज या लक्षवेधीवर चर्चा झालीच पाहिजे, आजच या गोष्टीचा निकाल लागला पाहिजे म्हणून ती पुढे ढकलण्यात येऊ नये अशी आमची मागणी आहे. या अनुषंगाने मी असे लक्षात आणून देऊ इच्छितो की, अमरावती जिल्हा नियोजन व विकास समितीने याबाबतीत एकमताने ठराव पास केलेला आहे हा या लक्षवेधी सूचनेतील पहिला मुद्दा आहे. त्याबाबत निवेदनात एक वाक्य सुध्दा दिलेले नाही. भारताचे माननीय राष्ट्रपती यांनी घटनेच्या 371 (2) अन्वये माननीय राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविणार असे आदेश निर्गमित केले आहेत. त्यालाही एका शब्दाने उत्तर दिलेले नाही. माननीय राज्यपालांनी सन 2001 मध्ये 15 डिसेंबर रोजी निदेश दिले होते. सन 2010 पर्यंत जलसिंचनाचा अनुशेष पूर्ण करणार असे हे निदेश होते परंतु त्यासंदर्भात देखील कुठलेच स्पष्टीकरण करण्यात आले नाही. हायकोर्टाने सुध्दा माननीय राज्यपालांच्या निदेशांच्या अनुषंगाने निर्णय दिलेला आहे तो म्हणजे "Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like Marathwada & Vidarbha. The Directives of the Governor are binding on the State." तसेच उच्च न्यायालयाने या निर्णयात पुढे असेही म्हटले आहे की, "Under Article 371, there is 'Special Responsibility' imposed on the Governor to ensure that there is no backwardness in Vidarbha & Marathwada regions and the same was a Constitutional obligation imposed on the Governor which cannot be frustrated." हे शासनाला सांगितलेले आहे. These are the directives and you must remove the backlog. बॅकलॉग रिमूव्ह

.....3

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख.....

करण्यासाठी मदत करा असे आदेश दिले असताना शासनाने मात्र नेमके उलटे काम केले आहे. या दोन तीन मुद्यांचे स्पष्टीकरण दिलेलेच नाही. विदर्भात सन 1982 मध्ये 134 हजार हेक्टरचा सिंचनाचा अनुशेष होता तो सन 1994-1995 आणि आता सन 2006-07 मध्ये हा अनुशेष वाढत जाऊन 223 हजार हेक्टर एवढा झालेला आहे. त्याला कुठल्याच प्रकारे उत्तर दिलेले नाही. अशा प्रकारे गरिबाच्या घरावर शासकीय दरोडा पडावा या थाटात 50 हजार हेक्टरची सिंचन क्षमता मिळवायला 50 वर्षे लागली. हे घटनेच्या विरोधात आहे. कारण एकाही मुद्याला शासनाने निवेदनातून उत्तर दिलेले नाही. म्हणून माझी विनंती आहे की, ही लक्षवेधी अजिबात पोस्टपोन करु नये, यासंबंधीचा निर्णय आज सभागृहातच झाला पाहिजे आणि तो जनतेला सुध्दा समजला पाहिजे. कारण विदर्भातील जनतेच्या इतक्या तीव्र भावना आहेत की आजच हा निर्णय झाला पाहिजे. या अनुषंगाने अमरावती जिल्हा नियोजन व विकास समितीने एकमताने ठराव पास केला, अमरावती जिल्हा परिषदेने एकमताने ठराव पास केला, अमरावती नगरपरिषदेचाही एकमताचा ठराव पास झालेला आहे त्याला काहीच महत्व नाही काय ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की कृपया आपण या लक्षवेधीच्या अनुषंगाने प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, कृपया आपण समजून घ्यावे एवढीच माझी आपल्याला विनंती आहे. विदर्भातील गरिबाच्या घरावर दरोडा पडलेलाआहे त्याची या सभागृहाने सुध्दा नोंद घेतली पाहिजे. अशा सर्व गोष्टी लक्षवूधी सुचनेत अंतर्भूत असूनही कुठल्याच मुद्याचे उत्तर शासनाने दिलेले नाही, ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. हे एक प्रकारे ही कायदेभंग चळवळीचीच नोटीस शासनाने दिलेली आहे, असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. घटनेच्या विरोधात, कायद्याच्या विरोधात, माननीय राज्यपालांच्या निदेशांच्या विरोधात, हायकोर्टाच्या निदेशांच्या विरोधात जाऊन शासन हे सर्व करीत आहे. सन 1980 पासून 1995 पर्यंत दरवर्षी सभागृहात अप्पर वर्धा प्रकल्पासंबंधीचे प्रश्न उपस्थित होत आहेत. सन 1965 चा प्रकल्प 50 हजार हेक्टर सिंचन क्षमता असलेले चार प्रकल्प यात असून जर असाच प्रकार शासनाला करायचा असेल तर हे चारही प्रकल्प आजच बंद करावेत, परंतु बेकायदेशीर कृत्य शासनाने करु नये, ते प्रकल्प रद्द करावेत.

श्री. नितीन गडकरी : महोदय, ही लक्षवेधी सूचना सिंचन अनुशेषाच्या तसेच वीज प्रकल्पाच्या संदर्भात असून सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा विषय येथे उपस्थित केला....

..नंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

खरे म्हणजे या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील माननीय ऊर्जामंत्र्यांनी आपल्या अधिकारातील उत्तरे दिलेली आहेत. परंतु या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्ताना घटनात्मक मुद्दे अन्यायकारक केले आहेत याबाबतीतील परवानगी सिंचन खात्याने दिलेली आहे. त्यामुळे या लक्षवेधीच्या संदर्भात सिंचन खात्याच्या मंत्र्यांना सुध्दा चर्चेसाठी बोलावण्यात यावे व दोन्ही मंत्र्यांनी संयुक्त उत्तर द्यावे. संयुक्त उत्तर या लक्षवेधी सूचनेला मिळाले नाही तर सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेबांना न्याय मिळणार नाही. हा जिव्हाळयाचा विषय आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणच्या प्रकल्पासांठी जागा दिलेली असतांना विभागाने हलवायाच्या घरावर जसे तुळसीपत्र ठेवले जाते तसे केलेले आहे. महत्तम अनुशेष असलेल्या जिल्हयांमधील अनुशेष अजून सुध्दा दूर झालेला नाही. या ठिकाणी निसंकोचपणे या प्रकल्पांना जागा देण्यात आलेली आहे. या लक्षवेधीच्या उत्तरासंदर्भात तीन्ही मंत्र्यांना या ठिकाणी बोलावले पाहिजे. महाराष्ट्र निर्माण झाल्यपासून विदर्भाच्या विकासावर एवढया मोठया प्रमाणात निगेटीव्ह दरोडा पहिल्यांदाच पडलेला आहे त्यामुळे आमच्यावर पडलेल्या दरोडयातून आम्हाला वाचवा. ही लक्षवेधी पोस्टपोन्ड करु नका. चार प्रकल्पाच्या संदर्भात 36300 हेक्टरचे जे आपण वाटप केलेले आहे ते आपण एका वाक्यात रद्द करावे.

**उपसभापती** : संबंधित सन्माननीय मंत्रीमहोदयांना या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात बोलवावयाचे असेल तर ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवू नका तर सभागृहाचे कामकाज माननीय सिंचन मंत्री येईपर्यंत तहकूब करावे अशी विनंती आहे.

(विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भाची 36000 हेक्टरची सिंचन क्षमता यामध्ये जाणार आहे अशा प्रकारचे खात्याचे अधिकृत उत्तर आलेले आहे. परंतु या लक्षवेधी सूचनेत केवळ 32000 हेक्टर सिंचन क्षमतेचेच उत्तर आलेले आहे. वरुन चोरुनच्या चोरुन सावगिरी असा प्रकार या ठिकाणी झालेला आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सिंचन मंत्री महोदयांचे सुध्दा उत्तर येणे अपेक्षित आहे. या विषयाच्या संदर्भात विदर्भामध्ये संताप व्यक्त होत आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : संबंधित मंत्रीमहोदय येईपर्यंत मी पुढील लक्षवेधी सूचना घेतो. मंत्रीमहोदय येईपर्यंत पुढील कामकाज तरी होईल.

(विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपल्या चेंबरमध्ये संबंधित मंत्रीमहोदयांना बोलावून घ्या आणि त्यांनी यातील एकाही मुद्याचे उत्तर का दिले नाही ते विचारा. अशाच प्रकारे काम चालणार असेल तर आम्हाला येथेच कायदेभंग करावा लागेल. त्यामुळे मंत्रीमहोदय येईपर्यंत सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी स्थगित करावी अशी माझी विनंती आहे.

(विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात आपल्या दालनात बैठक बोलवल्यानंतर आपण सभागृहात येऊ. विदर्भाच्या प्रश्नाचे गांभीर्य सरकारच्या लक्षात येत नसेल तर ते बरोबर नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.साहेबांनी या ठिकाणी जी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे त्यातील पहिले वाक्य असे आहे की, "कोळशावर आधारीत वीज निर्मिती प्रकल्पांना नवपेठ औद्योगिक वसाहत क्षेत्रातील जमीन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय."....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात आम्हाला दोन्ही विभागाच्या मंत्रीमहोदयांचे एकत्र उत्तर हवे आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये अमरावती जिल्हयातील चार वेगवेगळया प्रकल्पांच्या संदर्भात विचारणा करण्यात आलेली आहे.

(विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, चार प्रकल्प कोणते येणार आहेत, त्यातील कोणत्या प्रकल्पांना मान्यता दिली व कोणत्या प्रकल्पांना मान्यता दिली नाही याबाबत निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, मी निवेदनात स्पष्ट नमूद केलेले आहे की, मे.सोफिया पॉवर कंपनी लि.आणि टी.एस.आर.पॉवर प्रा.लि.,मे.वर्धा पॉवर कंपनी आणि मे.आर.एस.इंडिया प्रा.लि.नवी दिल्ली हे चार प्रकल्प येणार आहेत. दोन प्रकल्पांना मान्यता दिलेली नाही. ..... अडथळा .....

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 56 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : सभागृहाची बैठक मी आता स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक 2.45 वाजता पुन्हा सुरु होईल.

( 2.08 ते 2.45 पर्यत सभागृहाची बैठक स्थगित झाली )

----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरानंतर --- )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती.**

**उपसभापती** : मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, सभागृहाची बैठक स्थगित झाली होती तेव्हा कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्र. 4 वर चर्चा सुरू होती. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि इतर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या या लक्षवेधी सूचनेमध्ये 3 खात्यांशी संबंधित मुद्दे असल्याचे सन्माननीय सदस्य प्रा.देशमुख यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर त्या तिन्ही खात्याच्या मंत्र्यांनी येथे त्यावेळी उपस्थित असणे आवश्यक आहे. तसेच त्या त्या खात्याशी संबंधित विषयाबाबतचा तपशील मागवून घेऊन त्यांचे एकत्रित उत्तर येथे येणे अपेक्षित आहे म्हणून ही लक्षवेधी सूचना सामेवार, दिनांक 29 डिसेंबर 2008 रोजी पुन्हा चर्चेला घेण्यात येईल, तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आम्ही प्रश्न वा लक्षवेधी सूचना देत असतो तेव्हा त्यातील विषय किती खात्यांशी संबंधित आहेत याचे ज्ञान आपल्या अधिकाऱ्यांना, सचिवांना असले पाहिजे आणि त्याप्रमाणे त्यांनी त्या त्या खात्याकडे तो प्रश्न वा ती लक्षवेधी सूचना तपशीलवार माहिती येण्यासाठी पाठविली पाहिजे. आता इतक्या उशीराने या लक्षवेधी सूचनेमध्ये तीन खात्यांशी संबंधित विषय असल्याचे आपल्या लक्षात आल्यामुळे आपण ही लक्षवेधी सूचना सोमवार पर्यंत पुढे ढकलली आहे. पण तोपर्यंत या ठिकाणी आम्ही रात्री 11 वाजेपर्यंत काम करीत असताना सकाळचा सभागृहाचा जवळपास दीड तास या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये निष्कारण वाया गेला आहे. तेव्हा त्याला जबाबदार कोण आहे हे ठरविले गेले पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी मी सहमत आहे. यापुढे असे होणार नाही याची निश्चितपणे दक्षता आपण घेऊ. तरी आता आपण पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ.

***

...... वायवाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MMP/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 14:45

**पृ. शी.** : श्रीराम विद्यालय, सारोळा (ता.औसा,जि.लातूर) या शाळेसंबंधात शिक्षणाधिकाऱ्यांची चाललेली मनमानी

**मु. शी.** : श्रीराम विद्यालय, सारोळा (ता.औसा,जि.लातूर) या शाळेसंबंधात शिक्षणाधिकाऱ्यांची चाललेली मनमानी यासंबंधी श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" श्रीराम विद्यालय, सारोळा, ता.औसा, जिल्हा लातूर या शाळेतील कायम सेवेत असलेल्या मुख्याध्यापक व संस्थेचा वाद धर्मादाय आयुक्त कार्यालयाकड प्रलंबित असणे, कोणतेही कार्यकारी मंडळ अस्तित्त्वात नसताना संसेच्या सचिवांनी मुख्याध्यापकांना अनधिकृतपणे निलंबित करणे, उक्त प्रकरणी शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद,लातूर यांनी अनधिकृतरित्या मान्यता देणे, बेकायदेशीर निलंबनाविरूद्ध मुख्याध्यापकांनी उपोषण केले असता त्यांचे निलंबन मागे घेणे, पुन्हा काही महिन्यांनी धर्मादाय आयुक्तांचे बनावट पत्र सादर करून उक्त संस्थेच्या सचिवांनी शाळेत नसलेल्या व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणातील शिक्षकास बेकायदेशीर प्रभारी मुख्याध्यापक म्हणून मान्यता देणे व अगोदरच्या मुख्याध्यापकांना बडतर्फ करणे व प्रभारी म्हणून मान्यता दिलेल्या मुख्याध्यापकाला शाळेत रूजू करून घेतलेले नसतानाही त्यांचे वेतन काढणे, शिक्षणाधिकाऱ्यांचया बेकादेशीर कृत्यामुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करायाची कार्यवाही व उपाय योजना. "

श्री.नाना पंचबुद्धे (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... वायवाय 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचना क्र.5 वरील मा.शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हे एक अतिशय गंभीर प्रकरण आहे. या संबंधित संस्थेमध्ये वाद चालू आहे आणि तो सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित आहे. 11.10.2008 ला सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी एक पत्र दिले आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे आणि ती मी माहितीसाठी सभापती महोदय, आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना देऊ इच्छितो. त्यात त्यांनी म्हटलेले आहे की, सदर प्रारूपार्थ अद्यापपर्यंत निकाल निघालेला नाही त्यामुळे प्रश्न करता येत नाही. असे असतानाही शिक्षणाधिकाऱ्यांनी याची दखल घेतलेली नाही आणि वादग्रस्त संस्था चालकांच्या ठरावाला मान्यता देऊन मुख्याध्यापकांना बडतर्फ करण्याचे काम केलेले आहे. या नंतर संबंधित मुख्याध्यापक आणि कर्मचारी उपोषणाला बसले. त्यामुळे 24 ऑक्टोबरला त्यांच्या निलंबनाचा जो निर्णय दिला होता तो मागे घेण्यात आला. त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांनी म्हणजे

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

24 डिसेंबरला त्याच संस्था चालकांचे ऐकून जे शिक्षक सेवेमध्येच नाहीत .....

( यानंतर श्री. सरफरे ..... झेडझेड 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

त्याला मुख्याध्यापकाचा चार्ज देण्यात आला. त्या शिक्षकाने शाळेमध्ये फक्त 87 दिवस काम केले आहे. याविरुध्द श्री. जाधव नावाचे शिक्षक हायकोर्टामध्ये गेले असता हायकोर्टाने निर्णय दिला की, ज्या शिक्षकाची शाळेमध्ये सेवा झालेली नाही त्यांना मुख्याध्यापकाच्या पदावर आपला हक्क सांगता येणार नाही. असे सांगून हायकोर्टाने ते मॅटर निकाली काढले. ज्या शिक्षकाला कायम मुख्याध्यापक म्हणून दिलेला चार्ज दिला होता त्याच्याकडून तो चार्ज काढून घेण्याचा शिक्षणाधिकाऱ्यांनी 24.12.07 ला आदेश दिला. शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेला हा निर्णय चुकीचा असल्यामुळे उपसंचालकांकडे दाद मागितली पाहिजे. हे मुख्याध्यापक उपसंचालकांकडे दाद मागण्यासाठी गेले. आणि त्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना निर्णय दिला की, तुम्ही घेतलेला निर्णय शाळा संहितेनुसार चुकीचा आहे. आणि उपसंचालकांनी शिक्षणाधिकाऱ्यांना आदेश दिले की, आपण नियमबाह्य काम केले आहे. त्यामुळे आपण दिलेले आदेश त्वरित रद्द केले पाहिजेत. उपसंचालकांच्या आदेशानुसार शिक्षणाधिकाऱ्यांनी 24.12.07 चा आदेश रद्द करुन त्यांना कामावर घेतले. असे असतांना सुध्दा "लक्ष्मी दर्शन" होण्याचे काम मध्यंतरीच्या काळात झाले. पुन्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी तिसऱ्यांदा त्या मुख्याध्यापकाला निलंबित केले. ही अत्यंत खेदजनक बाब आहे असे मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते. माझा प्रश्न असा आहे की, उपसंचालकांनी आदेश देऊन सुध्दा संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांचे आदेश सुध्दा ऐकले नाहीत ही बाब गंभीर आहे. असे शिक्षणाधिकारी जर लोकशाहीला फाटा देत असतील, आपला मनमानी कारभार करीत असतील तर अशा शिक्षणाधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे. या कामामध्ये झालेली अनियमितता दूर करुन संबंधित मुख्याध्यापकावर झालेला अन्याय आपण दूर करणार काय?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, सदरहू संस्थेचे प्रकरण धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) लातूर यांनी जी अनियमितता केली असल्याचे आढळून आले आहे. त्याबाबत संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. आणि त्यांनी चुकीची केलेली गोष्ट दुरुस्त करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांच्या दुसऱ्या उत्तराशी मी सहमत आहे. पहिल्या उत्तराच्या बाबतीत सांगू इच्छितो की, चौकशी वर्षानुवर्षे होत रहाते. त्यामुळे ही चौकशी दोन दोन वर्षे होत रहाणार. अधिकाऱ्यांना असे वाटते की, आमदार आमचे काहीही वाकडे करु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

शकत नाहीत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, त्या शिक्षणाधिकाऱ्यांना आपण निलंबित करणार काय?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, होय.

----

**पृ.शी./मु.शी.** : लक्षवेधी सूचना क्रमांक तीन पुढे ढकलण्याबाबत

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : सभागृहाच्या कामकाज पत्रिकेमध्ये तिसऱ्या क्रमांकावर दाखविण्यात आलेली "म्हाडाने प्रतिक्षानगर, शीव येथील बांधलेल्या सदनिका पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे" या विषयावरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सुरक्षा रक्षक मंडळाने खाजगी कंपन्यांना सुरक्षा रक्षक पुरविण्याची सेवा खंडीत करणे

**मु. शी.** : सुरक्षा रक्षक मंडळाने खाजगी कंपन्यांना सुरक्षा रक्षक पुरविण्याची सेवा खंडीत करणे यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, एस. क्यु. जमा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक कायद्यानुसार तरतुदीची व्यवस्थित अंमलबजावणी न झाल्यामुळे लाखो सुरक्षा रक्षकांचे खाजगी ठेकेदारांकडून होत असलेले शोषण, परिणामी खाजगी ठेकेदारांमार्फत काम करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांनी मंडळाकडे नोंदणीबाबत केलेले अर्ज व संघटनामार्फत आस्थापनाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर निर्णय होऊन न्यायालयाने आदेश देणे, त्यानुसार सुरक्षा रक्षकांचे अभिलेखे तपासून मंडळाने त्यांच्याकडून भरुन घेतलेले बी फॉर्म, तसेच वैद्यकीय पडताळणीचे दाखले सुध्दा मंडळाला सादर करण्यात येणे, परंतु अद्यापि निर्णय न होणे, मंडळाने यानंतर तांत्रिक बाबी व शासकीय आदेशाचा आधार घेऊन पुन्हा अभिलेख सादर करण्यास भाग पाडणे, सुरक्षा रक्षक मंडळाने सहा आठवड्यात अर्ज निकालात काढावयाचे असताना देखील गत ११ महिन्यांपासून सदर प्रकरण प्रलंबित असणे, परिणामी सुरक्षा रक्षकांनी मोर्चे काढून आमरण उपोषण करणे, त्यामुळे सुरक्षा रक्षकांवर व त्यांच्या कुटुंबियांवर हलाखीचे जीवन जगण्याची आलेली वेळ, शासनाने मंडळातील सुरक्षा रक्षकांची नोंदणी थांबवून कंपन्यांना मंडळामार्फत सुरक्षा रक्षक पुरविण्याची सेवा खंडीत करणे, पर्यायाने कंपन्यांनी खाजगी ठेकेदारांमार्फत सुरक्षा रक्षक नेमणूक करणे परिणामी खाजगी ठेकेदारीच्या बेकायदेशीर व्यवसायास शासनाकडून चालना मिळणे, त्यामुळे परिणामी खाजगी सुरक्षा रक्षकांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, शासनाने कायद्यातील २३ कलम रद्द करणे व खाजगी ठेकेदाराकडे काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांची मंडळामध्ये नोंदणी करुन पुणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. जयप्रकाश छाजेड....

नागपूर या जिल्ह्यांमध्ये कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नवाब मलिक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मुंबईमधील सुरक्षा रक्षकांचे हित जोपासून शासनाने 1981 मध्ये सुरक्षा रक्षकांसाठी महामंडळ निर्माण केले. या सुरक्षा रक्षक महामंडळामध्ये जवळपास 20365 सुरक्षा रक्षकांची नोंदणी झाली आहे. सुरक्षा रक्षकांची नोंदणी कमी कां झाली याबाबत मंत्रिमहोदय आपल्या उत्तरामध्ये खुलासा करतील काय?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड ....

याशिवाय 27 वर्षापेक्षा जास्त काळ होऊन देखील 90 टक्के सुरक्षा रक्षक हे मंडळाकडे नोंद झालेले नसतील तर त्यांची संपूर्ण नोंदणी करण्याचा काही कालबध्द कार्यक्रम शासन आखणार आहे काय ? तिसरा प्रश्न असा की, सुरक्षा रक्षक कोर्टामध्ये गेले होते. न्यायालयाने मंडळाला असे आदेश दिले आहेत की, सुरक्षा रक्षकांना परत कामावर घ्यावे. त्याची पूर्तता कधी होणार ?

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून तीन प्रश्न उपस्थित करण्यात आले. मुंबईमध्ये जे सुरक्षा रक्षक मंडळ आहे त्यांच्याकडील सुरक्षा रक्षकांची संख्या जवळपास 13 हजार आहे. आणखी भरती करणार आहेत. मी आजच माझ्या भाषणामध्ये सांगितले की, जवळपास 50 हजार सुरक्षा रक्षकांची भरती करण्याची शासनाची तयारी आहे. खाजगी सुरक्षा रक्षकांवर आपण काही नियंत्रण ठेवता काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. सुरक्षा रक्षकांची जी पिळवणूक होत होती ती थांबविण्यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे. परंतु खाजगी क्षेत्रामध्ये जे सुरक्षा रक्षक भरती करणाऱ्या यंत्रणा आहेत अशा जवळपास 2 हजार पेक्षा जास्त यंत्रणा आहेत. त्यासंदर्भात केंद्र शासनाचा पसारा ॲक्ट आहे. त्या अनुषंगाने परवानगी घेऊन ते यंत्रणा चालवितात. आपल्या कायद्याच्या नियम 23 अंतर्गत त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची तरतूद आहे. भविष्य काळामध्ये असे नवीन धोरण स्वीकारण्यात येईल की, ज्या ज्या ठिकाणी गरज असेल त्या ठिकाणी बदल करु आणि सुरक्षा रक्षक मंडळाकडून भरती करण्याची कार्यवाही सुरु करु. सुरक्षा बल निर्माण करु. खाजगी लोकांना जी परवानगी देण्यात येते त्या ठिकाणी ते लोकांना व्यवस्थित पगार देतात की नाही, त्यांची पिळवणूक करतात काय वगैरे बाबतीत मॉनिटरींग करण्याची शासनाची तयारी आहे. सन्माननीय सदस्यांनी कोर्टाच्या आदेशाच्या संदर्भात प्रश्न विचारला. निवेदनामध्ये याची माहिती दिलेली आहे. 188 संस्थांनी अर्ज केले होते. 2455 सुरक्षा रक्षकांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. काही लोकांची नोंदणी करुन घेण्यात आली. ज्यांच्या बाबतीत कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही अशा काही लोकांचे अर्ज फेटाळण्यात आले.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, परराज्यातील गुन्हेगार लोकांची खाजगी एजन्सीमार्फत भरती झाल्यामुळे राज्याच्या सुरक्षिततेला धोका उत्पन्न झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, अनेक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. सुभाष चव्हाण ....

आस्थापनांकडून सुरक्षा रक्षकांची मागणी येऊन सुध्दा सुरक्षा रक्षक मंडळाने आस्थापनांना सुरक्षा रक्षक पुरविले नाहीत हे खरे आहे काय ? सुरक्षा रक्षक मंडळाकडून ठेकेदारांना मदत करण्याच्या हेतूने अनेक आस्थापनांविरुध्द दाखल केलेले खटले परस्पर शासनाला माहीत नसताना काढून घेण्यात आले हे खरे आहे काय ? असल्यास त्या अधिकाऱ्यांविरुध्द शासन काही कारवाई करणार काय ?

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, परराज्यातील काही सुरक्षा रक्षक एजन्सी या ठिकाणी काम करतात काय यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला. याबाबतीत केंद्र शासनाचा पसारा ॲक्ट आलेला आहे. त्या अंतर्गत ते सर्वांना परवानगी देतात. आपल्या राज्यात विशेष कायदा आहे. त्या अंतर्गत कलम 23 खाली राज्य शासनाकडून परवानगी घेतली पाहिजे. अशी परवानगी त्यांनी घेतलेली आहे. ज्यांनी परवानगी घेतली नाही त्यांच्यावर कारवाई झाली. परस्पर काही लोक अशा केसेस नोंदवतात आणि मागे घेतात अशी प्रकरणे असतील तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. ही बाब खरी आहे की, सुरक्षा रक्षक मंडळामध्ये भरतीपासून नोंदणीपर्यंत भ्रष्टाचाराचे मोठे प्रकरण घडलेले आहे. त्या ठिकाणी नोंदणीसाठी काही मंडळी त्यांच्याकडून पैसे घेतात आणि नोंदणी मिळवून देतो असे आमिष दाखवतात. त्यांची स्वत:ची पतपेढी आहे. पैसे नसतील तर त्या पतपेढीमार्फत कर्ज घ्या असे सांगतात आणि नंतर पैसे कपात करुन घेतात. हे सर्व प्रकरण गंभीर आहे. क्राईम ब्रँच मार्फत गेल्या पाच वर्षाची चौकशी करुन कारवाई करण्याची शासनाची मानसिकता आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्याला मुंबईचे रस्ते माहीत नाहीत, गल्ल्या माहीत नाहीत त्यांना घेऊन येतात. आपले सरकार त्यांना शस्त्राचा परवाना देतात. ज्यांना बंदूक चालवणे माहीत नसते त्यांना घेतात. 10-15 हजार रुपयांच्या पगारावर ते त्या ठिकाणी थांबतात. याबाबतीत काही निर्बंध घातले पाहिजे. आपल्याकडे किमान 15 वर्षाचे वास्तव्य असले पाहिजे. खरे म्हणजे पोलीस खात्याचा हा विषय आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ श्री.बरवडनंतर 15:00

श्री.दिवाकर रावते....

जो माणूस दोन महिन्यापूर्वी आला आहे किंवा 3 महिन्यापूर्वी आला आहे. परंतु काही माणसे नोकरीसाठी बांगलादेशातून आले आहेत. यावर शासन निर्बंध घालणार की नाही. आर्म परवानगी देण्यात आलेली आहे त्याची तपासणी करुन बेकायदेशीररित्या दिलेली परवानगी रद्द केली जाईल काय ?

श्री.नवाब मलिक : राज्यात सुरक्षा रक्षक बंदूक घेऊन काम करतात किंवा बंदुकीशिवाय काम करतात. पोलिसांच्या तपासणीशिवाय राज्यात कोणत्याही सुरक्षा रक्षकाला काम करता येणार नाही अशी यंत्रणा तयार केली जाईल. बाहेरच्या राज्यातून आलेले लोक आहेत त्यांची तपासणी करुन शस्त्र वापरण्याचा बोगस परवाना आढळून आला तर त्याबाबत कायदेशीर कारवाई केली जाईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, काही लोकांच्या पतपेढया आहेत. या पतपेढयांनी 2 हजार कर्मचा-यांना 1 लाख रुपये कर्ज दिले आहे. परंतु त्यांच्याकडून 2 लाख रुपये कापून घेतले आहेत. याबाबतचा तपास क्राईम ब्रॅन्चकडून केला जाईल असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. हा तपास केव्हा पूर्ण होईल ?

श्री.नवाब मलिक : 5 वर्षामधील सर्व प्रकरणांचा तपास क्राईम ब्रॅचकडे सोपविला जाईल आणि अशाप्रकारचे गुन्हे झाले असतील त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल. या गुन्हयांमधील किती प्रकरणात खटले भरण्यात आली, त्यापैकी किती जणांना शिक्षा झाली, याबाबतची माहिती पटलावर ठेवली जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : राज्यातील भूमिपुत्रांना जास्तीत जास्त नोक-या मिळाव्यात यासाठी स्थानिकाच्या व्याख्येत बदल करुन चर्चेअंती 20 वर्षे, 25 वर्षे जे काही ठरेल त्यानुसार कालमर्यादा घालण्यात येणार आहे काय ? अनेक वेळा असे लक्षात येते की, या सुरक्षा रक्षकांचा पगार 15 हजार इतका असताना त्यांच्या हातात 5-6 हजार रुपये देऊन पगाराच्या स्लीपवर सहया घेतल्या जातात. अशाप्रकारचे त्यांचे शोषण चाललेले असते. गरज म्हणून ते कामावर राहतात. त्यांची दयनीय अवस्था असते. त्यामुळे सोसायटीत काम करणारे सुरक्षा रक्षक सोसायटीतील लोकांकडून 50 रुपये 100 रुपये मागून जीवन जगतात. या ठेकेदारांची दादागिरी आहे त्यासंबंधी शासन काय करणार आहे ?

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक : सुरक्षा यंत्रणेतील ठेकेदार सुरक्षा रक्षकांना कमी पैसे देतात. त्यांच्याकडून 12 तास काम करुन घेऊन 8 तासाचे पैसे देतात. यावर नियंत्रण करणारी यंत्रणा तयार करण्यात येईल. त्या लोकांनी किती माणसे कामावर ठेवली, किती कमिशन घेतले आहे याबाबत रिटन फॉर्मेट तयार करुन माहिती संकलित केली जाईल. मी मघाशीच सांगितले आहे की, सुरक्षा मंडळामध्ये 50 हजार सुरक्षा रक्षकांची भरती केली जाणार आहे. त्यावेळी डोमिसाईलचा कायदा लागू केला जाईल.

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने बहुत ही सकारात्मक उत्तर दिया है. मेरा यह प्रश्न है कि, सुरक्षा रक्षक मंडल में रजिस्ट्रेशन करने के संबंध में विविध सुरक्षा रक्षक संगठन एवम् सुरक्षा रक्षक द्वारा मुंबई उच्च न्यायालय में याचिका दायर की गई थी. इस संबंध में माननीय मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय ने 23.08.2007 को फैसला दिया है. पिछले अधिवेशन में माननीय मंत्री जी ने कहा था कि फैसले के अनुसार कार्यवाही की जाएगी. लेकिन अब तक कार्यवाही नहीं हुई है. तो यह कार्यवाही कब तक की जाएगी ? माननीय श्रम मंत्री जी ने जैसा सुबह एक विषय के संबंध में उत्तर देते हुए कहा है कि स्थानीय लोगों को प्राथमिकता दी जाएगी. मैं इस संबंध में यह कहना चाहता हूं कि रजिस्ट्रेशन करने से पहले वैरिफिकेशन किया जाना चाहिए. क्योंकि मुंबई में कहीं से भी लोग आ जाते हैं, इसलिए वैरिफिकेशन करना जरुरी है ताकि असामाजिक तत्व इसमें सम्मिलित न हो सके. तो इस संबंध में विभाग के पास क्या कोई मॉनेटरिंग मशीनरी है ? महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियम पारित होने के बाद राज्य शासन ने नाशिक, पुणे, औरंगाबाद व नागपुर जिले के लिए सुरक्षा रक्षक मंडल की स्थापना की है. क्या इन सुरक्षा रक्षक मंडलों के पास पर्याप्त मशीनरी, स्टाफ है ?

यानंतर मा.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक : सन्माननीय सदस्यांनी हायकोर्टाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी होते की नाही असा पहिला प्रश्न विचारलेला आहे. लक्षवेधीच्या निवेदनामध्ये होयकोर्टाने काय आदेश दिले आणि काय कारवाई करण्यात आलेली आहे हे स्पष्टपणे सांगितलेले आहे.50 हजार सुरक्षा रक्षाकांच्या भरतीसंबंधी दुसरा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्याबाबतीत कोर्टाने स्थगिती दिलेली आहे. ही स्थगिती उठण्यिासाठी कोर्टासमोर जाऊन पयत्न करण्यात येणार आहेत. आम्ही कोर्टाला हे सांगणार आहोत की, जेव्हा केंव्हा निकाल लागेल त्यावेळी ती भरती करण्यात येईल. त्यामुळे पुढची भरती करण्यासाठी आम्हाला परवानगी द्यावी असे आम्ही कोर्टाला सांगू. या सुरक्षा रक्षकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहे असाही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. आपण आता विस्तार करणार असल्यामुळे हे सर्व नियंत्रित करण्यासाठी गरज लागेल तेथे तेथे माणसांची भरती करण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : सुरक्षा रक्षक मंडळाची स्थापना 1981 साली झाली. या मंडळा मार्फत केवळ 13 हजार लोकांची नोंदणी केलेली आहे. 4 लाख लोक सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत आहेत. म्हणजे 4 लाख भूमिपुत्रांचा रोजगार हिरावून घेण्यात आलेला असून त्याबाबतीत शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. तेव्हा 4 लाख भूमिपुत्रांचा रोजगार हिरावून घेण्यात आल्याप्रकरणी जे कोणी संबंधित अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ? माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, ज्यांनी खाजगी क्षेत्रातून सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत त्याबाबतीत आपण 939 गुन्हे दाखल केलेले आहेत. परंतु ज्या सरकारी कार्यालयानी अशा प्रकारचे सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत त्यांच्या बाबतीत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत काय ?

श्री. नवाब मलिक : ज्यावेळी भरती करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येते त्यावेळी कोर्ट केसेस करुन त्यामध्ये अडथळे निर्माण केले जातात. त्यामध्ये काही लोकांचा व्हिशिअस इंटरेस्ट असतो. परंतु येणा-या काळामध्ये या भरतीमध्ये अडथळे निर्माण होऊ देणार नाही अशी मी ग्वाही देऊ इच्छितो. बोर्डाकडूनच सुरक्षा रक्षक घेण्याची बंधन आपण सर्वांवर घालीत आहोत. एमएमआरडीए, एमएसएसआरडीसी, एमएसईबी यांनी खाजगी क्षेत्रातून सुरक्षा रक्षक घेतलेले आहेत. त्यांनी बोर्डाकडून सुरक्षा रक्षक घ्यावेत असे आदेश काढण्यात आलेले आहेत. परंतु दर्जा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नवाब मलिक....)

चांगला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. दर्जा सुधारण्याच्या संदर्भात देखील बोर्डाला सांगण्यात येईल. सर्व खाजगी क्षेत्र सोडून शासकीय क्षेत्रामध्ये, को-ऑपरेटिव्ह क्षेत्रामध्ये सुरक्षा रक्षक पाहिजे असतील तर ते बोर्डाकडून उपलब्ध करुन दिले जातील.

श्री. नितीन गडकरी : या सुरक्षा रक्षकांचे काही वेळा त्यांच्या ठेकेदारांमार्फत आणि काही वेळा युनियन मार्फत शोषण होते. पैसे आमच्या मार्फत द्यावेत असे हे ठेकेदार सांगतात, शिवाय ते बोगस नोंदणी करतात. यासबंधात शासनाकडे तक्रारी आलेल्या आहेत. या तक्रारींची पोलिसांकडून चौकशी करावी जेणे करुन सुरक्षा रक्षकांचे शोषण होणार नाही. या बाबतीत अधिका-यांकडून चौकशी केली तर सुरक्षा रक्षकांचे ठेकेदारांमार्फत शोषण होईल. तेव्हा संगणकावरील माहितीचा आधार घेऊन या ठेकेदारांचे रेकॉर्ड चेक करुन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी काय उपायोजना करण्यात येणार आहे ?

श्री. नवाब मलिक : नोकरी देण्याचे आमिष दाखवून आमच्याकडून पैसे घेतलेले आहेत अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक...

त्याच्या बाबतीत पूर्वी उत्तर दिलेले आहे की, क्राईम ब्रँचच्या मार्फत चौकशी करणार आहोत. गेल्या पाच वर्षाची यासंदर्भातील जी काही प्रकरणे आहेत, ती प्रकरणे त्यांच्याकडे तपासणीसाठी सोपविणार आहोत. ज्यांनी अयोग्य कामे केली असतील, त्यांचे विरुध्द खटले दाखल केले जातील. त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल केले जातील. जे सुरक्षा रक्षक खाजगी क्षेत्रात आहे. जे आमच्या अटी आणि शर्ती पूर्ण करणार असतील तर त्यांना संरक्षण देण्यात येईल. आम्ही त्यांना मिनिमम पगार 5 हजार रुपये सांगतो, परंतु त्यांना बाहेरच्या खाजगी कंपन्या दहा हजार रुपये देणार असतील तर अशा सुरक्षा कंपन्याना परवानगी देण्यास मला अडचण वाटत नाही. सुरक्षा एजन्सीवर नियंत्रण करण्यासाठी एखादी सिस्टीम तयार करु. रिटर्न फाईल सादर करण्याचे बंधन घालून देऊ. त्या ठिकाणी ऑन लाईन सिस्टीम पध्दतीने काम होणार असेल तर ती सिस्टीम आपण सुरु करु.

श्री.जयप्रकाश छाजेड : सुरक्षा मंडळातील कर्मचा-यांचे 1300 अर्ज अपूर्ण कागदपत्रामुळे निकाली काढले. त्यासंबंधीचे वास्तव असे आहे की, मालकांचे प्रमाणपत्र नोकरीत कायम करण्यासाठी आपण मागता आहेत. मालकाने त्या सुरक्षा मंडळाच्या कर्मचा-यास काढून टाकले तर मालक प्रमाणपत्र देत नाहीत. कोर्टात जी प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत, ते प्रमाणपत्र शासन ग्राहय धरणार आहात की नाही ? तसेच निरीक्षकांना प्रमाणपत्रे देण्याचे अधिकार शासन देणार आहे काय ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 50 हजार लोकांची भरती करणार आहोत. भरती करणार आहात ही चांगली गोष्ट आहे. जे सुरक्षा रक्षक म्हणून नोकरी करीत आहेत, त्यांच्या कागदपत्रांची, निवासी पत्त्याची नोंदणी इत्यादी सर्व माहिती सरकारकडे नोंदणी करुन घेण्यात येईल काय ?

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, यासंबंधी कोर्टाने आदेश दिलेले आहेत. ज्या सुरक्षा रक्षकांनी कोर्टात कागदपत्रे दाखल केली होती, ती सर्व प्रकरणे कोर्टाने निकाली काढली आहेत. मालकांनी नोंदणीसंबंधीचे पुरावे दिले नाहीत असे काही लोकांचे म्हणणे आहे. त्या लोकांकडे जे काही पुरावे असतील ते तपासून घ्यावेत अशा सूचना आम्ही आमच्या अधिका-यांना देऊ. जर त्यांच्याकडे योग्य पुरावे असतील तर शासनाकडे नोंदणी करुन घेण्यासाठी जरुर फेरविचार करण्यात येईल. परंतु गैरमार्गाने यामध्ये कोणी भरती होण्यास इच्छूक असेल तर त्यास न्याय

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक...

दिला जाणार नाही. सुरक्षा रक्षकांकडून शाळेचे बोगस दाखले सादर केले गेले आहेत व इतरही बोगस कागदपत्रे सादर करण्यात आले आहेत. याबाबतीत क्राईम ब्रँच तपासणी करणार आहे. त्या अनुषंगाने पुढील कारवाई होणार आहे.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.शिगम 15:10

**पृ.शी.**: गडचिरोली जिल्हयात हिवताप व मेंदूज्वराच्या साथीचा प्रादुर्भाव वाढणे

**मु.शी.**: गडचिरोली जिल्हयात हिवताप व मेंदूज्वराच्या साथीचा प्रादुर्भाव वाढणे याबाबत सर्वश्री. केशवराव मानकर, नितीन गडकरी, जयप्रकाश छाजेड, एस.क्यु.जामा,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" गडचिरोली जिल्हयात एप्रिल,2008 पासून हिवतापाच्या साथीचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव वाढणे, हिवतापाचे सुमारे आठ हजार, मेदूज्वराचे साडेचार हजार रुग्ण आढळणे, मेंदूज्वराने आजतागायत 12 व्यक्तींचा मृत्यू होणे, आरोग्य विभागाने 92 अतिरिक्त आरोग्य कर्मचा-यांची तात्काळ नियुक्ती करणे, तथापि आरोग्य अधिका-यांची रिक्त पदे, अपुरी साधनसामुग्री, साथीच्या उपरोक्त आजारावरील औषधांचा तुटवडा भासणे, परिणामी हिवताप नियंत्रणासाठी अडथळे निर्माण होणे, सदर परिस्थितीवर मात करण्यासाठी तातडीने पदे भरण्याची, साधनसामुग्री व औषधांचा पुरवठा करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.राजेंद्र शिंगणे ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : विदर्भातील सात जिल्हयापैकी गडचिरोली जिल्हा हा अतिसंवेदनशील आहे. हिवताप आणि मेंदूज्वर या रोगाच्या साथीच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. गडचिरोली जिल्हयात एटापल्ली आणि धानोरा तालुके आहेत. त्यात मोठया प्रमाणात या रोगाची साथ मोठया प्रमाणात सुरु आहे. मी धानोरा येथे प्रत्यक्षात अनुभव घेतला आहे. त्या ठिकाणी एका सेकंदात एक डास चावतो आणि डास चावल्याच्या ठिकाणी एक फोड येतो. मी तेथील लोकांना विचारले की, तुम्ही या डासांच्या साम्राज्यामध्ये कशी जीवन जगता आहात ? तेथील लोकांनी सांगितले की, आम्ही आदिवासी समाजाचे आहोत. आम्ही हातभट्टी लावतो आणि त्या हातभट्टीची दारु पितो, त्यामुळे आमची प्रतिकार शक्ती जास्त आहे. अतिशय संवेदनशील जिल्हयातील हिवतापाचा प्रश्न आहे. या लक्षवेधी सूचनेला शासनाने चौकटीतील उत्तरे दिलेली आहेत. शासनाने या जिल्हयात 50 हजार मच्छरदाण्या वाटल्या आहेत. परंतु त्या मच्छरदाण्या रात्रीसाठी उपयोगात येतात. दिवसा देखील मोठया प्रमाणात डास चावतात हा खरा त्या ठिकाणचा प्रश्न आहे. लक्षवेधी सूचना उपस्थित करुन सरकारचे लक्ष वेधणार आहे. त्या जिल्हयात आरोग्य विभागात कंत्राटी पध्दतीवर 95 आणि 23 मानसेवी वैद्यकीय अधिकारी नेमले आहेत. हिवताप निर्मूलनासाठी 95 कर्मचारी आणि 23 मानसेवी वैद्यकीय अधिका-यांच्या कंत्राटी नेमणुका केल्या आहेत, त्यांना आरोग्य विभागाच्या सेवेत कायम करण्यात येईल काय ? डासांवर नियंत्रण आणण्यासाठी 15-15 दिवसांनी औषध फवारणी करण्यात येईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी गडचिरोली जिल्हयात एप्रिल 2008 पासून हिवतापाच्या साथीने काही रुग्ण मृत्यूमुखी पडले त्यासंबंधी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी काही भावना मांडल्या आहेत. गडचिरोली जिल्हा आदिवासी भागात आहे. त्याचप्रमाणे या जिल्हयात मोठया प्रमाणात जंगल आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या तालुक्यांचा उल्लेख केला. त्या तालुक्याला लागून मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्ये लागतात. तो सर्व परिसर पूर्णपणे जंगलाने व्यापलेला आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे......... लक्षवेधी सूचना क्र.7....

सभापती महोदय, निश्चितपणे महाराष्ट्रातील गडचिरोली या भागामध्ये गेल्या अनेक वर्षापासून वेगवेगळया प्रकारच्या उपाययोजना आपण करीत आहोत. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितले ती गोष्ट खरी आहे. डासांचा प्रादुर्भाव त्या भागामध्ये मोठया प्रमाणावर होत आहे. मग वेगवेगळया प्रकारचे ताप, साथीचे रोग, हिवताप याचा प्रसार त्या परिसरात सातत्याने होत असतो. अनेक प्रकारच्या योजना त्या भागात राबविल्या. आरोग्य कर्मचारी दर पंधरवड्याला 100 टक्के घरांना भेटी देऊन तापाचे सर्वेक्षण करतात. आढळलेल्या तापाच्या रुग्णांचे रक्तनमुने गोळा करुन उपचार केले जातात. वेगवेगळया माध्यमातून फवारणी करण्याचे काम केले जाते. यापुढच्या काळात सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन त्या ठिकाणी फवारणीचे काम वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. कर्मचाऱ्यांबाबत सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्या संदर्भात या भागातील रिक्त पदांचा मी स्वत: आढावा घेतला. खरोखर त्याठिकाणी जिल्हा हिवताप अधिकाऱ्याचे पद जून महिन्यापासून रिक्त आहे. ते पद ताबडतोब भरण्याच्या मी सूचना दिल्या आहेत. 95 एम.पी.डब्ल्यू.ची पदे आहेत. हे कर्मचारी ग्रामीण भागात जाऊन काम करीत असतात. रक्ताचे नमुने घेतात, तपासणीचे काम करतात. ही पदे रिक्त होती. कंत्राटी पध्दतीने ती मागील काळात भरली. परंतु सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे ही पदे टेंपररी स्वरुपात न राहता ताबडतोबीने भरली गेली पाहिजे, यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न करीत आहोत. महाराष्ट्रात एकूण 1714 पदे रिक्त आहेत. मध्यंतरीच्या काळात कुष्ठरोग तज्ज्ञांची पदे सरप्लस झाली, त्यांचे समायोजन या पदावर करावे असे आदेश दिले होते. म्हणून त्या पदांचे ताबडतोब समायोजन करुन उर्वरित रिक्त पदे सुध्दा त्वरित भरण्याची कारवाई शासन करणार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आदिवासींबाबत शासन किती संवेदनशील आहे हे पहायचे असेल तर हा प्रश्न लक्षात घेतला पाहिजे. 7082 हिवताप रुग्ण आढळले असल्याचे मंत्रीमहोदयांनी मान्य केले आहे. आम्ही 8000 रुग्ण असल्याचे म्हटले होते. मंत्रीमहोदयांच्या उत्तराला मी हरकत घेत नाही. परंतु 12 जणांचा मृत्यू झाला आहे. मंत्रीमहोदयांनी दिलेली आकडेवारी कमी आहे. या जिल्हयात जी पदे आहेत त्या पदावर रुजू होण्यास कोणी तयार होत नाही. रुजू झाले तर आमदार किंवा मंत्रीमहोदयांचे शिफारस पत्र घेऊन बदली करुन घेतात. गडचिरोली जिल्हयामध्ये कमीत कमी 3 वर्षे नोकरी केल्याशिवाय तुम्हाला शासकीय सेवेत पदोन्नती

..2..

श्री.नितीन गडकरी..........

मिळणार नाही असा नियम केला तर हे आदिवासी लोक जगतील. भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या भागात कोणी जायला तयार होत नाही. नक्षलवादी लोक हे आदिवासींचे डॉक्टर झाले आहेत. ही परिस्थिती अनेक वर्षापासून आहे. पदे रिक्त आहेत हे उत्तर आजचेच नाही. गेली 7-8 वर्षे तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ.मुंदडा यांनी सभागृहात हेच उत्तर दिले होते की, रिक्त पदे भरण्याबाबत मी आदेश दिले आहेत, मी निर्देश दिले आहेत. परंतु अद्यापही पदे भरली गेली नाहीत. आदिवासी क्षेत्रात कमीत कमी 2 वर्षे, 3 वर्षे सेवा केल्याशिवाय पुढील पदोन्नती मिळणार नाही अशी अट शासन लागू करील काय? एम.पी.एस.सी.किंवा इतर ठिकाणाहून पदे उपलब्ध होत नसतील तर जिल्हाधिकारी किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी वा उपसंचालक यांना कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर नियुक्त्या करण्याचे अधिकार ताबडतोब दिले जावेत. शासनाकडे यासंबंधी फाईल न पाठविता त्यांना नियुक्ती करण्याचे अधिकार दिले जावेत. आज आदिवासी लोक मरत आहेत. अधिकाराचे विकेंद्रीकरण करुन ताबडतोब अधिकार दिले जातील का? स्वयंसेवी संस्थांद्वारे जीपमध्ये मशिन ठेवून जी फवारणी केली जाते ती योजना राबविण्यासाठी बचत गट असतील, इतर संस्था असतील त्यांना सामावून घेऊन त्यांनी मशिनद्वारे फवारणी करुन डासांचा प्रादुर्भाव कमी कसा होईल याबाबत शासन प्रयत्न करणार आहे का? मी सांगितलेल्या तीन सूचनांची अंमलबजावणी केली जाईल का?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी महत्वाच्या तीन सूचना केल्या आहेत. त्यांनी सांगितले की, गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात आराग्याचेच नाही तर वेगवेगळ्या खात्याचे अधिकारी व कर्मचारी जाण्यासाठी उत्सूक नसतात किंवा गेले तरी ताबडतोब परत येऊ या भावनेने कामावर जातात व परत येण्यासाठी प्रयत्नशील असतात. लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून वेगवेगळ्या भागात ते आपली बदली करण्याचा प्रयत्न करतात. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, जानेवारी अखेरपर्यंत आरोग्य विभागाच्या माध्यमातून राज्यातील जेवढी रिक्त पदे असतील, मग त्यात मेडिकल ऑफिसर्सची वर्ग-1 व वर्ग-2 ची पदे असतील ती जवळपास 2250 पदे भरण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. त्यात एक हजार पदे एमपीएससी मार्फत भरणार आहोत तर काही पदे अस्थायी स्वरुपात असलेल्या डॉक्टर्सना प्रमोशन देऊन भरण्याचा प्रयत्न करीत आहोत. काही पदे आपण कंत्राटी पध्दतीनेही भरण्याचा प्रयत्न करीत आहोत. ही पोस्टिंग करीत असताना सुरुवातीलाच ती आदिवासी व डोंगराळ भागात म्हणजे जेथे कोणी जात नाही अशा ठिकाणी करणार आहोत. तसे केले तरच त्यांना पोस्टिंग देण्यात येईल. त्यात गडचिरोली, अमरावतीतील चिखलदरा, धारणी व मेळघाटसारखा भाग असेल अशा भागात या नवीन पोस्टिंग झालेल्या लोकांनी तीन वर्षे कंपल्सरी काम करायचे आहे या अटीवरच त्यांना ही नियुक्ती देण्यात येईल. तसेच एनआरएचएम मधून आपण जिल्हयातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे अधिकार सिव्हील सर्जन यांना दिलेले आहेत. यात काही कमतरता असेल अथवा कोणीही कंत्राटी पध्दतीने पुढे येण्यास तयार नसेल तर ताबडतोब जाहिरात देऊन ही पदे भरण्याचे अधिकार सुध्दा सी.एस. ना दिलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : महोदय, स्वयंसेवी संस्थांना अनुदान देऊन अशा आदिवासीबहूल भागात फवारणी करण्यास अशा संस्था तयार असतील तर त्याचाही विचार शासनाने करावा.

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेबाबतची तपासणी करुन घेतो आणि ती व्यवहार्य असेल तर निश्चितपणे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, अभी मंत्री जी ने कहा कि महाराष्ट्र में बड़ी संख्या में डॉक्टर के पद रिक्त है. मैं इस संबंध में दो प्रश्न पूछना चाहती हूं. क्या सरकार का ऐसा कोई नियम है कि रुरल हॉस्पिटल में मेडिकल ऑफिसर के पद के लिए सिर्फ स्पेशलिस्ट डॉक्टर ही लिए जाने चाहिए ? मैं इसलिए यह पूछ रही हूं, क्योंकि राज्य में एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध है और वे इस पद के लिए इच्छुक है फिर भी रिक्त पदों पर उनकी नियुक्ति के संबंध में विचार नहीं किया जाता है. दूसरा प्रश्न यह है कि, मैंने यह देखा है कि इस प्रकार के नार्म्स है कि हॉस्पिटल में दो डॉक्टर ईएनटी के और तीन डॉक्टर फिजीशियन के रखे जाए. जब कोई एमबीबीएस डॉक्टर कॉन्ट्रेक्ट बेसिस पर नियुक्ति पाने के लिए अर्ज करता है तो यह जवाब दिया जाता है कि ईएनटी डॉक्टर का पद भर गया है, फिजीशियन का पद रिक्त है. इसलिए आपका विचार नहीं हो सकता है. कभी यह भी जवाब दिया जाता है कि ईएनटी का पद रिक्त है लेकिन आपका विचार इस पद के लिए नहीं हो सकता है. चूंकि आवेदक एमबीबीएस डॉक्टर है और वह काम करने के लिए इच्छुक है और वह डॉक्टर के रुप में काम कर सकता है तो फिर उसकी नियुक्ति क्यों नहीं की जाती है ? इस प्रकार के नार्म्स के कारण रिक्त पदों को भरने का प्रश्न उपस्थित हो रहा है. इसलिए मेरा यह प्रश्न है कि क्या नार्म्स को शिथिल करके रिक्त पदों को भरने की कार्यवाही की जाएगी ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी ज्या सूचना केल्या त्यासंदर्भात शासनाचे असे कुठलेही धोरण अथवा नियम नाही. रुरल हॉस्पिटलमध्ये विशिष्ट स्पेशालिस्टच भरले गेले पाहिजेत असे कुठलेही बंधन नाही. खरे म्हटले तर ग्रामीण किंवा शहरी भागात आपण पाहतो की अनेक ठिकाणी जागा भरलेल्या असतात. समजा 10 पैकी 6 जागा भरलेल्या असतात परंतु तेथे प्रत्यक्षात ते डॉक्टर्स हजरच नसतात, काही ॲबस्कॉन्डिंग असतात, असेही अनेक प्रकार निदर्शनास आले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करुन सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना केल्या त्याप्रमाणे जर डॉक्टर्स जात नसतील तर त्यांच्या जागी नवीन भरती करण्यासाठी मंजुरी दिली जाईल.

( **<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>** )

यानंतर श्री. जुन्नरे ....

अध्यक्षीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

सभापती महोदय, जानेवारी, 2009 अखेर संपूर्ण महाराष्ट्रात ज्या ठिकाणी डॉक्टरांची पदे रिक्त आहेत त्या सर्व ठिकाणी डॉक्टरांची पदे भरली जातील असे शासनाचे धोरण आहे.

डॉ. दीपक सावंत : या ठिकाणी माननीय आरोग्य मंत्र्यांनी सांगितले आहे की, येत्या जानेवारी अखेर पर्यंत महाराष्ट्रातील डॉक्टरांची सर्व रिक्त पदे भरली जातील. गडचिरोलीच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर या ठिकाणी डॉक्टर जाण्यास तयार नसतात. तसेच ब-याच ठिकाणी डॉक्टरांची राहण्याची सुध्दा चांगली व्यवस्था नसते. जनावरे ज्या प्रमाणात राहतात त्या प्रमाणे डॉक्टरांना रहावे लागते त्यामुळे डॉक्टरांना राहण्यासाठी चांगली सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विचार होण्याची आवश्यकता आहे. तसेच डॉक्टरांची ट्रान्सफर हा फार मोठा मुद्दा आहे. गडचिरोली, मेळघाट व नंदुरबार अशा ठिकाणी जेव्हा डॉक्टरांना पाठविले जाते तेव्हा डॉक्टरांना जॉईनिंग लेटर बरोबर रिलीव्ह लेटर दिले तर आपल्याला या ठिकाणी किती महिने राहावे लागेल यासाठी त्याची मानसिकता तयार होईल व तो हसत हसत 2-4-6 महिने अशा ठिकाणी काम करेल व आपला कार्यकाल पूर्ण करेल. अशा ठिकाणी काम करतांना त्या ठिकाणचे डॉक्टर्स बदलीसाठी कधीही प्रयत्न करणार नाहीत. त्यामुळे डॉक्टरांना जॉईनींग लेटर देतांना रिलीव्ह लेटर सुध्दा दिले जाईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. अमरावती जिल्हयातील जिल्हाधिका-यांनी मागच्या वर्षी अशाच प्रकारचा एक प्रयोग मेळघाट येथे केला होता. मेळघाटमध्ये डॉक्टर जाण्यास तयार नव्हते परंतु त्या ठिकाणी डॉक्टरांना जॉईनिंग लेटर देतांना 2-4-6 महिन्यांचे रिलीव्ह लेटर सुध्दा दिले होते. रिलीव्ह लेटर दिल्यामुळे डॉक्टरांची त्या ठिकाणी राहण्याची मानसिकता तयार होते व हे डॉक्टर प्रामाणिकपणे काम देखील करतात. त्या ठिकाणी पुढील सहा महिन्यानंतर दुस-या डॉक्टरांची नेमणूक केली जाते. रोटेशन पध्दतीने अमरावतीच्या जिल्हाधिका-यानी हा प्रयोग करुन पाहिलेला आहे.

सभापती महोदय, जानेवारी अखेर ज्या ठिकाणी डॉक्टरांची रिक्त पदे आहेत ती सर्व रिक्त पदे भरली जातील. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्या सूचनेप्रमाणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ......

पोस्टींग देण्याचा प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्यांनी डॉक्टरांच्या राहण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. ज्या ठिकाणी डॉक्टरांना राहण्याची व्यवस्था चांगली नसेल, क्वार्टर्स नसतील तर अशा सर्व गोष्टी लक्षात घेऊन डॉक्टरांना जास्तीत जास्त चांगल्या सुविधा देण्याच्या संदर्भात निश्चितपणे उपाययोजना करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय आरोग्य मंत्र्यांनी चांगल्या प्रकारचे उत्तर दिलेले आहे. दुर्गम भागाच्या संदर्भात, गडचिरोली, मेळघाट अशा ठिकाणी डॉक्टर्स जाण्यास उत्सुक नसतात. परंतु यासंदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, साथीचे रोग, हिवताप, मलेरिया अशा रोगांवर इलाज करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची गरज नसते. त्या ठिकाणी पॅरामेडीकल स्टाफ नेमला, अमुक एका वस्तीच्या मागे एक पॅरामेडीकल स्टाफ किंवा हजार वस्तीच्या मागे एक पॅरामेडीकल स्टाफची नेमणूक केली किंवा मेडिकल सोशल वर्करची नेमणूक केली, त्याला कीट उपलब्ध करुन दिले त्याची मोबॅलिटी वाढविण्याचा प्रयत्न केला तर त्याचा फार चांगला उपयोग होऊ शकेल. अशा प्रकारे आपल्याला आरोग्याची यंत्रणा उभी करता येईल. जेथे डॉक्टर जाण्यास तयार नाही त्या ठिकाणी या योजनेचा खूप चांगला उपयोग होऊ शकेल. तसेच त्यांना मोबाईल व्हॅन, पॅथ लॅब आणि संबंधित स्टाफ दिला, रुग्ण वाहिका दिली तर तर हा सर्व स्टाफ फिरता राहील व त्याचा जास्तीत जास्त रुग्णांना फायदा होईल.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकेल........

केवळ डॉक्टरांवर अवलंबून न राहता आरोग्याच्या प्रश्नाबाबत अन्य मार्गाने देखील रोगांचा प्रादूर्भाव होणार नाही या दृष्टीने शासन विचार करणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी अतिशय चांगल्या स्वरुपाच्या सूचना केलेल्या आहेत. ज्या भागात डॉक्टर जाण्यास नाखूष असतात त्याठिकाणी काही जणांना प्रशिक्षण देऊन आरोग्याच्या दृष्टीने सुधारणा करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आपण मोबाईल व्हॅनचा प्रयोग काही ठिकाणी करीत आहोत. मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून पॅरामेडीकल व इतर वैद्यकीय उपकरणांचा समावेश करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या तपासून कशाप्रकारे राबविता येईल याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्य पातळीवरील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. खोल्यांच्या भिंती खराब झालेल्या आहेत. अशा खोल्यांमध्ये रुग्ण कसे राहतील हा महत्वाचा प्रश्न आहे. केंद्र सरकारची एनआरएचएमची स्कीम आहे. या स्कीमच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती दुरुस्त करण्याचा धडक कार्यक्रम शासन राबविणार काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, शासन काही ठिकाणी कॉन्ट्रक्ट पध्दतीने डॉक्टरांची नियुक्ती करते. बाजूच्या कर्नाटक राज्यामध्ये डॉक्टरांना चांगल्याप्रकारे वेतन मिळते त्यामुळे या ठिकाणी कोणीही डॉक्टर्स येत नाहीत. ज्या गावात डॉक्टरांची नियुक्ती केली जाते तो त्याठिकाणी जात नाही. तेव्हा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कायम स्वरुपी डॉक्टरांची नियुक्ती करण्यासाठी एम.पी.एस.सी.मार्फत पदे न भरता ती आपल्या मंडळामार्फत भरण्याचा धडक कार्यक्रम शासन राबविणार काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आरोग्याच्या दृष्टीने केंद्र सरकारची एनआरएचएम ही चांगली स्कीम आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना मी सांगितले होते की, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रांच्या इमारतीं अतिशय जुन्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे..........

झालेल्या आहेत, त्यांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. या सर्व इमारतींच्या दुरुस्तीचा कार्यक्रम एनआरएचएममध्ये घेणार आहोत. डॉक्टरांच्या क्वार्टर्सची अतिशय वाईट अवस्था आहे त्याची देखील चांगल्याप्रकारे दुरुस्ती करणार आहोत. एनएचआरएमचा कार्यक्रम 2012 पर्यंत आहे. त्याचा कालावधी काढण्याची शक्यता आहे. या एनएचआरएमच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांची सुधारणा करण्याचा प्रयत्न राहील. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, सर्वच ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर डॉक्टरांची नियुक्ती केली जात नाही. ज्याठिकाणी डॉक्टांची आवश्यकता आहे आणि त्याठिकाणी डॉक्टर नसल्यास तेथे कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने नियुक्ती केली जाते. एम.पी.एस.सी.च्या माध्यमातून एक हजार पदे मिळणार आहेत. जानेवारी 2009 अखरे पर्यंत डॉक्टरांची दोन हजार पदे भरण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना गडचिरोली भागाची असली तरी राज्याच्या सर्वच जिल्ह्यांत हिवतापाचा प्रादूर्भाव आहे. मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिका या ठिकाणी सुध्दा हिवतापाची लागण झालेली आहे. मुंबईत मोठमोठे डॉक्टर्स आहेत. परंतु हिवतापाचा प्रादूर्भाव होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना करणार आहात, तसेच महानगरपालिकांना कोणती ताकीद देणार आहात ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई..

या बाबतीत चर्चा करुन वा पत्र पाठवून काहीही उपयोग झालेला नाही . या अनुषंगाने मी हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत माननीय मत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

डॉ.राजेंद्र शिगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर हिवतापाचे रुग्ण आढळून येत असतात. गडचिरोलीच्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी या ठिकाणी ज्या काही उपाययोजना सांगितल्या होत्या त्या केवळ आदिवासी भागापुरत्या किंवा डोंगराळ भागापुरत्याच आहेत अशातला भाग नाही तर नगरपालिका वा महानगरपालिका क्षेत्रातसुध्दा त्या उपाययोजना अंमलात आणल्या गेल्या पाहिजेत या दृष्टीने पुढच्या काळात सर्व महानगरपालिकेचे आयुक्त व महापौर यांना त्या पध्दतीच्या सूचना `देण्यात येतील आणि या सूचनांची काटेकोरपणाने अमलबजावणी होते किंवा नाही यासबंधी शासन लक्ष देईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.** : मांढरादेवी सारखी दुर्घटना पुन्हा घडू नये म्हणून राज्यातील सर्वच डोंगरी देवस्थानाच्या बाबतीत घ्यावयाची दक्षता

**मु.शी** : मांढरादेवी सारखी दुर्घटना पुन्हा घडू नये म्हणून राज्यातील सर्वच डोंगरी देवस्थानाच्या बाबतीत घ्यावयाच्या दक्षते बाबत डॉ. नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" सभापती महोदय, 25 जानेवारी 2005 रोजी सातारा जिल्हयतील मांढरादेवी येथे दुर्धटना घडून 293 भाविकांचा मृत्यू झाला होता आणि 75 जण जखमी झाले होते . त्यावेळी या दुर्घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी याकरिता विधान परिषदेत आणि विधानसभेत मागणी करण्यात आली होती त्यानुसार माजी न्यायमूर्ती श्री.राजन कोचर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार केली होती. या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला असून त्यात त्यांनी अनेक शिफारशी केल्या होत्या. त्यातील काही शिफारशीची अंमलबजावणी मांढरदेवी येथे करण्यात आली आहे. परतीच्या मार्गावरील पाय-या, लोखंडी रेलीग, सार्वजनिक स्वच्छता गृहे, पिण्याच्या पाण्याच्या योजना यासंबंधीची कामे झालेली आहेत. सभापती महोदय या ठिकाणी आपणसुध्दा भेट दिली होती.

सभापती महोदय, दिनांक 25 जानेवारी 2005 रोजी ही दुर्घटना घडली होती आता 11 जानेवारी रोजी पौष पौर्णिमा आहे. त्या दिवशी तेथे यात्रा भरणार आहे. त्या ठिकाणी सध्या भटक्या कुत्र्यांचा वावर मोठया प्रमाणावर होत आहे. तेथील स्वच्छता गृहे बंद आहेत, निर्माल्य टाकण्याची व्यवस्था नाही. मांढरदेवी येथे घडलेल्या दुर्घटने ंनतर हिमाचल प्रदेशमध्ये नैनादेवी आणि राजस्थन मधील चामुंडादेवी येथेसुध्दा अशाच प्रकारच्या दुर्दैवी घटना घडल्या होत्या. या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छिते. पर्यटन विकास महामंडळाने मांढरादेवी परिसराच्या विकासासाठी अकरा कोटी रुपयाचा निधी दिला होता. माननीय मंत्री



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री विजयसिंह मोहिते पटील यांच्या हस्ते या कामाचे फेब्रुवारी महिन्यात भूमिपूजनसुध्दा झाले होते. परंतु अजूनही तो कृती आराखडा कागदावरच आहे. त्या कामांना सुरुवात झालेली नाही. त्याचबरोबर विजेची कमतरता असल्यामुळे मोठया प्रमाणावर वीज चोरुन घेतली जाते त्यामुळे शॉर्ट सर्किटचे प्रकार घडतात. नगर जिल्हयात पाथर्डी तालुक्यात मोहटादेवी येथे सौर उर्जावर युनिट उभे करण्यात आले असल्यामुळे तेथे एक मिनिटसुध्दा वीज जात नाही. श्री. राजन कोचर यांच्या समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात यावी तसेच मांढरदेवीसाठी 11 कोटी रुपयांचा जो विकास आराखडा तयार करण्यात आला त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. राजन कोचर समितीने अनेक देवस्थानाना भेटी देऊन ज्या काही शिफरशी केल्या होत्या त्याची अंमलबजावणी करावी. त्याचप्रमाणे मांढरादेवी, सप्तश्रृंगी , एकवीरा , कार्ला, लेण्याद्री, रेणुका देवी चांदवड ,आणि रेणुकादेवी माहूर अशी जी डोंगरावर वसलेली देवस्थाने आहेत त्या ठिकाणी सातत्याने सौर ऊर्जेवरील वीज देण्याची सोय होईल अशी युनिट श्ांसनाने उभी करुन द्यावीत. याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : औरंगाबाद विभागीय कार्यालयाचे नामांतर मराठवाडा विभागीय

कार्यालय करणे

मु.शी : औरंगाबाद विभागीय कार्यालयाचे नामांतर मराठवाडा विभागीय कार्यालय करण्याबाबत श्री.दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" संपूर्ण मराठवाडा विभागाकरिता एकच आयुक्त कार्यालय असून ते औरंगाबाद विभागीय कार्यालय म्हणून ओळखले जाते. खरे तर मराठवाडा या शब्दाला स्वत:चा इतिहास आहे. त्या भागातील जनतेला आपण मराठवाडयातील म्हणून स्वाभिमान आणि अस्मिता आहे. विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळी मराठवाडा विद्यापीठ नामांातरास झालेला तीव्र विरोध व त्यातून निर्माण झालेले जनआंदोलन , त्यात गेलेले अनेकांचे बळी, हजारोंना भोगावा लागलेला तुरुंगवास या सर्व गोष्टींची साक्ष पटविण्यास पुरेसे आहे. डॉ बाबासाहेब आबेडकर विद्यापीठ या नामांतराचा शेवटी तोडगा काढण्याकरिता माननीय शिवसेना प्रमुखांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा तोडगा सुचविला आणि त्या नावात मराठवाडा हा शब्द आल्यानंतर हे नामांतर झाले अशा या मराठवाडा या नावाला विभागीय कार्यालयाच्या बाबतीत सन्मानित करण्यात आलेले नाही. सध्याचे महसूल विभागीय कार्यालय हे औरंगाबाद विभागीय कार्यालय म्हणून ओळखले जाते ते भविष्यात मराठवाडा विभागीय कार्यालय म्हणून ओळखले जावे म्हणून शासनाने तातडीने योग्य ती पावले उचलावी व त्वरित निर्णय घ्यावे या करिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे."

---

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय,नागपूर येथे वैद्यकीय अधिकारी पदाचा मोठ्या प्रमाणात अनुशेष असणे.

**मु. शी.** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय,नागपूर येथे वैद्यकीय अधिकारी पदाचा मोठ्या प्रमाणात अनुशेष असणे याबाबत श्री.प्रकाश शेंडगे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे 'वैद्यकीय अधिकारी' या पदांचा मोठ्या प्रमाणात अनेक वर्षांपासून अनुशेष आहे व अनेक जागा रिक्त आहेत. दिनांक 6.11.2008 रोजी विभागीय निवड मंडळातर्फे अधिव्याख्याता व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निरनिराळ्या जागा भरण्याबाबत दिलली जाहिरात व दिनांक 17.11.2008 रोजी निवड मंडळाने अधिव्याख्याता व वैद्यकीय अधिकारी या पदासाठी घेतलल्या मुलाखती, वैद्यकीय अधिकारी व इतर पदांसाठी लायक उमेदवार निवडीसाठी उपलब्ध असूनही त्यांची निवड न करणे, तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या उमेदवारांचा अनुशेष प्रलंबित ठेवणे, तसेच मुंबई येथून बॉम्बे इस्पितळ वा जसलोक इस्पितळातून पदव्युत्तर झालेल्या डॉक्टरांची गुणवत्ता असूनही निवडीसाठी त्यांचा विचार न होणे, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील अ, ब, क व ड ही पदे परिवर्तनशील असूनसुद्धा वरील एखाद्या संवर्गातील पदाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासकीय आदेशाप्रमाणे पुढील संवर्गातील लायक पदाच्या उमेदवाराची निवड न करणे, या पदांचया मुलाखतींच्या वेळी शासकीय नियम असूनही मुलाखती घेताना जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याला मुलाखतीच्या वेळी न बोलाविणे, तसेच भारतीय वैद्यकीय परिषद (मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया) ने ही पदे ताबडतोब भरण्याबाबत शासनाला वेळोवेळी दिलेले आदेश, जर ही पदे भरली गेली नाहीत तर पदव्युत्तर शिक्षण घणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी करण्याबाबतचे दिलेले आदेश, त्यामुळे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पसरलले तीव्र असंतोषाचे वातावरण, तसेच शासकीय वैद्यकीय

..... 3ज 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

महाविद्यालयातील काम करीत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ही पदे न भरल्यामुळे बऱ्याचदा केलेले ठिय्या आंदोलन, तसेच निरनिराळ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे रूग्णांचे होत असलेले हाल व त्यामुळे नागपूर येथील जनतेत पसरलेली शासनाबाबतची तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारा ही बाब येथे उपस्थित करीत आहे. "

***

..... 3जे 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : श्री.आप्पासाहेब भीमराज ढूस, रा.देवळाली प्रवरा, ता.राहूरी यांना शासनाकडून आर्थिक मदत मिळणे

**मु. शी.** : श्री.आप्पासाहेब भीमराज ढूस, रा.देवळाली प्रवरा, ता.राहूरी यांना शासनाकडून आर्थिक मदत मिळणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" रामायणातील श्री हनुमान यांचे नंतर श्रीलंका ते भारत हे अंतर हवेतून तरंगत पार करून प्रथम मानव होण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या अहमदनगर जिल्ह्याच्या राहुरी तालुक्यातील देवळाली-प्रवरा गावच्या गरीब शतकरी कुटुंबातील आप्पासाहेब ढुस या खेळाडूने नगरपालिकेत साधी नोकरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत त्यांच्या मिशन हनुमान रिटर्न मोहिमेच्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण व साहित्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून राज्य शासनाकडे मदतीची याचना केली आहे. या साठी त्यांनी मंत्रालयात अनेक मान्यवरांना भेटण्यासाठी मंत्रालयाची दारे झिजवली आहेत.

परंतु सध्या राजकीय आखाड्यात बऱ्याच मान्यवरांना उड्या मारावयास लागल्याने या खेळाडूकडे कोणालाच लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. सध्या श्री.ढुस यांच्याकडे फक्त शिर्डी व संगमनेर नगरपालिकांनी दिलेली मदत असून उर्वरित प्रशिक्षणाचा व सरावाचा खर्च भागविण्यासाठी पतसंस्थेचे कर्ज काढण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही.

तरी श्री.ढुस यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कर्तबगारीची दखल घेऊन त्यांना शासनाने आर्थिक मदत देण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे. "

***



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर-नागपूर महामार्गावर दुतर्फा उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे वारंवार होत असलेले भीषण अपघात.

**मु. शी.** : चंद्रपूर-नागपूर महामार्गावर दुतर्फा उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे वारंवार होत असलेले भीषण अपघात या बाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" चंद्रपूर-नागपूर महामार्गावर दिनांक 22 डिसेंबर 2008 राजी झालेल्या अपधातात डॉ.गौतम दर्डा यांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडली आहे. या महामार्गावर नेहमीच अपघात होत असतात. नोव्हेंबर महिन्यात असेच पाच अपघात झाले आहेत व अनेक जण या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडले आहेत. या महामार्गावर नेहमी नादुरूस्त गाड्या रस्त्यांच्या कडेला उभ्या असतात तसेच ट्रॅालर्स, मोठे ट्रक्स इत्यादी जड वाहने देखील उभी असतात. या वाहनांची बॅक इंडिकेटर लाईट चालू नसतात. त्यामुळे रात्री येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना ही दुतर्फा उभी असलेली वाहने दिसत नसल्यामुळे अनेक वेळा अपघात होत असतात व त्यात अनेक व्यक्तींचा मृत्यू होतो. या महामार्गाच्या दुतर्फा उभी राहणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात यावी. हा सार्वजनिक अतिशय महत्त्वाचा विषय असल्याने मी विशेष उल्लेखाची सूचना सभागृहात मांडत आहे, ती स्वीकृत करण्यात यावी. "

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई महापालिकेकडून पशुगणनेसाठी नियुक्त केलेल्या गरीब बेरोजगार तरूणांना अगोदर कबूल केलेला मोबदला दिलेला नसणे.

**मु. शी.** : मुंबई महापालिकेकडून पशुगणनेसाठी नियुक्त केलेल्या गरीब बेरोजगार तरूणांना अगोदर कबूल केलेला मोबदला दिलेला नसणे याबाबत श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.विनोद तावडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो. ...

" राज्य सरकारच्या निधीवर विसंबून काम करताना मुंबई महानगरपालिकेला आता दहा वेळा चिार करावा लागेल किंवा पदरमोड करण्याची तयारी ठेवावी लागेल. वर्षभरापूर्वी पशुगणने साठी नेमलेल्या बेरोजगारांना मोबदला म्हणून फक्त साडेतीन रूपये व पर्यवेक्षकांना दीड पैसा असा दर सरकारने निश्चित केला आहे. त्यामुळे या बेरोजगारांना कामाचा अद्याप छदामही मिळालेला नाही.

केंद्र सरकारने 13 जुलै 2007 रोजी अधिसूचना काढून प्रत्येक राज्य, महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषदांना पशुगणना करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मुंबई महापालिकेने सप्टेंबर ते डिसेंबर 2007 या काळात हे काम पूर्ण केले. प्रत्येक 24 वॉर्डात 1200 स्वयंसेवकांची नियुक्ती त्यासाठी करण्यात आली होती. त्यासाठी बेरोजगारांना संधी देण्यात आली. भटक्या तसेच पाळीव पशु-पक्ष्यांची गणना करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. या गणनेसाठी पुण्याच्या पशुसंवर्धन आयुक्तालयाने स्वयंसेवकांना 10 रूपये तर पर्यवेक्षकांना 2 रूपये मोबदला निश्चित केला होता. पाच महिन्यांनंतर राज्याच्या अवर सचिवांनी स्वयंसेवकांना साडेतीन तर पर्यवेक्षकांना दीड पैसा याप्रमाणे पालिकेला पूर्ण रकमेचे चेक देण्यात येतील असे सांगितले. परंतु पालिकेने या कामासाठी अनुक्रमे 10 व 2 रूपये देण्याचे जाहीर केले होते. त्यासाठी सुमारे 2 कोटी 73 लाख रूपये खर्च येणार होता. पण सरकार त्यांच्या दरानुसार फक्त 95 लाखांपर्यंतचाच खर्च देणार असून उरलेली रक्कम पालिकेला सोसावी लागणार आहे.

..... 3जे 6



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे .....

सभापती महोदय, पशुगणनेसाठी काम केलेल्या बेरोजगार गरीब तरूणांना सदर कामाचा मोबदला अद्याप न मिळाल्याने त्यांच्यामध्ये शासनाबद्दल तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली असून ती या विशेष उल्लेखाद्वारा मी या सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो, यासाठी मी हा विशेष उल्लेख येथे करीत आहे.

***

( यानंतर श्री. सरफरे ....3के 1 ...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : निटवेवाडी ता.माळशिरस, जि.सोलापूर या गावात मेंदूज्वराने तीन लोकांचा झालेला मृत्यू

**मु. शी.** : निटवेवाडी ता.माळशिरस, जि.सोलापूर या गावात मेंदूज्वराने तीन लोकांचा झालेला मृत्यू याबाबत श्री.भगवानराव साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सोलापूर जिल्हयामध्ये माळशिरस तालुक्यातील निटवेवाडी या गावात मेंदूज्वर या रोगाची लागण झाल्याने तीन लोकांचा मृत्यू झाला व पाच जणांवर उपचार सुरु असणे, या गावात व आजूबाजूच्या गावात मेंदूज्वराच्या रोगाने थैमान घालणे, व याबाबत आरोग्य खात्यांनी प्रतिबंधक उपाय योजना करण्यासाठी होत असलेली दिरंगाई या रोगाचा फैलाव होण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. या गावापासून 14 किलोमीटर अंतरावर असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र व त्याठिकाणी ये-जा करण्यासाठी वाहनांची व्यवस्था नसल्याने रोग्याची होत असलेली कुचंबणा पाहता या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस कर्मचारी विविध भत्त्यांपासून वंचित असणे

**मु. शी.** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस कर्मचारी विविध भत्त्यांपासून वंचित असणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"आपणास माहीत आहे की, 1993 मध्ये मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले. त्यामध्ये शेकडो माणसे मृत्युमुखी पडली व हजारो माणसे जखमी झाली. पोलिसांनी त्या बॉम्बस्फोटाचा चांगल्या प्रकारे तपास करुन आरोपींवर गुन्हे दाखल करण्याचे काम केले. म्हणून त्यांना 12 वर्षानंतर बक्षिस देण्यात आले आहे. अशाप्रकारे राज्यातील पोलिसांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्याप्रमाणे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सुमारे 2700 पोलीस कर्मचाऱ्यांना गेल्या एक वर्षापासून त्यांना मिळणारा आहार, प्रवास आणि हक्क रजा भत्ता देण्यात येत नाही. जुलै 2006 पासून धुलाई भत्ता मिळणेही बंद झाले आहे. या भत्त्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता तुमच्या प्रस्तावास प्रशासनाकडून परवानगी मिळाली नाही. अशी उडवा उडवीची उत्तरे देण्यात येतात. त्याचा परिणाम नवी मुंबईतील पोलिसांच्या कार्यक्षमतेवर होऊ शकतो. यामुळे पोलीस प्रशासनाबद्दल पोलीस कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि संबंधितांना सांगून काहीही उपाय योजना होत नाही. या गंभीर बाबीची नोंद घेऊन पोलिसांना देय असलेली रक्कम एक महिन्याच्या आत त्वरीत अदा करण्याकरिता योग्य ती कारवाई करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडतो. धन्यवाद."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

### विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधी

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी दिलेली विशेष उल्लेख सूचना कां नाकारण्यात आली ? याचे कारण मला समजले नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विशेष उल्लेखाची सूचना कोणत्या कारणासाठी नाकारली जाते याचे कारण सभागृहाला समजले पाहिजे.

**उपसभापती** : माननीय सदस्यांची विशेष उल्लेखाची सूचना कां नाकारली जाते याचे कारण देण्याची गरज नाही. यापूर्वी दररोज 6 विशेष उल्लेखाच्या सूचना घेतल्या जात असत. आता आपण 8 विशेष उल्लेखाच्या सूचना घेतो. मी स्वत: कधी कधी आहे त्यापेक्षा अधिक विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्यास माननीय सदस्यांना अनुमती देतो. परंतु आता विशेष उल्लेखाच्या सूचना मांडावयास दिल्या जात नाहीत म्हणून माझ्यावर आरोप व्हावयास लागले आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, याठिकाणी चुकीची प्रथा पाडली जाऊ नये. नियमाप्रमाणे प्रत्येक दिवशी 6 विशेष उल्लेखाच्या सूचना मांडल्या जाव्यात. परंतु आता नवीन प्रथा सुरु होऊन त्यापेक्षा जास्त सूचना मांडल्या जातात त्याला माझा विरोध आहे. मी स्वत: माननीय सभापतींना भेटून माझी विशेष उल्लेखाची सूचना मांडण्याकरिता त्यांची अनुमती घेतो.

**उपसभापती** : माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे.

(यानंतर श्री. बरवड)

श्री. भगवानराव साळुंखे () :

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

यानंतर नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता मध्यंतरासाठी सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांसाठी स्थगित करावे आणि त्यानंतर प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.50 ते 4.00 वाजेपर्यंत मध्यंतर )

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव )**

**पृ.शी.**: विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येत होत असलेली वाढ

**मु.शी.**: विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येत होत असलेली वाढ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री विनोद तावडे, अरविंद सावंत, सय्यद पाशा पटेल, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किसनचंद तनवाणी, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी राज्य शासनाने विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी डिसेंबर, 2005 मध्ये दिलेले 1,075 कोटी रुपयांचे पॅकेज, त्यानंतर जून, 2006 मध्ये देण्यात आलेले 3,750 कोटी रुपयांचे पंतप्रधान पॅकेज त्यानंतर केंद्र शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी योजना, या सर्व उपाययोजनांनंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्या सतत वाढत जाणे, याबाबत कॅगने आपल्या अहवालात कडक ताशेरे ओढणे, गेल्या 5 वर्षात 5,500 शेतकऱ्यांनी तर गेल्या वर्षभरात 675 शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, संपूर्ण विदर्भात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असतांना एकीकडे 15 ते 16 तासांचे भारनियमन सुरु असणे तर दुसरीकडे कृषी पंपाचा अनुशेष वाढत जाणे, अपूर्ण राहिलेल्या शेकडो सिंचन प्रकल्पांमुळे शेतीला पाणी न मिळणे, गतवर्षी झालेल्या कमी पावसामुळे विदर्भातील धान उत्पादन निम्म्यावर येणे, धान उत्पादनाप्रमाणेच कापूस व सोयाबीन पिकावर लष्करी अळी व लाल्या रोगाचा प्रादुर्भाव होणे, तसेच खते व कीटकनाशके व बियाणे यांच्या वाढत्या किमतीमुळे व त्यातील भेसळीमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वसूल न होणे, शेतकऱ्याच्या कापूस व सोयाबीन या पिकाचा उत्पादन खर्च ज्या प्रमाणात वाढला त्या प्रमाणात त्याला भाव न मिळणे, कापसाची संकलन केंद्रे सुरु न होणे, सोयाबीन मातीमोल भावात विकावे लागणे, उत्पादित केलेला माल संकलन केंद्रे व कृषी उत्पन बाजार समित्यांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

आल्यानंतर त्याची खरेदी वेळेवर न होणे व त्याचे पैसे वेळेवर न मिळणे, पांढरकवडा, वणी सारख्या कापूस संकलन केंद्रांवर कापसाची तोलाई होण्यासाठी शेतकऱ्यांना 8-8 दिवस कडाक्याच्या थंडीत जनावरांसहीत उपाशीपोटी रहावे लागणे, या सर्व दूर्धर परिस्थितीमुळे आम शेतकरी वर्गात निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाचे त्याकडे झालेले दुर्लक्ष व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी विचारु इच्छितो की, या प्रस्तावावर किती तास चर्चा करावी अशी आपली अपेक्षा आहे ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भातील शेतक-यांच्या दृष्टीने हा महत्वाचा विषय आहे. त्यामुळे या प्रस्तावावर वेळेचे बंधन घालू नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : माझा बोलण्याचा उद्देश एवढाच होता की, पहिले वक्ते बराच वेळ भाषण करतात, त्यामुळे नंतरच्या सन्माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी मिळत नाही. मी आपल्याला यासंदर्भात सल्ला विचारत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. या प्रस्तावामध्ये केंद्र व राज्य सरकारने शेतक-यांसाठी दिलेले पॅकेज, कर्जमाफी, दुष्काळ, भारनियमन अशा 3-4 विषयांचा अंतर्भाव आहे. परंतु या चर्चेला उत्तर देण्यासाठी केवळ एकच माननीय मंत्री महोदय श्री.बाळासाहेब उपस्थित आहेत. विदर्भाच्या दृष्टीने ही महत्वाची चर्चा असल्यामुळे या विषयांशी सर्व संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित असावयास पाहिजेत अशी आमची अपेक्षा आहे. विदर्भातील महत्वाच्या प्रश्नासंबंधी हे शासन इतके उदासीन असेल तर आम्ही बोलावयाचे की नाही असा प्रश्न निर्माण होतो. हे शासन पॅकेजची नीट अंमलबजावणी करीत नाही, कर्जमाफ करीत नाही याबद्दल आम्ही यापूर्वीच निषेध व्यक्त केलेला आहे. परंतु संबंधित मंत्रिमहोदयांच्या अनुपस्थितीमुळे शासनाची उदासिनता दिसून येत असल्यामुळे आम्ही या चर्चेला सुरुवात करावी की नाही याबाबत आपणच

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

निर्णय द्यावा.

**तालिका सभापती** : या चर्चेला माननीय कृषी मंत्री उत्तर देण्यासाठी उपस्थित आहेत, ते ज्येष्ठ व अनुभवी मंत्री आहेत. त्याचप्रमाणे इतर खात्याचे संबंधित राज्यमंत्री देखील उपस्थित आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : विदर्भामध्ये दुष्काळी परिस्थिती असून दुष्काळ घोषित करावयाचा आहे. त्यासाठी महसूल मंत्र्यांची उपस्थिती सभागृहामध्ये अनिवार्य आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : एक कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य जे जे मुद्दे मांडतील त्या सर्व मुद्यांची नोंद आम्ही घेऊ. महसूल राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : विदर्भामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे महसूल खात्याचे कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसतील तर आम्ही कशी काय चर्चा करणार?

श्री. जयंत प्र. पाटील : या चर्चेमध्ये कृषी विभागाचा थोडाच संबंध आहे. परंतु विदर्भामध्ये वाटलेले पॅकेज, ते पॅकेज शेतक-यांपर्यन्त न पोहोचणे आणि पॅकेज वाटपातील भ्रष्टाचार या गोष्टींचा सहकार खात्याशी, पणन खात्याशी संबध आहे. त्यामुळे महसूल, सहकार आणि पणन खात्याचे मंत्री सभागृहामध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे मंत्रिमंडळाची बैठक सुरु आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव मांडलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मी प्रस्ताव मांडलेला आहे. मी प्रस्तावावरील भाषणाला सुरुवात करण्यापूर्वीच मंत्री महोदय सभागृहात नसल्याबद्दल हरकत घेतलेली आहे. मंत्री महोदयांना वेळ नसेल तर ही चर्चा शुक्रवारी घ्यावी.

श्री. विनोद तावडे : संबंधीत खात्याचे मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नसल्यामुळे ही चर्चा शुक्रवारी ठेवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : या चर्चेला पुरेसा वेळ पाहिजे असे माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांनी या चर्चेमध्ये वेळ न घालविता प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी. शासनाची उत्तर देण्याची तयारी आहे.

श्री. पाशा पटेल : हे सरकार विदर्भामध्ये आलेले असताना विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा होणार आहे. विदर्भातील जनता आत्महत्या करायला लागलेली आहे. आता या सरकारच्या वागण्याकडे बघून या जनतेला काय वाटेल ? हे अधिवेशन विदर्भामध्ये होत आहे याचे भान सरकारला असले पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रस्ताव अतिशय महत्वाचा आहे. तसेच या प्रस्तावाशी संबंधीत असलेले मंत्री महोदय देखील सभागृहात उपस्थित नाहीत. म्हणून या प्रस्तावरील चर्चा शुक्रवारी घेण्यात यावी.

**तालिका सभापती ( श्री. भास्करराव जाधव )** : यासंदर्भातील निर्णय घेण्याकरिता मी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 4.11 ते 1.16 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 16:16

## स्थगितीनंतर

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सहकार विभागाचे मंत्री सभागृहात हजर नाहीत?

डॉ.दीपक सावंत : सहकारमंत्री कुठे आहेत?

**तालिका सभापती** : सन्माननीय महसूल मंत्री, सन्माननीय कृषिमंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा कर्जमुक्तीचा विषय आहे. म्हणून आम्ही सूचना केली की, हा प्रस्ताव शुक्रवारी चर्चेला घेण्यात यावा.

डॉ.पंतगराव कदम : आमची हरकत नाही.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : विरोधी पक्षाची आजच चर्चा करण्याची तयारी असेल तर सत्ताधारी पक्षाची देखील चर्चा करण्याची तयारी आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : संबंधित मंत्री कुठे आहेत? सहकार , कृषि, महसूल, पणन या विभागाचे कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. कर्जमुक्तीचा धोरणात्मक निर्णय आहे.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव मांडला, परंतु भाषण सुरु करण्यापूर्वी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. संबंधित विभागाचे कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे हा प्रस्ताव शुक्रवारी चर्चेला घेण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कर्जमुक्ती, दुष्काळ, कृषि आणि पॅकेज अशा चार विषयांवर आम्ही प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे हा प्रस्ताव शुक्रवारी चर्चेला घ्यावा अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताव शुक्रवारी चर्चेला घेण्यात येईल.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा अत्यंत गंभीर आहे त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी फक्त ताकास तूर लावण्यासाठी उपस्थित राहू नये.....

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारचे हेत्वारोप माननीय मंत्री महोदयांवर करु नयेत, अशी माझी त्यांना विनंती आहे. येथे बसलेले सर्व ज्येष्ठ माननीय मंत्री महोदय आहेत, त्यांनी ठरविले तर ताबडतोब चर्चेलाही ते सुरुवात करु शकतात, म्हणून अशा प्रकारच्या कॉमेन्ट्स करणे उचित नाही.

डॉ. पतंगराव कदम : महोदय, ही चर्चा शुक्रवार, दिनांक 26 डिसेंबर, 2008 रोजी घेण्याचे ठरले आहे. ती चर्चा त्या दिवशी 12.00 वाजता घेण्यात यावी, अशी मी सूचना करतो.

**तालिका सभापती** : शुक्रवार, दिनांक 26 डिसेंबर, 2008 रोजी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर या प्रस्तावावरील चर्चा आपण घेऊ. आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांची अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल.

-------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

**पृ. शी.** : राज्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन आरोग्यसुविधा पुरविणे

**मु. शी.** : राज्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन आरोग्यसुविधा पुरविणे यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील वाढलेली लोकसंख्या त्याप्रमाणात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र नसणे, ती वाढविण्याची नितांत आवश्यकता, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राबाबत सुधारित बृहत आराखडा तयार करुन जनतेला आरोग्य विषयक सुविधा देण्याची नितांत आवश्यकता, तालुका स्तर व मोठ्या खेड्यामध्ये आरोग्याविषयक सुविधा नसल्याने तेथील जनतेला दूरवर उपचारांसाठी जावे लागणे, गंभीर रुग्णांना रुग्णवाहिका सदर आरोग्य केंद्रावर उपचारासाठी नेण्यास उपलब्ध नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे हे आरोग्य खात्यातील महत्वाचे घटक मानले जातात. लोकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहचवावयाच्या असतील तर पहिल्यांदा राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे आपल्याला सुदृढ करणे आवश्यक आहे. आज शहरी व ग्रामीण भागातील लोकसंख्येचा आवाका बघितला तर तो दिवसेदिवस वाढतच चालला आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे यांची व्याप्ती वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी 30 हजार आणि उपकेंद्रासाठी 5 हजार लोकसंख्येचा निकष ठरविलेला असून आदिवासी भागात आरोग्य सुविधांची जास्त गरज असते म्हणून तेथे हे नॉर्म्स शिथील करण्यात आले आहेत. अशा प्रकारे ही संख्या पाहिली तर राज्यात 362 ग्रामीण रुग्णालये, 1817 प्राथमिक आरोग्य केंद्रे, 179 प्राथमिक आरोग्य पथके, 61 फिरती आरोग्य पथके आणि 10535 उपकेंद्रे आपल्या राज्यात आहेत. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आंतररुग्ण विभाग 6 खाटांचा असतो पण या 6 खाटाही कधी भरलेल्या दिसत नाहीत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, शासनाच्या नॉर्म्स प्रमाणे 6 खाटांचा विभाग असणे आवश्यक आहे त्या ठिकाणी बाहयरुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग तसेच प्रयोग शाळा असण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी सिरीअस पेशंट आला तर त्यावर कोणत्याही प्रकारचा इलाज केला जात नाही तर त्याला सरळ सरळ रुरल हॉस्पिटलमध्ये पाठवले जाते. या हॉस्पिटलमधून रुरल हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी ॲम्ब्यूलन्सची कोणत्याही प्रकारची सुविधा नसते. खाजगी वाहनातून रुग्णाला, अपघात झालेल्या रुग्णाला, फ्रॅक्चर झालेल्या रुग्णाला रुरल हॉस्पिटलमध्ये आणले जाते. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची मोबाईल व्हॅनची सुविधा उपलब्ध नसते.

सभापती महोदय, तत्कालीन आरोग्य मंत्री डॉ. विमलताई मुंदडा यांच्याकडे केंद्रसरकारने ॲम्ब्यूलन्सच्या संदर्भात एक प्रस्ताव पाठविला होता. केंद्रशासनाच्या या प्रस्तावामध्ये महाराष्ट्रराज्याला 1000 ॲम्ब्यूलन्स व्हॅन मिळणार होत्या. या प्रस्तावाचा फायदा गुजरात आणि कर्नाटक राज्याने घेतलेला आहे. ॲम्ब्यूलन्सच्या संदर्भात दुर्दैवाने महाराष्ट्र शासनाने प्रस्ताव न पाठविल्यामुळे महाराष्ट्राला 1000 ॲम्ब्यूलन्स उपलब्ध झाल्या नाहीत. 1000 ॲम्ब्यूलन्स आपल्याला उपलब्ध झाल्या असत्या तर संपूर्ण महाराष्ट्रभर ॲम्ब्यूलन्सचे जाळे निर्माण झाले असते, कुठल्याही पेशंटवर ट्रिटमेंट करणे शक्य झाले असते, ट्रिटमेंटशिवाय कोणताही रुग्ण दगावला नसता.

सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रात लेबर वॉर्ड, ब्लड इमर्जन्सी वॉर्ड, इसीजी मशीन , सक्शन मशीन, वेईंग मशीन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच याबाबरोबर आपल्याला अजूनही काही उपकरणे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. डॉक्टरांना पुरेशी उपकरणे उपलब्ध नसल्यामुळे डॉक्टरांचे हाल होत आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सकाळी आरोग्याच्या संदर्भात चांगले विचार व्यक्त केलेले आहेत. 60 टक्के प्राथमिक आरोग्य केंद्राचे आयुष्य आता संपलेले आहे, काही प्राथमिक केंद्रे तर तुटण्याच्या स्थितीत आहेत, काही उपकेंद्रात लीकेज फार मोठया प्रमाणात आहेत, काही प्राथमिक केंद्रात तर साप, विंचू निघत असतात त्यामुळे या ठिकाणी डॉक्टर्स, स्टाफ आणि पेशंट कसे काय राहू शकतील ? या ठिकाणी आपण केवळ 90 टक्के आंतररुग्ण भरती केले जातात व त्यांच्यावर थातुरमातूर उपचार करुन सायंकाळी सहा वाजता पेशंटला घरी पाठवले जाते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, उपकेंद्राची परिस्थिती तर फार भयंकर आहे. या उपकेंद्रामध्ये प्राथमिक उपचार, प्रसूतीपूर्वी मातांवर किरकोळ इलाज केले जातात, जलसंजीवनी पॅकेटचे वाटप केले जाते, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपनचा सल्ला दिला जातो. क्षयरोग, हिवताप यावर इलाज केला जातो. या आरोग्य केंद्रात केवळ एक पुरुष आरोग्य सेवक असतो व एक स्त्री आरोग्य सेवक असते. या ठिकाणी डॉक्टरांची काही सुध्दा सोय नसते. ग्रामीण भागातील 5 हजार वस्तीच्या भागाला अशा प्रकारे सेवा दिली जात असते.

सभापती महोदय, WHO च्या रिपोर्ट प्रमाणे मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये डॉक्टरांची संख्या मुबलक आहे. परंतु ग्रामीण भागामध्ये एक हजार लोकसंख्येच्या मागे एक डॉक्टर सुध्दा उपलब्ध नाही अशी स्थिती आहे. खेडे आणि शहरातील लोकसंख्येचा विचार केला तर हे परिमाण योग्य ठरू शकते. परंतु आज यासंदर्भात कोठल्याही प्रकारचे परिमाण नाही. आपल्याकडे मोठया प्रमाणात MBBS डॉक्टरांची कमतरता आहे. मध्यंतरी सांगण्यात आले होते की, ज्या ठिकाणी MBBS डॅक्टर्स उपलब्ध नाही त्या ठिकाणी BAMS डॉक्टर्सची नेमणूक केली जाईल. माननीय मंत्री महोदय याला आपण सहमत व्हाल की नाही हे मला माहिती नाही. परंतु ग्रामीण भागातील जनतेचे जीवन आपण कोणाच्या हवाली देणार आहात ? ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या डॉक्टरांकडून ट्रिटमेंट मिळू नये का ? घटनेने जे अधिकार दिलेले आहे ते अधिकार ग्रामीण भागातील जनतेला का मिळू नये का ? ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या डॉक्टरांकडून डायग्नोसीस करण्याची आवश्यकता नाही काय ?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत........

त्या लोकांना एक्स-रे फॅसिलिटी, पॅथॉलॉजी फॅसिलिटी नको आहे काय ? डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे आपण बी.ए.एम.एस. डॉक्टर्सची नियुक्ती करता. ही सरकारने केलेली ॲडजेस्टमेंट आहे. आम्ही काही प्रश्न विचारल्यास सांगायचे की, डॉक्टर्सची पदे भरण्यात आलेली आहेत. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. आपण अशाप्रकारे बी.ए.एम.एस.डॉक्टर्सची नियुक्ती करु शकत नाही. पण शासन हा अट्टाहास कशासाठी करीत आहे हे मला समजत नाही. ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आणि उप केंद्रामध्ये डॉक्टर्सची पदे भरल्यास त्या केंद्रास बळकटी येईल आणि तेथील रुग्णांना चांगल्या प्रकारे आरोग्य सेवा उपलब्ध होईल.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उप केंद्रामधील डॉक्टर्सना अनेक मिटींग्ज असतात. आज डी.एच.ओ.नी मिटींगसाठी बोलाविले तर उद्या मलेरियाच्या आजारासंबंधी मिटींग आहे, तर तिसऱ्या दिवशी क्षयरोगासंबंधी मिटींग आहे. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांवर उपचार करण्यासाठी डॉक्टर्स उपलब्ध नसतात. रुग्णांना नर्स किंवा ए.एन.एम.मार्फत उपचार करुन घ्यावे लागतात. जर मोखाडा भागातील डॉक्टर ठाणे येथे मिटींगसाठी गेला तर तो संध्याकाळी परत येतो. गडचिरोली येथील डॉक्टर नागपूरला मिटींगसाठी गेल्यास तो दुसऱ्या दिवशी हजर होतो. तेव्हा डॉक्टर्सनी डी.एच.ओ.कडे मिटींगसाठी न जाता डी.एच.ओ.नी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन मिटींग्ज घेतल्या पाहिजेत. मिटींग्जच्या नावाखाली डॉक्टर्स दिवसभर बाहेर राहतात. त्यामुळे रुग्णांवर उपचार होत नाहीत. तेव्हा या सर्वंकष बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्राची आणि उप केंद्राची काय अवस्था आहे ते सांगतो. मलेरियाचे निर्मूलन करण्यासाठी एका हौदात गप्पी माशांची पैदास केली जाते. परंतु त्या हौदाच्या आजूबाजूला साप फिरत असतात आणि ते गप्पी मासे खाऊन टाकतात. नंदूरबार, अक्कलकुवा, चिखलदरा, धारणी आणि अन्य भागांत हीच परिस्थिती आहे. अधिकारी फक्त गाडी घेऊन फिरत असतात पण याकडे कोणाचे लक्ष नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये साधी साधी औषधे आणि इंजेक्शन्स उपलब्ध असणे आवश्यक असते, ती औषधे उपलब्ध नसतात. प्राथमिक

..2..

AJIT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 16:30

डॉ.दीपक सावंत........

आरोग्य केंद्रासाठी आय.सी.डी.एस. मार्फत करोडो रुपयांचे डिस्पोझेबल स्पीरिट सॉब व बेटाडीन गॉज घेतले जातात. परंतु 800 ते 900 रुपयांचे नेब्युलायझर घेऊ शकत नाही हे आपले दुर्दैव आहे. काही प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तापावर आयुर्वेदिक औषध देण्यात येतात. त्या आयुर्वेदिक औषधाचे नाव मला आता आठवत नाही. "पी" अक्षरावरुन नाव सुरु होते. डेरीफाईलीन औषध सुध्दा नसते. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये लिव्हर टॉनिक आहे. परंतु ॲन्टीबायोटीक मिळणार नाही, तापावरील कोणते तरी जनरीक औषध दिले जाते, परंतु क्रोसीनचे सिरप मिळणार नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रांचा आणि उप केंद्राचा दर्जा वाढविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करण्यात येणार आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावे. त्यांच्याकडून आम्हाला मोठ्या अपेक्षा आहेत. आम्हाला ढोकळेबाज उत्तराची अपेक्षा नाही. आरोग्य विभागाचा निधी पडून आहे. किती प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींची कामे अर्धवट स्थितीत आहेत,

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ 16=35

डॉ.दीपक सावंत ...

आपल्याकडे किती प्राथमिक आरोग्य केन्द्रे आणि उपकेन्दे बांधणे अपेक्षित आहेत आणि दर्जेनुसार प्रत्यक्षात किती बांधण्यात आलेली आहेत ? 2002-2003, 2003-2004 , 2004-2005, 2005-2006 या सालातील ही सगळी आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहे. आरोग्य विभागानेच दिलेली ही आकडेवारी आहे. तेव्हा ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केन्द्रे आणि उपकेन्द्रे नाहीत त्या ठिकाणी किती दिवसात ती बांधण्यात येणार आहेत. ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

सभापती महोदया, एनआरएचएम कडून आपल्याला निधी मिळत असतो. जवळजवळ 200 कोटी रुपयांचा निधी त्यांनी आपल्या राज्याला दिला आहे. हे पैसे उपकरण खरेदी करण्यासाठीच खर्च करावयास पाहिजे . परंतु बांधकामामध्ये अधिका-यांना सर्वात जास्त कमिशन मिळत असल्यामुळे बांधकामासाठी हे पैसे खर्च केले जातात. जेजे हॉस्पिटलसाठी 120 कोटी रुपये मिळाले होते त्यापैकी 20 कोटी रुपये बांधकामावर खर्च करण्यात आले आणि 100 कोटी रुपये उपकरणे खरेदी करण्यासाठी खर्च करण्यात आले होते. ज्या कामासाठी एनआरएचएमने पैसे दिलेले आहेत ते पैसे त्याच कामासाठी खर्च केले पाहिजे.परतु त्या कामासाठी पैसे खर्च न करता दुस-या कामावर खर्च केले जात आहे. एनआरएचएम कडून औषधांची यादी देण्यात आली असून ही औषधे केन्द्र सरकारने ठरवून दिलेल्या कंपन्याकडूनच खरेदी केली पाहिजेत असे सांगण्यात आलेले आहे म्हणजे आम्ही पैसे देतो आणि आम्ही सांगू त्याप्रमाणे औषधाची खरेदी करण्यात यावी असे केन्द्राने आपल्याला कळविलेले आहे. अशा प्रकारे जर खरेदी होत असेल तर आरोग्य सेवेच्या दर्जेमध्ये वाढ कशी काय होईल ? या सगळया गोष्टींचा राज्य शासनाने विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हा हा डोंगरी आणि दुर्गम आहे. देवगड मधील माझ्या गावात मी उपकेन्द्राची सतत सहा वर्षापासून मागणी करीत आहे, मी आमदार झाल्या पासून ही मागणी सातत्याने करीत असतांना ते दिले जात नाही. या उपकेन्द्रासाठी लागणा-या जमिनीसाठी बक्षिसपत्र मी करुन दिले होते आणि या जागेवर उपकेन्द्र सुरु करण्यात यावे असे सांगितले होते परंतु अजूनही तेथे उपकेन्द्र दिले नाही. अशाच प्रकारची स्थिती आदिवासी भागात आहे. त्या भागात अनेक ठिकाणी उप केन्द्रे नाहीत. उपकेन्द्रे मंजूर केले तर तेथे आरोग्य सेविका नसते, पाडा स्वयंसेविका नसते तसेच "आशा" देखील नसते . शासनामार्फत आशा या स्वंयसेविकेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बेसिक ट्रेनिंग दिले जाते त्याचबरोबर यासाठी शासना मार्फत खर्च केला जातो. केवळ प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या इमारती उभारुन चालणार नाही तर प्राथमिक आरोग्य केन्द्रे आणि उपकेन्द्रे ख-या अर्थाने चालू स्थितीत असली पाहिजेत. त्या ठिकाणी डॉक्टर्स, योग्य तो स्टाफ, पुरेशी औषधे डॉक्टरांची आणि इतर स्टाफचे क्वार्टर्स, त्याचबरोबर योग्य ते वातावरण आणि परिसर असला पाहिजे या सर्व गोष्टी त्या ठिकाणी कशा देता येतील याचासुध्दा विचार करणे आवश्यक आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मोखाडा तालुक्यात खोडाळा येथे एक प्राथमिक आरोग्य केन्द्राची इमारत बांधण्यात आली व त्यासाठी एकूण 34 लाख रुपये खर्च करण्यात आला होता. त्यापैकी 12 लाख रुपये प्राथमिक आरोग्य केन्द्राची इमारत बांधण्यासाठी खर्च करण्यात आले होते आणि 22 लाख रुपयें कंपाऊन्ड वॉल बांधण्यासाठी खर्च करण्यात आले होते. त्या ठिकाणी जी नवीन इमारत बांधण्यात आली होती ती सुध्दा गळत आहे. प्राथमिक आरोग्य केन्द्राची इमारत स्लॅबची बांधण्यात येते आणि ती गळते.तेथे मोठया प्रमाणावर लिकेज होत असते. तेव्हा मला असे सांगावयाचे आहे की, ज्या ठिकाणी जास्त पाऊस पडतो त्या ठिकाणी तरी या स्लॅबच्या इमारतीवर पत्रे बसविण्यात आले पाहिजे. इमारत बांधण्यासाठी एवढा खर्च केल्यानंतर पत्र्यासाठी थोडेसे पैसे खर्च केले तर गळतीचे प्रमाण कमी होईल. तेव्हा जास्त पाऊस पडलेल्या ठिकाणी स्लॅबवर पत्रे टाकण्यात यावेत असे मी या निमित्ताने सूचवू इच्छितो.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. प्राथमिक आरोग्य केन्द्रे गावा बाहेर का बांधण्यात येतात हे समजत नाही. जर प्राथमिक आरोग्य केन्द्र गावाजवळ वस्ती जवळ असेल तर लोकांना ताबडतोब औषधोपचार मिळू शकेल त्याचबरोबर रुग्णांचा व नातेवाईकांचा वाहतूकीचा खर्च देखील वाचेल. या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मंत्रीमहोदयना अशी विनंती करतो की त्यांनी ठोकळेबाज उत्तर न देता परिपूर्ण उत्तर द्यावे . एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शोभा बच्छाव (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नियम 92 अन्वये जी अर्धा तास चर्चा उपस्थित करून संपूर्ण महाराष्ट्राच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून जिव्हाळ्याचा असा प्रश्न येथे उपस्थित केला आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये लोकसंख्येच्या निकषावर आधारित आरोग्य संस्था स्थापन करण्यात येतात. त्यानुसार आदिवासी आणि डोंगरी भागासाठी 3 हजार लोकसंख्येमागे 1 आणि बिगर आदिवयासी भागामध्ये 5 हजार लोकसंख्येमागे 1 उपकेंद्र आणि आदिवासी व डोंगरी भागासाठी 20 हजार लोकसंख्येमागे 1 आणि बिगर आदिवासी भागासाठी 30 हजार लोकसंख्येमागे 1 प्रा.आ.केंद्रे स्थापन करण्याचे निकष निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच प्रत्येक पाच प्रा.आ.केंद्रांमागे एक ग्रामीण रूग्णालय स्थापन करण्याचे आणिप्रत्येक तालुक्याच्या मुख्यालयी एक ग्रामीण रूग्णालय असावे असाही निकष आहे. सभापती महोदय, साधारणत: 1991 चा बृहत आराखड्याची अद्याप पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नाही. कारण विकासाचा तौलनिक स्तर अनुशेष निर्देशांक समितीने 1997 साली सुचविलेल्या अनुशेषाची पूर्तता प्राधान्याने करण्याचे बंधन शासनावर घातले आहे. त्याप्रमाणे 1991 च्या जनगणनेनुसार व त्या आधारित बृहत आराखड्यानुसार मंजूर करावयाच्या आरोग्य संस्था विचारात घेऊन 2001 च्या जनगणनेवर आधारित संख्यात्मक बृहत आराखडा शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुसार एकंदर 4,022 उपकेंद्रे, 493 प्रा.आ.केंद्रे आणि 94 ग्रामीण रूग्णालये स्थापन होऊ शकतात. या व्यतिरिक्त भौगोलिक स्थितीनुसार राज्यातील कोणत्याही भागात 7 कि.मी.पेक्षा कमी अंतरावर आरोग्य सेवा मिळावी असाही प्रस्ताव विचाराधीन असल्याने सध्याच्या आरोग्य सेवेत वाढ होऊ शकते. आरोग्य संस्थांच्या सुचविलेल्या अनुशेषानुसार राज्यात शासनाने 85 प्राथमिक आरोग्य केंद्रे, 811 उपकेंद्रे आणि 133 ग्रामीण रूग्णालयांची स्थापना केलेली आहे आणि खाटांचा एकूण 19523 इतका अनुशेष जवळपास पूर्ण केला आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये सध्या 1816 प्रा.आ.केंद्रे व 10579 उपकेंद्रे कार्यरत आहेत तसेच राज्यात आदिवासी जिल्ह्यांमध्ये 172 भरारी पथके कार्यरत असून 116 प्रा.आरोग्य पथके, 481 आयुर्वेदिक दवाखाने इ. संस्थांमार्फत ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा पुरविण्यात येते आहे. सध्या राज्यातील 366 ग्रामीण रूग्णालयांपैकी 274 ठिकाणी शासकीय रूग्णवाहिका पुरविण्यात आलेल्या आहेत. 1816 प्रा.आ.केंद्रापैकी 1726

..... 3एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. बच्छाव ....

प्रा.आ.केंद्रांमध्ये वाहने उपलब्ध आहेत. ज्या ग्रामीण रूग्णालयात व प्रा.आ.केंद्रामध्ये वाहन उपलब्ध नाही वा वाहन नादुरूस्त आहे त्या ठिकाणी भाड्याने वाहने उपलब्ध करून देण्यात यतात. जेथे वाहने उपलब्ध नाहीत तेथे रूग्णांना संदर्भ सेवा देण्यासाठी राज्य ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात येते.

( यानंतर श्री. सरफरे .... 4जी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शोभा बच्छाव...

सभापती महोदय, वाहन नादुरुस्त असल्यास रुग्णांना खाजगी वाहन भाडयाने घेऊन त्या वाहनाने संदर्भित करण्यासाठी व त्यापोटी होणाऱ्या खर्चास अबंधित निधीमधून व रुग्ण कल्याण निधीमधून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. अबंधित निधी व रुग्ण कल्याण निधी शिल्लक नसल्यास इंडियन पब्लिक हेल्थ स्टँडर्ड अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालयासाठी मंजूर असलेल्या निधीमधून हे अनुदान देण्यात येते. त्याप्रमाणे आय.पी.एच.एस. अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी 5 लाख, उपकेंद्रासाठी 1 लाख, ग्रामीण रुग्णालयासाठी 18 लाखापर्यंत आणि जिल्हा रुग्णालयासाठी 25 ते 50 लाख रुपये अनुदान देण्यात येते.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्रासाठी एन.आर.एच.एम. अंतर्गत मेंटेनन्स व दुरुस्तीसाठी निधी दिला जातो. त्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी 50 हजार आणि सब सेंटरसाठी 10 हजार इतका निधी दिला जातो. त्यामधून अंतर्गत दुरुस्तीची कामे केली जातात. सभापती महोदय, एन.आर.एच.एम. मधील पैसा केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रोग्राम इंम्प्लिमेंटेशन प्लॅनप्रमाणे खर्च केला जातो. त्याचप्रमाणे एन.आर.एच.एम. अंतर्गत "आशा" कार्यकर्ती सध्या फक्त 15 आदिवासी जिल्हयांसाठी मंजूर करण्यात आल्या आहेत. त्याचा बृहत आराखडा तयार करण्यात आला असून तो लवकरच मंजुरीसाठी कॅबिनेटपुढे ठेवण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांच्या उत्तरामधून माझ्या एकाही प्रश्नाचे उत्तर आले नाही. मी याठिकाणी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. माझी आपणास विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये अतिसंवेदनशील असे 15 जिल्हे आहेत त्यामधील फक्त 10 प्राथमिक आरोग्य केंद्राना व उप केंद्रांना आपण जाऊन सरप्राईज भेट द्यावी. आपणास याठिकाणी लिहून दिलेले उत्तर आम्ही आज मान्य करतो. परंतु पुढील वेळी आम्ही हे टॉलरेट करणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, प्राथमिक आरोग्य केंद्रे बळकट करण्यासाठी आपण काय कार्यवाही करणार आहात याचे आपण उत्तर दिले नाही?

डॉ. शोभा बच्छाव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याठिकाणी ज्या सूचना केल्या आहेत त्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये, उपकेंद्रामध्ये साधनसामग्रींचा तुटवडा असणे इत्यादी सूचना केल्या आहेत. त्याबाबत त्याठिकाणी तातडीने पूर्तता करण्यात येईल. आणि त्या प्राथमिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ SBT/ MMP/ KTG/

डॉ. शोभा बच्छाव.....

आरोग्य केंद्रांना बळकट करण्यात येईल. त्याचप्रमाणे वाडे आणि पाडे यांच्याठिकाणी मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून आरोग्य सेवा पुरविण्याबाबत निश्चितपणे प्रयत्न केले जातील. त्याचप्रमाणे ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एम.बी.बी.एस. डॉक्टर उपलब्ध होत नाहीत, त्याठिकाणी बी.एच.एम.एस. झालेल्या डॉक्टरची नेमणूक करावी अशी सूचना केली. त्याबाबत सभागृहाला सांगितले पाहिजे की, डॉक्टरची रिक्त पदे एम.पी.एस.सी. च्या माध्यमातून भरण्याकरिता मंजुरी मिळाली आहे. डॉक्टरची 1 हजार पदे भरण्यास मान्यता मिळाली आहे. ॲडहॉक पध्दतीने आतापर्यंत पदे भरली आहेत. त्यांना प्रमोशन देण्याची कार्यवाही जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : केंद्र सरकारने दिलेल्या अनुदानातील किती अनुदान वापरण्यात आले आणि किती अनुदान लॅप्स झाले ? जी काही पदे आहेत त्याबाबत आम्हाला सर्व माहिती आहे. आम्ही ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्ये काम केल्यानंतर विधान परिषदेमध्ये आलेलो आहोत. किती लोकसंख्येला प्राथमिक आरोग्य केंद्र असते हे आम्हाला माहीत आहे. या ठिकाणी एकच विचारु इच्छितो की, किती आरोग्य केंद्रामध्ये तेथील डॉक्टर्स आणि नर्सेस राहतात ? माननीय मंत्रिमहोदया डॉक्टर आहेत. आपण स्वत: दौरे करावेत आणि पुढील अधिवेशनात आम्ही विचारु यादृष्टीने अंमलबजावणी करावी. आपण खरेदी करण्याच्या मागे लागू नका. आतापर्यंत भरपूर खरेदी झालेली आहे. केंद्र सरकारची आलेली 100 टक्के ग्रँट आम्ही संपवू असे आश्वासन या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने दिले पाहिजे. तसे आश्वासन माननीय मंत्रिमहोदय देणार काय ?

डॉ. शोभा बच्छाव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी जी सूचना मांडलेली आहे ती निश्चितपणे योग्य आहे. या संपूर्ण एनआरएचएम अंतर्गत एकूण ॲलोकेशन 1194 कोटी रुपयांचे होते. त्यापैकी 235 कोटी रुपये एवढा निधी प्राप्त झाला आणि ऑक्टोबर, 2008 अखेर 198 कोटी रुपये एवढा खर्च झालेला आहे. आरोग्य केंद्राचे बळकटीकरण करण्यासाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी 25 हजार रुपये इतका अनटाईड फंड दिला जातो. जवळपास 50 हजार रुपये वार्षिक मेन्टेनन्स ग्रँट दिली जाते तसेच आरकेएस अंतर्गत 1 लाख रुपये दिले जातात. हे जे पैसे दिले जातात ते निश्चितपणे त्याच दुरुस्तीसाठी किंवा त्याच गोष्टींसाठी खर्च केले जातील असा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकणात अतिवृष्टी होत असल्यामुळे अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये लिकेज निर्माण झालेले आहे. त्यामुळे त्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा वापर करण्यासारखी परिस्थिती नाही. लिकेज झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी शासन मोठ्या प्रमाणावर तरतूद करणार काय ? उपकेंद्रे वस्तीच्या बाहेर बांधली जातात. ही उपकेंद्रे वस्तीमध्ये बांधण्यासाठी असलेल्या एस्टिमेट्समधून जागा खरेदी करण्याची तरतूद करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ? त्याचबरोबर एनआरएचएम मध्ये आयुष दवाखाने ठिकठिकाणी चालू करण्याचा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

प्रयत्न केलेला आहे. आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 2 ठिकाणी असे दवाखाने मंजूर झाले असून ते लवकर चालू करणार काय ?

**तालिका सभापती** ( श्री. भास्कर जाधव ) : मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, वस्तीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधावयाचे असेल तर त्यासाठी विनामोबदला जागा द्यावी लागते, तशी जागा कोणी देणार आहे काय ?

डॉ. शोभा बच्छाव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचा निश्चितपणे विचार करुन शासन स्तरावर सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आरोग्य विषयक अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे आणि माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्यातील आकडेवारीचा भाग आणि प्रत्यक्ष उत्तर या ठिकाणी बसलेल्या प्रत्येक सदस्याला अनुभवाने माहीत आहे की, या सगळ्यांची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. या अवस्थेमध्ये या देशाचे आणि या राज्याचे जे प्रथम उद्दिष्ट आहे की या देशातील सर्वसामान्य माणसांपर्यंत चांगल्या दर्जाची रुग्णसेवा पुरविण्यासाठी एक विशेष योजना गेल्या अनेक वर्षामध्ये काढली नाही परंतु ते काम एनआरएचएमच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न चालू आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

केंद्र व राज्य सरकारने मिळून हा प्रकल्प राबवावयाचा आहे. हा विषय अतिशय संवेदनशील आहे. त्यामुळे या विषयाच्या आकडेवारीत न जाता यामध्ये गुणात्मक वाढ होणे, त्याचे सक्षमीकरण होणे व त्यासाठी आवश्यक असलेले इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करणे हे महत्वाचे विषय याच्याशी निगडित आहेत. सामान्य माणसाच्या आयुर्मानात वाढ झालेली आहे. या देशातील लोकांचे आयुष्य वाढत आहे. परंतु आपण पाहतो की, या सर्व यंत्रणेमध्ये जी एक प्रकारची बांधिलकीची भावना असते ती कोठे तरी हरवली आहे काय असे वाटते. अनेक ठिकाणच्या ॲम्ब्युलंस निकामी झालेल्या आहेत, जुन्या झालेल्या आहेत, काही वापरात नाहीत तर काही गाडयांसाठी चालक नाहीत असे चित्र दिसून येते. या खात्याचा कारभार नवीन मंत्री महोदयांकडे आलेला आहे. त्यामुळे त्यांनी प्रत्यक्षात भेट देऊन पाहणी करावी. युतीच्या काळात आमच्या भागात तापाची साथ आलेली असताना तत्कालीन आरोग्य मंत्र्यांनी प्रत्यक्षात भेट दिली होती. त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आले होते की, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांना औषधे मिळत नाहीत, परंतु तीच औषधे खाजगी प्रॅक्टीस करणा-या डॉक्टरांच्या दवाखान्यामध्ये आढळून आली. या सगळया गोष्टीचा विचार करुन ही सेवा सुधारण्यासाठी अधिक चांगल्या पध्दतीने काय करता येईल हे पाहिले पाहिजे, ही यंत्रणा मानवतावादी कशी करता येईल यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाषण केले त्यानंतर आपण भाषण करावयास पाहिजे होते. आता आपल्याला प्रश्न विचारण्याची संधी दिली असताना आपण भाषण केले आहे.

दुस-या अर्ध्या तासाच्या चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, मघाशी नियम 260 अन्वये 'शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्या' या विषयावरील चर्चा सुरु झाली होती. तो विषय नंतर घेतला जाणार असल्यामुळे आपण घोषणांचा उल्लेख असलेले जे वस्त्र परिधान केले आहे ते आता काढावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>शौर्य पदकांबाबत</u>

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय उपसभापतींनी शौर्य पदकांविषयी सभागृहात उल्लेख केला होता. त्याची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली जाणार होती. सभागृहाची बैठक अर्ध्या तासाच्या चर्चेनंतर संपणार आहे. कृपा करुन आपण याबाबत संबंधितांना सूचना द्यावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु आपण अगोदर आठवण केली असती तर बरे झाले असते. सभागृहाची बैठक संपण्यास फार कमी अवधी राहिलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये जे अदृश्य स्वरुपात अधिकारी बसतात त्यांचे हे काम आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे, आजचे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी ती यादी देण्याचा मी प्रयत्न करतो.

-----

3....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

**पृ. शी.** : रायगड तालुक्यातील वीज निर्मिती प्रकल्पांसाठी जमीन संपादन करण्यास शेतकऱ्यांनी केलेला विरोध

**मु. शी.** : रायगड तालुक्यातील वीज निर्मिती प्रकल्पांसाठी जमीन संपादन करण्यास शेतकऱ्यांनी केलेला विरोध यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील धेरंड-शहापूर इत्यादी 13 गावांमध्ये टाटा वीज निर्मीती व रिलायन्स वीज निर्मिती प्रकल्पांसाठी जमिनीचे संपादन करण्यात येणे, शेतकऱ्यांनी वेळोवेळी जमीन देण्यासंबंधी विरोध दर्शविणे, याप्रकरणी शासनाने शेतकऱ्यांचा विरोध असेल तर सक्तीने जमीन संपादन केली जाणार नाही असे घोषित करणे, तरी देखील प्रकल्पासाठी जमिनीचे संपादन करण्याकरिता शेतकऱ्यांना नोटीसा पाठवून विशेष भूसंपादन अधिकारी, रायगड (1) यांचे कार्यालयात माहे मे, 2008 च्या दरम्यान उपस्थित राहण्याची सक्ती करणे, रायगड जिल्ह्यात पनवेल, अलिबाग, उरण, पेण, रोहा, खालापूर, महाड इत्यादी तालुक्यांमध्ये वीज प्रकल्प व पंचतारांकित हॉटेल्सच्या माध्यमातून औद्योगिक महामंडळाने शेकडो एकर जमीन संपादित करणे त्यामुळे रायगड जिल्ह्यातील शेतकरी भूमिहीन होत जाणे, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत त्यांचे पुनर्वसनाचे प्रश्न प्रलंबित असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, गेल्या 2 वर्षापासून वीज निर्मितीच्या प्रकल्पांसाठी खाजगी कंपन्यांकडून रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील धेरंड-शहापूर या गावातील जमीन संपादन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गेल्या अधिवेशनामध्ये या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी असे आश्वासन दिले की, शेतक-यांचा विरोध असेल तर शासन जमीन संपादित करणार नाही. या आश्वासनाची नोंद झालेली आहे. त्यामुळे ते अधिवेशन संपल्यावर आम्ही तालुक्याला गेल्यावर लोकांना असे सांगितले की, मला माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात जे आश्वासन दिले होते त्याचे चित्रिकरण लोकांनी टी.व्ही.वर पाहिले होते, वर्तमानपत्रात ते छापून आले होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील....)

दोन महिन्यानंतर महसूल खात्याचे अधिकारी पुन्हा गावामध्ये गेले आणि त्यांनी शेतक-यांना जमीन द्यावयाची आहे की नाही यासंबंधी त्यांचे म्हणणे नोंदवून घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी बोलावले. त्यावेळी मी तहसिलदार आणि प्रांत अधिका-याला दूरध्वनीवरुन सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये आश्वासन दिलेले असल्यामुळे तुम्हाला शेतक-यांचे जबाब घेता येणार नाहीत. त्यावेळी आम्ही गावामध्ये जाऊन शेतक-यांचे जबाब घेऊ असे तहसिलदार आणि जिल्हाधिका-यांनी मला सांगितले. यासंबंधी मी अनेक वेळा सभागृहामध्ये बोललो आहे. गावक-यांनी जेव्हा या गोष्टीला प्रखर विरोध केला त्यावेळी त्यांना पोलिसांकडून मारहाण झाली. मी पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी सांगितले की, लोकांचा विरोध असेल तर आम्ही जमीन संपादन करणार नाही. कोकणामध्ये तीन प्रकल्प आहेत. बाहेरचे लोक असे म्हणतात की, वीज आली नाही तर विकास कसा होईल ? रायगड जिल्ह्यामध्ये पंचतारांकित एमआयडीसी करण्यासाठी महाड येथे 5 हजार एकर जमीन संपादित करण्यात आली. रोहा आणि माणगांव या दोन तालुक्यातील 2 हजार एकर जमीन संपादित करण्यात आली. पाताळगंगा येथील जमीन संपादित करण्यात आली. माझा पॉवर प्लॅण्टला विरोधी नाही. परंतु या संपादित केलेल्या जागेवर हे पॉवर प्लॅण्ट टाका असे आमचे म्हणणे आहे. केवळ परदेशातून कोळसा आणण्यासाठी समुद्रकाठची जमीन पाहिजे असे रिलायन्स आणि टाटा कंपनी सांगते. मी अनेक वेळा हा विषय सभागृहामध्ये मांडलेला आहे. परंतु राज्य शासन हा प्रश्न समजून घेत नाही. अलिबाग हे समुद्रापासून 5 कि.मी. अंतरावर आहे. सभापती महोदय, 500 मेगावॅटचा प्लॅण्ट टाकण्यासाठी फक्त 300 एकर जमीन लागते आणि 1 हजार मेगावॅटचा प्लॅण्ट टाकण्यासाठी 600 एकर जमीन लागते. असे असताना पॉवर प्लॅण्टच्या निमित्ताने 5 हजार एकर जागा कशासाठी घेतली जात आहे ? तर मागाहून ही जागा इतर उद्योगांना किंवा रेसिडण्ट उद्योगाला विकण्याचा डाव आहे. मी अलिबाग तालुक्यामध्ये राहातो. ते माझे गाव आहे. या भागामध्ये मध्यंतरी भराव घातला. बाहेरुन माती आणून एक एकरावर भराव करण्यासाठी 40 लाख रु. खर्च आला. सभापती महोदय, हे पॉवर प्लॅण्ट भीरा प्रकल्पातील गोड्या पाण्यावर चालणार आहेत. माझे असे म्हणणे आहे की, आधी ज्या जमिनी संपादित केलेल्या आहेत त्या ठिकाणी कोळसा आहे, जमीन आहे, शिवाय भराव करावा





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील....)

लागणार नाही व प्रकल्पाचा खर्चही मोठ्या प्रमाणावर कमी होईल. पंरतु आमचे म्हणणे कोणीही ऐकायला तयार नाही. राज्य शासन याबाबतीत कोणताही विचार करीत नाही. मी या विषयाच्या संदर्भात या सभागृहामध्ये सातत्याने दीड वर्षे चर्चा करीत आहे. अधिवेशनामध्ये शासन यासंदर्भात पॉझिटिव्ह आश्वासन देते आणि अधिवेशन संपल्यानंतर त्याच्या उलट कारवाई करते. तालिका सभापती महोदय, याबाबतीत आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून ठोस आश्वासन पाहिजे.रायगड जिल्हयातील 45 गावामध्ये सेझचा प्रश्न आहे. सेझ झाला पाहिजे म्हणून 45 गावामध्ये मतदान घेण्यात आले त्यावेळी 96 टक्के शेतक-यांनी सेझला विरोध केला. हा विरोध लक्षात आल्यानंतर असे मतदान घेण्याचे कोणतेही आदेश काढलेले नाहीत असे शासनाने सांगितले. हे मतदान घेताना मतदान केन्द्रावर तहसीलदार आणि जिल्हाधिकारी फिरत होते.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.शिगम 17:05

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, मतदान चालू असताना सर्व पत्रकार आणि दूरदर्शन वरील पत्रकार गावातील शेतक-यांच्या आणि अधिका-यांच्या मुलाखती घेत होते. यासंबंधी मतदान 98 टक्के झाले. रिलायन्सच्या दलालाना असे वाटले होते की, पैशाच्या जोरावर गावातील शेतकरी आम्हाला संमती देतील. परंतु 93 टक्के मतदार यांच्या विरोधात गेले. त्यामुळे राज्य शासनाने परत भूमिका बदलली. शासन सांगावयास लागले की, या गावातील शेतक-यांचे मतदान घ्यावे यासंबंधीचे आदेश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले नव्हते. जिल्हाधिकारी स्वत:च्या अधिकारात निर्णय घेतो हे काय चालले आहे ? सदर मतदान घेतल्यामुळे राज्य शासकीय अधिकारी चालवितात की, राज्यातील लोकप्रतिनिधी चालवितात याबाबतीत मला शंका येवू लागली आहे. अर्धा-तास चर्चेच्या सूचनेच्या निमित्ताने माझा शासनाला सवाल आहे की, हे मतदान कोणी घ्यावयास लावले ? या मतदानाचा निकाल सरकारच्या बाजुने लागला की विरोधात लागला ? याबाबतचा निर्णय लवकरात लवकर शासनाने घेतला पाहिजे अशी माझी मागणी आहे. रिलायन्स आणि टाटा या कंपन्यांना पॉवर प्रोजेक्ट काढण्यासाठी आमचा विरोध नाही. परंतु इतर ठिकाणी मोकळी जागा भरपूर आहे. समुद्र किना-यापासून कोळसा रेल्वे मार्गाने नेला तर पर किलोमिटरला पर टन, एक रुपया खर्च येतो. सभापती महोदय, रेल्वेने आपण चिपळूण येथे जाता. त्या ठिकाणी तुम्हाला माल वाहून नेण्याचे तसेच माल ठेवण्याचे दरपत्रक मिळेल. किती टन माल ठेवला तर किती चार्ज पडेल याचा जाणुनबजून तुम्ही अभ्यास करीत नाहीत. तुमच्याकडे स्वत:ची जागा आहे, ती जागा तुमच्या ताब्यात आहे. ती जागा समुद्र किना-यापासून फक्त 40 किलोमिटर अंतरावर आहे. कोळसा वाहण्याचा खर्च 40 रुपये पर टन खर्च येऊ शकतो. या ठिकाणी यांनी जमीन घेतली, तर त्या जमिनीचे सरळीकरण आणि त्यानंतरची डेव्हलपमेंट करण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च होईल. ते हजारो कोटी रुपये बाजूला ठेवले आणि त्या पैशांचे व्याज घेऊन त्याचे ट्रान्सपोर्ट केले तर 25 टक्के खर्च व्याजातून भागेल आणि या कंपनीचा कोळशाची वाहतूक व्यवस्थित होऊ शकते. हा विचार आम्ही मांडला. प्रॅक्टीकली तसे करुन बघितले. आम्ही त्या ठिकाणी व्यवसाय करतो आहोत. पॉवर प्रोजेक्टला लोकांचा खूप मोठा विरोध आहे ही गोष्ट शासनाने लक्षात घेतली पाहिजे. परंतु या कंपनी मालकांना मुंबई लगतची जमीन,समुद्र किनारा जवळील जमीन हवी आहे. अलिबाग तालुक्यात समुद्र किना-याच्या जवळ असलेल्या जमिनीचा भाव 25 लाख रुपये गुंठा आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

20 कोटी रुपये एकर तेथील जमिनीचा भाव आहे. परंतु या कंपनी धारकांना ती जमीन 5 लाख रुपये एकर या भावाने जमीन पाहिजे आहे. मंत्री महोदय, तुम्ही अलिबागला यावे आणि तेथील जमिनींचे भाव काय आहेत त्या बाबतची माहिती घ्यावी. अलिबाग तालुक्यात समुद्र किना-या लगतची जागा शिल्लक राहिलेली नाही. पूर्वी श्री.मदन पाटील येत होते, परंतु ते आता मंत्री झाले त्यामुळे त्यांनी तेथे येणे बंद केले आहे. हा विषय कुठे तरी थांबवावा अशी माझी शासनास विनंती आहे. कंपन्यांची माणसे जमीन संपादनाचा प्रयत्न करतात. ग्रामस्थांना नेहमी आंदोलने करावी लागतात. ग्रामस्थांना भुलविण्याचे काम या कंपनीच्या दलालांमार्फत होत आहे. इंडिया बूलमुळे या सभागृहात अतिशय तप्त वातावरण आहे. इंडिया बूल कंपनी आजुबाजुची 9 गावातील जमीन संपादित करण्याच्या तयारीत आहेत. संपूर्ण अलिबाग तालुका आणि संपूर्ण रायगड जिल्हा रिलायन्सला आणि इंडिया बूलला दान करण्याचे शासनाने ठरविले आहे. परंतु या कंपन्यांना जमीन देण्यास शेतक-यांचा प्रखर विरोध आहे. माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी यासंदर्भात जे आश्वासन आम्हाला या सभागृहात दिले आहे, त्या आश्वासनाची या शासनाने पूर्तता केली पाहिजे आणि अलिबाग तालुक्यातील व रायगड जिल्ह्यातील शेतक-यांना दिलासा दिला पाहिजे अशा प्रकारची मागणी मी अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चेची या सभागृहात उपस्थित केली आहे. अलिबाग तालुक्यात वेगवेगळया प्रकल्पांसाठी जमीन संपादनाची प्रक्रिया चालू आहे. त्या प्रक्रियेच्या बाबतीत त्यांनी आपले मत प्रकट केले आहे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 17:10

श्री.राणा जगजितसिंह पाटील.........

अनेक दिवसापासून त्या भागातील आम जनतेच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न बनलेला आहे. यापूर्वी या विषयावर अनेकदा चर्चा झाली. अनेक बैठका झाल्या. काही प्रमाणात निर्णयही घेतले गेले आहेत. आजची चर्चा ही मुख्यत: टाटा आणि रिलायन्स यांच्या पॉवर प्रॉजेक्टच्या अनुषंगाने उपस्थित करण्यात आली आहे. त्याचबरोबर पंचतारांकित हॉटेल्ससाठी एमआयडीसीच्या माध्यमातून शेकडो एकर जमीन संपादित करणे असे काही मुद्दे देखील आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हॉटेल हा शब्द चुकून उच्चारला गेला. मला पंचतारांकित हॉटेल ऐवजी पंचतारांकित एमआयडीसी असे म्हणावयाचे होते.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : कोणत्याही हॉटेलसाठी जमीन संपादित केली जात नाही असेच मी सांगणार होतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी स्पष्ट केले हे ठीक झाले. पंचतारांकित एमआयडीसी, वीज प्रकल्प यासाठी मोठया प्रमाणात जमीन संपादित करण्यात येत आहे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी अनेक चांगल्या सूचना देखील केल्या आहेत. त्याची इकॉनॉमिक फिजिबिलिटी किती आहे हे तपासून घ्यावे लागेल. समुद्राजवळची जागा का गरजेची आहे? पोर्ट जवळ असणे का गरजेचे आहे? पाण्याचा सोर्स अंतर्गत भागात असल्यास रेल्वे ट्रॅक नेण्यामुळे इकॉनॉमी कशी बदलते हे सर्व मुद्दे आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यावर अधिक गांभीर्याने विचार करणे गरजेचे वाटते. माझी विनंती आहे की, या विषयावर येत्या दोन तीन दिवसात जिल्हाधिकारी, रायगड यांना याठिकाणी आवर्जून बोलावून घेता येईल. यासंबंधी एक बैठक आयोजित करु.

श्री.जयंत प्र.पाटील : मुंबईला बैठक आयोजित करावी.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर जरुर मुंबईला बैठक आयोजित करु. जिल्हाधिकाऱ्यांकडून नेमकी काय परिस्थिती आहे हे अधिक चांगल्या पध्दतीने जाणून घेता येईल.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : त्या भागातील लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला देखील बैठकीला निमंत्रित करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : तेथील लोकप्रतिनिधी म्हणून आपण बैठकीला येत असाल तर आपले देखील स्वागत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या अनुषंगाने हे कसे फिजिबल होईल, ट्रान्सपोर्टेशन कॉस्ट किती पडते, जागा एमआयडीसीकडे उपलब्ध असेल आणि ती मोकळी असेल, पाण्याचा सोर्स जवळ असेल तर फिजिबिलिटीबाबत पुन्हा एकदा विचार करणे योग्य होईल. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या सूचना लेखी स्वरुपात दिल्या तर तज्ज्ञ लोकांना बोलावून त्या सूचनांचा देखील विचार करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : इंडिया बुल्ससाठी जमीन संपादित करणार नाही असे सांगितले. परंतु इंडिया बुल्ससाठी जमीन संपादनाची नोटीस जारी झाली आहे ती रद्द करावी. आज छोटेसे घर बांधताना, उद्योग सुरु करताना नवगाव येथे अडचणी येत आहेत. मी स्वत: त्या गावात एक आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा सुरु करण्याच्या प्रयत्नात आहे. इंडिया बुल्स या कंपनीच्या जमिनीची हद्द तेथे आहे. त्यांच्यासाठी जागा संपादनाची नोटीस काढल्यामुळे जिल्हाधिकारी मला एन.ए.परवाना देत नाही. त्यांचे म्हणणे आहे की, तुम्ही इंडिया बुल्स कंपनीकडून एनओसी आणा. जागा आमची आहे. सध्या मंदी असल्यामुळे इंडिया बुल्स कंपनीकडे पैसा नाही. त्यामुळे इंडिया बुल्ससाठी जमीन संपादनाची जी नोटीस काढली आहे ती मागे घेणार आहात काय?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : इंडिया बुल्सचा उल्लेख आधीच्या चर्चेमध्ये माझ्याकडून आला नव्हता. हा विषय मला व्यवस्थित माहिती नाही. जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली जाईल त्यावेळी या विषयावर देखील चर्चा करण्यात येईल.

श्री.पाशा पटेल : जमीन द्यायची की नाही यासंबंधी जे मतदान घेतले ते सर्वांनी पाहिले. असे असताना आम्ही काही केले नाही अशा पध्दतीचे सरकारचे वागणे योग्य आहे का?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : या बाबतीत काहीतरी प्रक्रिया झालेली आहे हे उघडच आहे. कारण टी.व्ही.वर आपण सर्वांनीच पाहिलेले आहे. परंतु त्यासंबंधीचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडून अद्याप प्राप्त झालेला नाही. तो अहवाल लवकरात लवकर पुढील 8-10 दिवसात मागवून घेण्याची प्रक्रिया करण्यात येईल.

(नंतर श्री.खर्चे....

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांशी संबंधित असा हा विषय आहे. औष्णिक वीज प्रकल्पाच्या संदर्भात सांगायचे तर मी स्वत: या हेटवणे परिसरात गेले होते. यासंदर्भात माजी मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर जे होते त्याच्या संदर्भात काय पुर्तता करण्यात आली हे समजले नाही. वस्तुस्थिती काय आहे हे तेथील जनतेलाच पुन्हा पुन्हा विचारावे. आमचे राजकीय मतभेद जरी असले तरी प्रा. एन.डी.पाटलांसारखे ज्येष्ठ नेते उपोषणाला बसतात त्यावेळी माननीय मुख्यमंत्री चर्चा करुन सांगतात की, एसईझेडच्या संदर्भात सार्वमत घेण्यास सांगितले नव्हते. मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना विनंती करणार आहे की, त्यांनी ज्या प्रकल्पाचा उल्लेख केला त्या प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील जमीन संपादित करण्यासंबंधी भूसंपादन अधिनियमातील कलम 6 (1) च्या नोटिसेस काढण्यात आल्या. या अनुषंगने त्या भागात सातत्याने आंदोलने सुध्दा चालली आहेत त्यावेळेस शासनाकडून सांगण्यात आले की, आम्ही जमिनीचे संपादन करण्याची प्रक्रिया थांबविली. परंतु जोपर्यंत कलम 6 (1) च्या नोटिसांची टांगती तलवार त्या शेतकऱ्यांवर आहे तोपर्यंत रायगड जिल्हा हा अशांतच आहे, ही वस्तुस्थिती आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, यासंबंधीची माहिती माझ्याकडे नसल्यामुळे मी त्याचा अभ्यास करीन. त्यांनी अभ्यास करावा परंतु आम्हाला शासनाच्या निर्णायक मताची आणि सार्वमताबद्दलच्या भूमिकेची अपेक्षा आहे. कारण जिल्हाधिकारी सांगतात ते एका बाजूला आणि त्याच विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीतील निर्णय यात खूप मोठे अंतर दिसून येते. कदाचित माननीय तालिका सभापतींना देखील यासंबंधीची माहिती असावी, कारण तेही कोकणातीलच आहेत. गेली अडीच वर्षे हा प्रश्न सभागृहात चर्चिला जात आहे. आणि आम्ही एसईझेडसाठी असलेले एक वेगळे अतिरेकी आहोत अशा पध्दतीने आमच्याकडे हे लोक पाहतात. याचे सुत्रधार जर शासन नसेल तर या 6 (1) च्या नोटिसेस ताबडतोब रद्द कराव्यात. कारण रायगडमध्ये गावागावात गेल्यावर लोकांचे शिव्याशाप खावे लागतात. या प्रकल्पाच्या संदर्भात असलेला "नीरी"चा अहवाल दाखवून एक दिवसात एमआयडीसीचा कायदा लावून जमिनी संपादित करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तसेच या लोकांना मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे च्या जवळच्याच जमिनी पाहिजेत. त्या कशासाठी पाहिजे हेच समजत नाही. त्या ठिकाणी नंतर घरांची निर्मिती होणार की काय हेही समजून येत नाही. म्हणून ज्या 22 गावातील जमीन संपादन करण्यासाठी कलम 6 (1) ची नोटीस इश्यु केली आहे ती

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे .......

ताबडतोब रद्द करतो असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. कारण त्यांच्या अधिकारात ते हा निर्णय घेऊ शकतात.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, हेटवणे धरणाच्या लाभक्षेत्रातील गावांच्या बाबतीत जलसंपदा विभागाचा अहवाल अद्याप पूर्णपणे प्राप्त झालेला नाही. त्याशिवाय नेमक्या किती गावांना पाणी उपलब्ध होणार आहे हे सांगणे कठीण आहे. कारण कॅनॉलसाठी जमीन देण्याचा विषय यामध्ये आहे. साधारणत: ओझरती माहिती अशी आहे की, या परिसरातील 9 ते 10 गावांनाच सिंचनासाठी पाणी उपलब्ध होऊ शकेल. म्हणून जोपर्यंत अधिकृत रित्या माहिती प्राप्त होत नाही तोपर्यंत या 22 गावातील कुठली गावे यातून वगळणे शक्य आहे, कुठल्या नोटिफिकेशन्स रद्द कराव्यात ते आपल्याला ठरविता येणार नाही. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. जयंत पाटील यांच्याबद्दल सर्वांनाच आदर आहे त्यामुळे जे आश्वासन आपल्याला दिले ते पाळण्याचाच प्रयत्न केला जाईल, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी बोलत आहे. महाराष्ट्र राज्यात हेटवणे हा एकच प्रकल्प असा आहे की, त्यात संपूर्ण तालुका भिजतो, त्या संपूर्ण तालुक्याला पाणी मिळते. या प्रकल्पाचे पुनरुज्जीवन माजी सन्माननीय सदस्य श्री. मोहन पाटील यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाले. कारण लोकांनी स्वखुशीने या प्रकल्पासाठी जागा दिलेल्या आहेत. तसेच या प्रकल्पातील पाणी शिल्लक राहून अलिबाग तालुक्यातून खारेपाटणमध्येही जाणार होते. तसेच पेण तालुक्यातील पाणी शिल्लक राहते. म्हणून माननीय मंत्री महोदयांनी 9-10 गावांचा जो उल्लेख केला तो चुकीचाच रेकॉर्डवर राहील म्हणून मी हे सांगत आहे. कारण हे पाणी केवळ 9-10 गावांनाच पुरते हे चुकीचे आहे. आमच्याकडे या प्रकल्पासंबंधीचे सर्वच रिपोर्ट्स आहेत. कारण या प्रकल्पासाठी जी जमीन लागते तिच्या संपादन प्रक्रियेत मी स्वत: होतो. हेटवणे जवळची 12 गावे आहेत त्यात स्वत: माजी सन्माननीय सदस्य हे त्या गावचे खोत होते, त्यांचेही गाव समाविष्ट आहे. त्यातील 10 गावे धरणात गेली आणि संपूर्ण पेण तालुका सुध्दा यात भिजू शकतो, एवढे पाणी त्या धरणातून मिळू शकते.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, मी अगोदरच सांगितले की, माझ्याकडे अधिकृत माहिती नाही तर जी माहिती कागदपत्रातून आली तीच मी सांगितली.-------------

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुध्दीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**औचित्याचा मुद्दा**

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याच्या द्वारे मला या ठिकाणी काही विचार मांडावयाचे आहेत. नांदेडमध्ये आज दुपारी 2.30 वाजता पोलीस अधीक्षक सिंघल यांच्या घरी 50-60 लोकांचा जमाव गेला व पोलीस अधीक्षकांना शिवीगाळ केली. त्यानंतर पोलिसांनी लाठी चार्ज करुन या जमावाला पांगविले. परंतु मला आताच माहिती मिळाली आहे की, आता हे गुंड रस्त्यावर उतरले असून त्यांनी दगडफेक सुरु केल्यामुळे पोलिसांनी अश्रुधूर सोडला. राजकीय कार्यकर्ते जर पोलिसांचे अशा प्रकारे मनोधैर्य खच्चीकरणाचे काम करीत असतील तर पोलिसांकडून आम्ही कोणती अपेक्षा करावयाची ? त्यामुळे या घटनेच्या संदर्भात सभागृहाला माहिती मिळावी अशी आमची अपेक्षा आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यानी औचित्याच्या मुद्याद्वारे जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची वस्तुस्थिती शुक्रवारी कळेल. आजच्या कामकाजपत्रिकेत नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडला होता परंतु त्यावर चर्चा होऊ शकली नाही. यासंदर्भातील चर्चा नंतर घेण्यात येईल.

तसेच आजच्या कामकाज पत्रिकेत सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 57- मुंबई पोलीस (सुधारणा ) विधेयक, 2008 दाखविण्यात आले होते परंतु हे विधेयक सुध्दा नंतर घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन परवा शुक्रवार, दिनांक 26 डिसेंबर, 2008 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 21 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 26 डिसेंबर, 2008 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही